याकामी दि.१५/०६/२०१७ अखेर ई- निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यावेळी ०८ ठेकेदार यांनी निविदा अपलोड केलेल्या होत्या, त्यापैकी ०३ ठेकेदार पात्र झाले होते व निम्नतम दरधारक ठेकेदार C-4 Infrastructure Pvt. Ltd, Nashik यांना कार्यादेश देणेचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठरले होते. तथापी ठेकेदार C-4 Infrastructure Pvt. Ltd, Nashik यांनी दि.१९/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये GST वेगळा मिळणेची विनंती केली होती. त्यावर दि.२५/१०/२०१७ रोजीचे कार्यालयीन टिपणी व

दि.१४/११/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे नि.क्र.१००५ (०३) अन्वये सदर कामी नव्याने ई – निविदा रद्द करुन फेर निविदा मागविणेस मान्यता देणेत आली आहे.

याकामी महाराष्ट्र शासनाचे नविन SSR नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानुसार सदर कामाची किंमत रु.५३,६७,३८६/- मात्र इतक्या रकमेचे होत आहे. तथापी मा. व्यवस्थापन समिती व जा.क्र.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार कामाची होणारी अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करुन निविदा प्रकाशीत करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५३,६७,३८६/- मात्र ही २०% कमी केल्यास ती रक्कम रु.४२,९३,९०९/- मात्र इतकी आली.

त्यानुसार विषयांकीत कामाची ई- निविदा सुचना वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस तसेच ई- निविदा मसुद्यास इकडील दि.१६/०१/२०१८ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात येऊन दि.२०/०२/२०१८ ते दि.१२/०३/२०१८ अखेर पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत खालील ०७ ठेकेदारांनी ऑनलाईन ई - निविदा अपलोड केलेल्या आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | दवंगे ॲण्ड चौधरी असोसिएट, नाशिक |
| २. | एस.एम. कदम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे |
| ३. | मे. एस.व्ही. चंदन, मुंबई |
| ४. | सौरव डेकोरेटर्स, पुणे |
| ५. | डिसेंन्ट डेकोरेटर्स, पुणे |
| ६. | ओम विभुती आर्ट, नाशिक |
| ७. | साई एन्टरप्रायजेस, औरंगाबाद |

उपरोक्त अपलोड करणेत आलेल्या ई-निविदा दि.१९/०३/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या ई – निविदांमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता उपरोक्त तक्यातील अ.नं.१ ते ५ चे ठेकेदार पात्र झाले असून, अ.नं.६ व ७ चे ठेकेदार अपात्र झालेले आहे.

वरील पात्र ई - निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.०९/०४/२०१८ रोजी मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, ठेकेदार यांनी देऊ केलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | सौरव डेकोरेटर्स, पुणे | ३५,०२,९६५.८८ | **निम्नतम** |
| २. | डिसेंन्ट डेकोरेटर्स, पुणे | ३९,५२,२५९.४० | - |
| ३. | एस.एम. कदम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे | ४५,०८,०७५.७२ | - |
| ४. | मे. एस.व्ही. चंदन, मुंबई | ४५,२५,३८९.४५ | - |
| ५. | दवंगे ॲण्ड चौधरी असोसिएट, नाशिक | ५१,८७,९२२.४२ | - |

वर नमूद विषयांकीत इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचे दर निम्नतम असून, सदरचे रंगकाम त्यांचेमार्फत करुन घेता येईल.

**प्रस्ताव**:- संस्थान कर्मचारी निवासस्थान परिसरातील साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतींचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.३५,०२,९६६/- मात्रचे खर्चास व याकामी त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावीत कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक** सौरव डेकोरेटर्स, पुणे **हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरांबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होउन, संस्थान कर्मचारी निवासस्थान परिसरातील साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी निम्नतम दरधारक सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचे**

**निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०३** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ मध्ये दि.२६.०७.२०१८ ते दि.२८.०७.२०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५१

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. यामध्ये गुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी शुक्रवार दि.२७/०७/२०१८ रोजी पंडीत हरिप्रसाद चौरसिया, मुंबई यांचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव २०१८ या कालावधीत पावसाळा असल्याने कलाकार कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे नेहमीचे प्रथेप्रमाणे आयोजित करता येतील. श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यात प्रत्येक दिवसासाठी कलाकारांची नांवे नमूद करण्यात आली आहेत.

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कला प्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुवार, २६/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | कलापिनि कोमाकली - कुमार गंधर्व संगीत अकॅडमी | देवास, मध्य प्रदेश | ९८२६०८००४९ ७०५९५८००४९ | भजन व अभंग | १० | प्रवास खर्चासहीत ५०,०००/- | पद्मविभुषण कुमार गंधर्व यांच्या कन्या |
| | | साई सावली भजन मंडळ – देवेंद्र गावंड | वडाळा, मुंबई | ८८९८९५६८३८ ८७६७६४५५५३ | साईभजन | २० | मोफत | |
| | | अनुप कुमार | गोंदिया | ९८२३७०६३८५ | साई भजन | २० | मोफत | |
| ०२ | शुक्रवार, २७/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | पंडीत हरिप्रसाद चौरसिया व पंडीत विजय घाटे | मुंबई | ९८२०४४६५८० | बासरी व तबला वादन (फ्युजन) | २० | मोफत | मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मिळाली आहे. |
| ०३ | शनिवार, २८/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | विजय चव्हाण | मुंबई | ९८१९००७०६६ | द फोक ड्रम्स ऑफ महाराष्ट्र | ३५ | प्रवास खर्चासहीत ३,५०,०००/- | |
| | | पंडीत सुरेश तळवलकर | पुणे | ९८५००४५३०६ | ताल यात्रा (विविध प्रकारची वाद्ये) | २५ | २,००,०००/- | |
| | | पंडीत राजा काळे | पुणे | ९३२४६०२२६३ | भावगीत, नाट्यगीत | १२ | १,२५,०००/- | |
| | | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | हिंदी साईभजन | १५ | प्रवास खर्चासहीत ३०,०००/- | |
| | | सुधांशु सर | शिर्डी | ९४२२५५११८७ | साईभजन | १२ | मोफत | |
| | | अंचल शर्मा | रायपुर | ९८२७१८०९५० | साईभजन | १५ | मोफत | |
| | | मदन चौहान | रायपुर | ९८२६६०८२७७ | साई भजन | १२ | मोफत | |

तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये दि.२६/०७/२०१८ ते दि.२८/०७/२०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ मध्ये दि.२६.०७.२०१८ ते दि.२८.०७.२०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता खालील प्रमाणे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करण्यात आले.**

| अ.नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कला प्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुवार, २६/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ श्री.विश्वनाथ ओझा, श्रीरामपूर | | | | | | |
| | | पर्याय-२ अनुप कुमार | गोंदिया | ९८२३७०६३८५ | साई भजन | २० | मोफत | |
| ०२ | शुक्रवार, २७/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ पंडीत हरिप्रसाद चौरसिया व पंडीत विजय घाटे | मुंबई | ९८२०४४६५८० | बासरी व तबला वादन (फ्युजन) | २० | मोफत | मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळाली आहे. |
| ०३ | शनिवार, २८/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ सुधांशु सर- वेळ ७ ते ८.३० | शिर्डी | ९४२२५५११८७ | साईभजन | १२ | मोफत | |
| | | पर्याय-१ अंचल शर्मा- वेळ ८.३० ते १०.०० | रायपुर | ९८२७१८०९५० | साईभजन | १५ | मोफत | |
| | | पर्याय-२ मदन चौहान वेळ ८.३० ते १०.०० | रायपुर | ९८२६६०८२७७ | साई भजन | १२ | मोफत | |

**तसेच उपरोक्त पकी श्री.अंचल शर्मा, रायपुर व श्री.मदन चौहान,रायपुर यांना विभागुन कार्यक्रम देण्यात यावे , असे ठरले.** **(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये माहे जुल□ऑगस्ट व सप्टेंबर २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५१

प्रस्तावना:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

माहे जुल□ऑगस्ट व सप्टेंबर २०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यात प्रत्येक दिवसासाठी पर्याय नमूद केले आहेत. यामध्ये मानधन घेऊन सेवा देणारे व मोफत सेवा देणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे. या पर्यायांमधून प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमासाठी एका कलाकाराची निवड करता येईल.

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, १४/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | बेला सुलाखे | मुंबई | ९८२११३००६८ | भक्तीगीत | ०९ | ५०,०००/- | |
| | | रागिनी जे. कामतीकर | नाशिक | ९८२२६५५०४० | गायन | १५ | ३०,०००/- | मा. विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| | | अमोल पटवर्धन | सांगली | ९८८११०७१५१ | भक्तीतरंग | १५ | २५,०००/- | |
| | | प्रशांत पेडणेकर | मुंबई | ८९७६३३१९३६ | भक्ती गीत | २१ | प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | मंगेश अमदुरकर | नागपूर | ८८८८१११९८६ | साईभजन | २० | मोफत | |
| | | निनाद ग्रुप – श्रीमती पद्मावती पारेकर | पुणे | ९६०४६१९५८४ | भक्तीगीत | १५ | मोफत | |
| ०२ | शनिवार, ११/०८/२०१८ सायं.७ ते ९.३० | सुनिल कुलकर्णी (मा.श्री.प्रकाश जावडेकर, केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचे स्वीय सहाय्यक) | दिल्ली | ९९१०१८८८५६ | भजन | १० | मोफत | मा.अध्यक्ष सो. यांची शिफारस |
| | | मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५० अन्वये दि.२८/०४/२०१८ रोजी श्री.सुनिल | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुलकर्णी, यांचा भजन कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. तथापि, त्यांनी दि.२७/०३/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे सदर दिवशी कार्यक्रमाचे सादरीकरणास असमर्थता दर्शवून दि.११/०८/२०१८ रोजी कार्यक्रम मिळणेसाठी विनंती केली आहे. | | | | | | |
| ०३ | शनिवार, २५/०८/२०१८ सायं.७ ते ९.३० | संदिप डांगे | मुंबई | ९८३३६३६६५७ | भक्तीगीत | १५ | ५०,०००/- | |
| | | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी | गोवा | ७७२१०२०३७० | भक्तीसंध्या | १० | ४५,०००/- | |
| | | हरिष ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | हिंदी साईभजन | १० | ४५,०००/- | |
| | | मदन चौहान | रायपुर | ९८२६६०८२७७ | साई भजन | १२ | ११,०००/- | |
| | | साई सावली भजन मंडळ – देवेंद्र गावंड | वडाळा, मुंबई | ८८९८९५६८३८ ८७६७६४५५५३ | साईभजन | २० | मोफत | |
| | | अंचल शर्मा | रायपुर | ९८२७१८०९५० | साईभजन | १५ | मोफत | |
| ०४ | शनिवार, ०८/०९/२०१८ सायं.७ ते ९.३० | दिपिका गील | दिल्ली | ९६३८९५१२९७ | साईभजन | १० | २१,०००/- | |
| | | श्रावण (बाळा) [illegible]ळे | मुंबई | ९६६४१९८८५२ | साईभजन | २५ | प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | अजय मोरे | ठाणे | ९८१९८७२३६४ | साई स्वरानंद | २० | प्रवास खर्च १८,०००/- | |
| | | राजेश्वरी पोक्कुनुरी | ह[illegible]बाद, तेलंगाना | ९६४२१६७५९४ ९७०३०४३१९४ | कुचीपुडी नृत्य | २० | मोफत | |
| | | पं. मनिष शर्मा | आग्रा | ९२५८०२३८८२ | साईभजन | ३० | मोफत | |
| ०५ | शनिवार, १३/०९/२०१८ सायं.७ ते ९.३० | अनुपमा देशपांडे | मुंबई | ९८२०१२४७९५ | भजन | १२ | प्रवास खर्चासहीत १,५०,०००/- | |
| | | नृत्यमाला अकॅडेमी ऑफ [illegible]डियन डान्सेस ॲण्ड सेंटर फॉर हायर लर्निंग, द्वारा – व्ही. रेखा | ह[illegible]बाद | ८००८३३२४४४ | कुचीपुडी नत्य | १५ | प्रवास खर्च २५,०००/- | |
| | | कलाकृती डान्स अकॅडेमी, द्वारा – सिद्धी देसाई | ठाणे | ९८२०१९७१७५ ९७६९५०९१८९ | भक्तीपूर्ण शास्त्रीय नृत्य | २५ | २१,०००/- | |
| | | किशोर सासवडे | शिर्डी | ९९२२२५७०५९ | साई पोवाडा | ६ | ११,०००/- | सदरचे कलाकार हे संस्थानमध्ये कंत्राटी कर्मचारी आहेत. तसेच त्यांनी झी-मराठी वरील "चला हवा येऊ द्या" कार्यक्रमात सादरीकरण केले आहे. |
| | | अनुप कुमार | गोंदिया | ९८२३७०६३८५ | साई भजन | २० | मोफत | |
| | | विनित कुमार शर्मा | चंदिगढ | ९०२३०७०३८२ | श्रीसाईबाबांच्या जीवनावर लाईट ॲण्ड साऊंड शो | ५० | मोफत | |
| ०६ | शनिवार, २२/०९/२०१८ | कमलेश हरीपुरी | मुंबई | ९७५७४०९५२६ | साई भजन | १२ | ३५,०००/- | |
| | | दिलीप शडंगी | रायपूर, | ७३५४४५४४४४ | हिंदी | २५ | ३०,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सायं.७ ते ९.३० | | छत्तीसगड | ९४३७१८४७६३ | साईभजन | | |
| | | सीमा रायकर | बेंगलोर | ९९८६०१०५३३ | साई भजन | १२ | ११,०००/- |
| | | गायत्री देशपांडे | हुबळी | ९७४२८४४९७४ | भजन | ०९ | ६,०००/- |
| | | फकीरा गोडगे | कोपरगांव | ८६००६७११३२ | साईभजन | १५ | मोफत |
| | | अतुल राखे | बडोदा | ७५७२९४९९३२ | साईभजन | २५ | मोफत |

तरी माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार पसंतीचे पर्याय क्र.१ व २ निवडणेस व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेत आले.**

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, १४/०७/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ रागिनी जे. कामतीकर | नाशिक | ९८२२६५५०४० | गायन | १५ | ३०,०००/- |
| | | पर्याय-२ मंगेश अमदुरकर | नागपूर | ८८८८१११८६ | साईभजन | २० | मोफत |
| ०२ | शनिवार, ११/०८/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ सुनिल कुलकर्णी | दिल्ली | ९९१०१८८८५६ | भजन | १० | मोफत |
| ०३ | शनिवार, २५/०८/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ डॉ.लक्ष्मीकांत सहकारी | गोवा | ७७२१०२०३७० | भक्तीसंध्या | १० | ४५,०००/- |
| | | पर्याय-२ साई सावली भजन मंडळ – देवेंद्र गावंड | वडाळा, मुंबई | ८८९८९५६८३८ ८७६७६४५५५३ | साईभजन | २० | मोफत |
| ०४ | शनिवार, ०८/०९/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ राजेश्वरी पोक्कुनुरी | हैद्राबाद, तेलंगाना | ९६४२१६७५९४ ९७०३०४३१९४ | कुचीपुडी नृत्य | २० | मोफत |
| | | पर्याय-२ पं. मनिष शर्मा | आग्रा | ९२५८०२३८८२ | साईभजन | ३० | मोफत |
| ०५ | शनिवार, १३/०९/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ विनित कुमार शर्मा | चंदिगढ | ९०२३०७०३८२ | श्रीसाईबाबांच्या जीवनावर लाईट अॅण्ड साऊंड शो | ५० | मोफत |
| | | पर्याय-२ किशोर सासवडे | शिर्डी | ९९२२२५७०५९ | साई पोवाडा | ६ | ११,०००/- |
| ०६ | शनिवार, २२/०९/२०१८ सायं.७ ते ९.३० | पर्याय-१ अतुल राखे | बडोदा | ७५७२९४९९३२ | साईभजन | २५ | मोफत |
| | | पर्याय-२ गायत्री देशपांडे | हुबळी | ९७४२८४४९७४ | भजन | ०९ | ६,०००/- |

**(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षी प्रमाणे माहे ऑगस्ट महिन्यात श्री साईच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगीक सुविधा उभारणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि

पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम१७.(२) ठ - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्याउपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**शासन निर्णयः**-महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी त्तिक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे.

सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी त्तिक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णयः**-मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

“श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे”, असे ठरले आहे.

**प्रस्तावः**-श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक संच ,शिर्डी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांना अग्रेषित केलेल्या दि. २२/०३/२०१८ व ०९/०४/२०१८ रोजींच्या पत्रांमध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाट्यरसिक संचाचे सहकार्याने गेली २३ वर्षे श्री साई सच्चरित पारायण सोहळा साजरा करीत आलेले आहे. यंदाचे श्री साईंचे पुण्यतिथी शताब्दी वर्ष असल्याने हा पारायण सोहळा महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असून, श्रीसंत सदगुरु गंगागिरी महाराज यांचा १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह हा शिर्डी येथे दि.१६.०८.२०१८ ते २३.०८.२०१८ अखेर साजरा होणार असल्याने याच कालावधीत श्री साई सच्चरित महापारायण सोहळा आयोजित करावा असे सोमवार दि.१९.०३.२०१८ रोजी शिर्डी ग्रामस्थ व नाट्य रसिकसंच शिर्डी यांचे चर्चेमध्ये ठरले आहे. असे नमूद करुन क्रं.०१ चे पत्रातः- (आवक क्रं. ०२६३८५ /२२ /०३ /२०१८) दरवर्षी श्री साईचरीत्र पारायण सोहळयासाठी पुरुष व महिला मिळून अंदाजे ६००० पारायणार्थी बसतात. यंदाचा महापारायण सोहळा असल्याने साधारण ११,००० चे आसपास पारायणार्थी बसणार असा अंदाज आहे, यासाठी बठक व्यवस्था चहा,नाष्टा, पाणी व महाप्रसाद, कलाकार व्यवस्थातसेच बाथरुम, हातपाय धुण्याची जागा तसेच पारायणासंबंधी त्तिर नेहमीप्रमाणे सोई करावयाच्या आहेत. (सोबत पत्र क्रं.०२ चे पत्रातः- (आवक क्रं.८१५/०९/०४/२०१८) यावर्षीचे पारायणाचे नियोजन श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे श्री साई प्रसादालयासमोरील सर्व्हे नं. १६४/०९ मधील जागेत करावे. सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ ५५ गुंठे असून त्याची लांबी ९०० फुट तर रुंदी ३०० फुट आहे. याशिवाय श्री गोंदकर आवश्यकता वाटल्यास शेजारील जागा –प्लॉट रिकामा करुन देण्यास तयार आहेत.

तरी यावर्षीचे श्री साई सतचरित्र पारायण सोहळयाचे नियोजन दि.१६/०८/२०१८ ते २३/०८/२०१८ या कालावधीत श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे जागेत करुन तेथे मंडप व त्तिर अनुषंगिक सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यातहि विनंती, असे कळविले आहे.

**प्रस्तावना**:-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक संच तसेच शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २३ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे १६ गुंठे जागेत (आताचा श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप) आयोजन करण्यात येते. यामध्ये नाटय रसिक संच, शिर्डी हे पारायणासाठी बसणा-या पारायणार्थींची नाव नोंदणी करुन बॅचेस बनवितात. तसेच संपूर्ण पारायण सोहळ्याचे नियोजन संस्थान, शिर्डी ग्रामस्थ व नाट्य रसिकसंच करत असतात. या ठिकाणी पारायणासाठी सकाळ व दुपार अशा ०२ बॅचेस करुन साधारणपणे पुरुष व महिला मिळून ५५०० ते ६००० पारायणार्थी बसतात.

श्री साईबाबा समाधि शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त तयार केलेल्या शताब्दी महोत्सव कृती आराखड्यात प्रथम प्राधान्य गटातील संस्थान प्रस्तावित प्रकल्पांतील अ.नं. १२ - विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे कामासाठी रु. २५ कोटी मात्र तिक्या खर्चास शासनाची मान्यता मिळालेली आहे. यामध्ये पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे असे नमूद केले आहे.

नाटय रसिक संच शिर्डी यांचा श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त यंदाचा श्री साईचरीत्र पारायण सोहळा महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असून श्रीसंत सदगुरु गंगागिरी महाराज यांचा १७१ वा. अखंड हरिनाम सप्ताह हा शिर्डी येथे दि.१६.०८.२०१८ ते २३.०८.२०१८ अखेर साजरा होणार असल्याने याच कालावधीत आयोजित करणेचे निश्चित केले आहे. या पारायणासाठी शिर्डी व पंचक्रोशीतील तसेच तिर बाहेरीलही राज्यांतील साईभक्तांचीही मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी वनाटय रसिक संच तसेच शिर्डी गामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २३ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे १६ गुंठे जागेत (आताचा श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप) आयोजन करण्यात येते. यावर्षी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने पारायणार्थींची संख्या सुमारे २० हजार पर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे श्री साईचरित्र पारायण सोहळा महापारायण सोहळा म्हणून भव्य स्वरुपात साजरा करण्यास काही हरकत नाही.

श्री साईचरित्र पारायण सोहळा आयोजित करणेकामी खालील बाबींवर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) श्री साईचरित्र पारायण सोहळयाची तारीख निश्चित करणे.

अ) नेहमीचे प्रथेप्रमाणेश्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीस (दि. १२/०८/२०१८ ते २०/०८/२०१८ या कालावधीत) आयोजित करणे.

ब) शिर्डी ग्रामस्थ व नाटय रसिकसंच यांचे मागणीप्रमाणेदि.१६.०८.२०१८ ते २३.०८.२०१८ (श्रीसंत सदगुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह) या कालावधीत आयोजित करणे.

क) मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांचे वेळापत्रकात नमूद केलेप्रमाणे दि.२७.०८.२०१८ ते ०३.०९.२०१८ या कालावधीत श्री साईचरीत्र पारायण सोहळयाचे आयोजन करणे.(दि.०३/०९/२०१८ रोजी गोपाळकाला असल्याने गावात ठिकठिकाणी दहीहंडीचे कार्यक्रम असतात त्यामुळे सदर दिवशी पारायण सांगतेची मिरवणुक काढणे गरसोईचे होईल.)

२) श्री साईचरित्र पारायण सोहळयाची जागा निश्चित करणे.

अ) नेहमीचे प्रथेप्रमाणे श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात आयोजित करणे. (शताब्दी वर्ष चालू असल्याने पारायणार्थींची संख्या २० हजार पर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे या जागेत पारायण आयोजित केल्यास पारायणार्थी मोठ्या संख्येने बसू शकणार नाही तसेच साईभक्तांना गेट नं.३ मधून ये-जा करणे जिकीरीचे ठरेल.)

ब) श्री साईचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन संस्थान मालकीचे जागेत साईनगर मैदानावर करणेबाबत.

क) तथापि पारायणार्थ्यांची संख्या लक्षात घेता श्री साईचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन साईनगर पाठीमागील नव्याने अतिक्रमण काढलेल्या जागेवर करणे.

ड) नाटय रसिक संच यांचे मागणीप्रमाणे श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे श्री साईप्रसादालयासमोरील सर्व्हे नं. १६४/०९ मधील जागेत करावे.

तथापि पारायण सोहळा हा पावसाळ्याचे कालावधीत येत असल्याने उपरोक्त **क** व **ड** मध्ये नमूद केलेल्या दोन्ही जागेंवर मोठया प्रमाणावर मुरुमीकरणासह सपाटीकरण करावे लागेल. त्यामुळे पर्यायी साईनगर पाठीमागील नव्याने अतिक्रमण काढलेली संस्थानचीच जागा विकसीत करणे हितावह ठरेल.

३) अ. नं.०२ मधील कोणतीही एक जागा निश्चित झालेनंतर सदर जागेवर पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक सुविधा उभारणेबाबत.

४) पारायणार्थीसाठी चहा,पाणी, नाष्टा, महाप्रसाद, माहितीफलक व बॅनर, निमंत्रण पत्रिका, फुल सजावट व विद्युत रोषणाई, आदि बाबींची पुर्तता करणेबाबत.

५) पारायण कालावधीत आयोजित कार्यक्रमांसाठी निमंत्रीत कलाकार, किर्तनकार, प्रवचनकार मानधन व निवासव्यवस्था व दर्शन आदि व्यवस्थेबाबत.

६) सन २०१७ मधील साईचरित्र पारायण सोहळयासाठी सुमारे ६००० पारायणार्थी पारायणासाठी बसले होते व या सोहळयाचे आयोजन श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात आयोजित केले होते आणि यासाठी सुमारे रु.१२,७२,२९८.०० मात्र इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तथापि या वर्षी समाधी शताब्दी वर्ष असल्याने पारायणार्थींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने पारायण सोहळयाची दिनांक व जागा निश्चित झालेनंतर उभारावयाच्या अनुषंगिक सुविधांसाठी संस्थानचे संबंधीत विभांगाकडून खर्चाचे अंदाजपत्रक मागवून वेगळा प्रस्ताव सादर करणेबाबत.

तरी श्री साई चरित्र पारायण सोहळयाचे आयोजनासाठी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.२९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षी प्रमाणे माहे ऑगस्ट मध्ये श्री साईच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगीक सुविधा उभारणेकामी मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य व मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य यांनी ग्रामस्थांशी चर्चा करुन पारायणाच्या तारखा व स्थळ याबाबत अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीटबाबत सल्लागार Supreme Engicons (India) Pvt. Ltd., Mumbai यांचे सादरीकरण पाहून निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:- वरील विषयासंदर्भात उपरोक्त अधिनियमात खालिल तरतूद आहे."२१.(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:- (क)मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;……."

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:- दि.०६/०५/२०१६ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.२९०: "उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, दिक्षित वाडा या पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात Request for proposal (RFP) मागणी करणारी सूचना प्रसिध्दकरुन त्याव्दारे या क्षेत्रातील तज्ञ आर्किटेक्टसकडून प्रस्ताव मागविणेस तत्वत: मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना पवित्र पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करणेबाबत Archaeological Survey of India (ASI), New Delhi यांना विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ASI यांचेकडील खालील अधिका-यांनी दि.२४/०१/२०१५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षित वाडा या पवित्र पुरातन वास्तुंची पहाणी केली.

१) श्री. आर.एस. जमवाल,Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi.

२) श्री. मॅनेजर सिंग,Superintending Archaeological Engineer, ASI, Aurangabad.

३) श्री. डी.एस. दानवे,Ajanta Caves World Heritage Site Incharge.

श्री.आर.एस.जमवाल, Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi यांचे दि.१३/०३/२०१५ रोजीचे पत्राद्वारे पाहणी अहवाल सादर केला होता.

त्यानूसार समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे सुदृढीकरणाचे काम हाती घेणेसाठी त्याची आवश्यकता व स्वरुप या बाबी निश्चित करणेकरीता स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी सल्लागारांची नेमणूक करुन त्यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करणे, स्ट्रक्चरल ऑडीटमधिल निरिक्षणानुसार आवश्यक सुदृढीकरणाचे स्वरुप ठरविणे, अंदाजपत्रक व निविदा तयार करणे, प्रत्यक्ष काम चालू असतांना त्यावर देखरेख ठेवणे, ठेकेदारांची बिले तपासून प्रमाणित करणे इत्यादी अनुषंगिक सेवा घेणेसाठी e-RFP प्रस्ताव मागविण्यात आले होते.

सदरहू प्राप्त प्रस्ताव उघडून निम्नतम दराचे सल्लागार Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai यांचा प्रस्ताव स्विकारुन त्यांना उपरोक्त कामासाठी जा.नं. एसएसएसटी/बांधकाम/३२३९/२०१७, दि.१९/०९/२०१७ अन्वये नेमणूकपत्र देण्यात आले होते..

सल्लागार Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai यांनी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षीतवाडा या पुरातन पवित्र इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन अहवाल सादर केला आहे. तसेच त्यांचे दि.२४/०२/२०१८ रोजीचे ई-मेल नुसार याकामी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.

| IT. No | DESCRIPTION | QTY | UNIT | RATE | AMOUNT (IN Rs) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Erecting Scaffolding H-Frame Steel Scaffolding | 2700 | SQMT | 239 | 6,45,300.00 |
| 02 | PMM (Structural Repair to columns/beams& ceiling) | 100 | SQMT | 1283.5 | 1,28,350.00 |
| 03 | External Plaster | 200 | SQMT | 623 | 1,24,600.00 |
| 04 | Chemical coating of entire external surface | 2700 | SQMT | 700 | 18,90,000.00 |
| 05 | C.I. PIPE PAINTING | 250 | RMT | 31.5 | 7,875.00 |
| 06 | Injection grouting (Wherever required) | 250 | Kgs | 813 | 2,03,250.00 |
| 07 | Terrace waterproofing chemical coating & china mosaic waterproofing | 800 | SQMT | 1350 | 10,80,000.00 |
| 08 | Chajja water proofing | 30 | SQMT | 1700 | 51,000.00 |
| 09 | Stone Work Joint Filling | 27000 | RMT | 80 | 21,60,000.00 |
| 10 | Anti-Corrosive Coating of MS Structure (Wherever required) | 100 | SQMT | 700 | 70,000.00 |
| 11 | Fire retardant passive fire protection for wooden & metal | 700 | SQMT | 300 | 2,10,000.00 |
| 12 | Polymer modified mortar wattas at ground level | 300 | RMT | 700 | 2,10,000.00 |
| 13 | Miscellaneous works | | | LUMPSUM | 2,00,000.00 |
| | | | | TOTAL | 69,80,375.00 |

सल्लागार **Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai** यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावात **Archaeological Survey of India (ASI)** यांनी दिलेल्या अहवालातील मुद्यांबाबत सल्लागार यांचा अभिप्राय नमूद करणेत आलेला आहे.

सल्लागार **Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai** यांनी सादर केलेल्या रक्कम रु.६९,८०,३७५/- मात्रचे उपरोक्त प्रस्तावाबाबत मा. मुख्यकार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर दि.१०/०४/२०१८ रोजी सादरीकरण व चर्चा करणेत आली त्यावेळी त्यांनी खालील प्रमाणे शिफारसी प्रमुख्याने सुचविल्या आहेत.

**SURFACE PROTECTION COATING**

After completion of all Repairs, The Structure should be treated with Surface Protection Transparent coating to the entire external wall and other weaker zones to fill the micro cracks and voids at external surface of the buildings. Ready to use Colourless Hydrophobic Impregnating coating with deep penetrating properties on Silicone/ Siloxane basis can be used.

**FIRE RESISTANCE COATING**

Entire wooden structure & metal structure shall be treated with Fire retardant passive fire protection coating polyester, rayon, and acrylic based coating on wood & metal structure for protection

**C) Repair required by the building** –

1. Repair of external/internal columns/ Beams with polymer treatment.
2. Replacement of damaged plaster on external walls & internal wall.
3. Joint Filling.
4. Terrace Waterproofing work.

**D) CONCLUSION** –

**1.**In most of the cases the majority of construction material used are unconventional like natural stones, wood, lime mortars and plasters as compared to new materials, In general the deterioration of natural materials is a process associated with environmental influences, entry of water into natural stones leading to dampness. Efflorescence deposits, biological growths like growth of plants etc. Further the attack of acid rains due to polluted environment has accelerated the process of deterioration. However, all the four Structures are mainly affected with Non structural cracks at certain location. No structural defects are seen at any of the structures except local cracks at some places.

**2.**Apart from Structural Stability, The four structures are need to be restored for future from the affect of environment and other climatic effect so that we can retain the original aesthetics of the said Structures which is very very important as a Heritage Structure. The Repair programme is prepared/ recommended to reduce the long term Deterioration of the Structure/ building fabric by remedying the cause of the defects.

**3.**A well-defined and proper designed rehabilitation & Restoration plan is essential. It is our opinion that repairs are essential & should be carried out to the identified areas in the supervision of well Qualified & Experienced Structural Engineer.

सल्लागार **Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai** यांनी श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, आणि दिक्षीतवाडा यावास्तूंचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्याचा अहवाल सादर केला आहे. तसेच त्यानुसार दुरुस्ती व सुदृढीकरण कामासाठी अंदाजे रु.६९,८०,३७५/- मात्र तिक्या अपेक्षीत खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. याबाबत सल्लागार यांचे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९२** **श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीटबाबत सल्लागार Supreme Engicons (India) Pvt. Ltd., Mumbai यांनी आजचे सभेसमोर सदरहु कामकाजाबाबतचे सादरीकरण केले व मा.सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai यांनी याबाबत सादर केलेल्या अहवालाप्रमाणे दुरुस्ती व सुदृढीकरण विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पुर्ण करण्यास मान्यता देण्यात आली. श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, आणि दिक्षीतवाडा यावास्तूंचे दुरुस्ती व सुदृढीकरण करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.६९,८०,३७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०७** **मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.१८६ मधील संस्थान मालकीचे जागेपकी १० आर क्षेत्रात अलोक डिस्ट्रीज लि., मुंबई यांचेतर्फे नियोजीत गेस्ट हाऊस इमारतीचे बांधकाम करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०२.२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.१३२ निरस्त करणे व याबाबत अलोक डिस्ट्रीज लि.,मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे दरम्यान दि.१८.०६.२००७ रोजी झालेला सामंजस्य करार रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (३) अन्वये " विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून,एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही " अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०२/२००७ मधिल निर्णय क्र.१३२ पुढीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई या संस्थेस मौजे निमगाव-को-हाळे गट नं.१८६ मधील संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त १० आर क्षेत्र साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधकामाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. या क्षेत्रामध्ये अलोक इंडस्ट्रीज लि. यांनी स्वखर्चाने निवासी खोल्यांचे बांधकाम करुन संस्थानकडे हस्तांतरीत करावे. नियोजीत बांधकामाची मालकी संस्थानचीच राहील परंतू त्यापैकी २५ टक्के खोल्या वाटपाचा हक्क अलोक इंडस्ट्रीज यांना राहील, याबाबत अलोक इंडस्ट्रीज यांचेबरोबर सविस्तर अटी व शर्तीचा समावेश असलेला सामंजस करार करणेत यावा, असे ठरले होते. "

**प्रस्तावना**– अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांनी दि.२६/१२/२००६ रोजीचे पत्राव्दारे शिर्डी येथे त्यांचे कंपनीमार्फत गेस्ट हाऊस बांधण्याचा मानस असून त्यासाठी संस्थानतर्फे भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केली होती. सदर गेस्ट हाऊसचे बांधकाम संस्थानतर्फे करण्यात यावे. सदर बांधकामासाठी निवडण्यात येणा-या ठेकेदारास व आर्किटेक्ट यांना त्यांचे कंपनीमार्फत मानधन रद्दकरण्यात येईल. तसेच संस्थानने ठरविलेल्या अटी व शर्तीस आम्ही अधिन राहू. सदर प्रकल्प बांधकामाकरीता येणारा खर्च कंपनी देण्यास तयार आहे. याशिवाय सदर बांधकामाची दुरुस्ती व देखभाल ही साईबाबा संस्थानने करावयाची असून साईभक्तांना निवासासाठी खोल्या देण्याची व्यवस्थाही संस्थानने करावयाची आहे. तसेच निवासस्थाना मध्ये त्यांचे कंपनीकरीता एक सूट हा त्यांचे कंपनीच्या पदाधिकारी व कर्मचा-यांकरीता संस्थानने राखीव ठेवायचा आहे, असा सदर कंपनीचा प्रस्ताव होता.

त्यास अनुसरुन उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांना मौजे निमगांव को-हाळे गट नं.१८६ मधील संस्थान मालकीचे जागेत साईभक्तांकरीता निवासस्थान इमारतीचे बांधकामासाठी १० आर क्षेत्र जागा उपलब्ध करुन देणेकामी अलोक इंडस्ट्रीज लि. व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे दरम्यान दि.१८/०६/२००७ रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता. अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांचेसमवेत याप्रमाणे करण्यात आलेला सामंजस्य करार होऊन आता १० वर्षापेक्षाही जास्त कालावधी झालेला आहे. अद्याप सदर कराराचे अंमलबजावणीसाठी कुठलीही कार्यवाही झालेली नाही. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७ मधील पोटकलम (३) अन्वये वर नमुद मा.व्यवस्थापन समिती निर्णय व सामंजस्य कराराचे अंमलबजावणीपुर्वी राज्य शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे. आता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. टिपीएस-१६१७/ प्र.क्र.१४३/ २०१७/ नवि-९, मंत्रालय को.गट नं.१८६ मधिल सदरहू जमिन शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे सदर जमिनीचा वापर संस्थानचे अन्य महत्वाचे प्रकल्पासाठी करता येईल.

प्रस्ताव– तरी वरील बाबींचा विचार करता मौजे निमगांव को-हाळे गट नं.१८६ मधील संस्थान मालकीचे जागेत अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांचेतर्फे नियोजीत गेस्ट हाऊस इमारतीचे बांधकाम करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. १३२ निरस्त करणे व याकामी अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे दरम्यान दि.१८/०६/२००७ रोजी झालेला सामंजस्य करार रद्द करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीच्या दि.१७.०२.२००७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.१३२ निरस्त करण्यास व त्या अनुषंगाने अलोक इंडस्ट्रीज लि.,मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दरम्यान दि.१८.०६.२००७ रोजी झालेला सामंजस्य करार रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०८ **श्री साईबाबा समाधी शताब्दी २०१८ निमित्त शिर्डी वाहतूक आराखडयातील ०४ रत्यांचे डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण करणेकामी येणारे रु.२,०१,१९,५५०/- इतक्या सुधारीत खर्चास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम२००४मधील तरतुद :** अधिनियम कलम२१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य

उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :**निर्णय क्रमांक ७८० दिनांक ०८/०९/२०१७.

**मा. छाननी समितीचे सभेतील निर्णय :** १.निर्णय क्रमांक १४ दिनांक ०३/१०/२०१७

**२.**निर्णय क्रमांक १७ दिनांक २८/१२/२०१७

**प्रस्तावना:** श्री साईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त शिर्डी वाहतूक आराखड्यातील ०५ रस्त्याचे डांबरीकरण/कॉंक्रिटीकरण करणे तसेच नगर मनमाड रस्त्यापासून पुर्वेकडे जाणारा चारी क्र.११ सन-एन-सॅन्ड हॉटेलपर्यंत बंदीस्त करून रस्ता विकसीत करणेसाठी प्राथमिक अंदाजपत्रकानुसार रु.२,२४,१४,७७५/- मात्र खर्चास मान्यता देणेबाबत दि.०८/०९/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७८० खालीलप्रमाणे आहे.

"... प्रस्तावातील 'अ' व 'ब' मध्ये नमूद केलेल्या रस्त्यांचे विकसन संस्थानमार्फत करणे व त्यासाठी येणा-या एकूण रु. २,२४,१४,७७५/- मात्र खर्चास संस्थान अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच चारी नं. ११ चे उजव्या बाजूने रस्ता विकसीत करणेसाठी जलसंपदा विभाग, नाशिक यांचे परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली."

सदरहु प्रस्तावातील खालील ०४ रस्ते विकसीत करणेस मा.छाननी समितीचे दि.२८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७ अन्वये मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत रु. |
|---|---|---|
| ०१ | जुना पिंपळवाडी रस्ता ते ओमसाई नगरकडे जाणारा व नंदु लोढा यांचे घरासमोरून विकास योजनेतील १८.० मी. रस्त्यापर्यंत ३५०मी. लांब व ६.०० मी. रुंद रस्ता कॉंक्रिटीकरण करण्यात यावा.( स.नं.६ मधील लेआऊट मधील रस्ता) | ३५,०६,१९०/- |
| ०२ | शिर्डी हद्दीमधील स.नं.९८ मधील पत्रकार कॉलणीमधील दक्षिणोत्तर रस्ता.( शिर्डी बनरस्ता ते ५०० रुम भक्तनिवास रस्ता पाणी टाकी लगत) असुन लांबी- ४००मी. व रुंदी ५.५० मी. कॉंक्रिटीकरण करणे. | ३१,६४,८२४/- |
| ०३ | गावठाण हद्दीतील पालखी रस्त्याच्याकडेचे लगतचे पेव्हीगब्लॉकचे नुतनीकरण व पथदिवे नुतनीकरण करणे. | ३२,७१,०३१/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **९९,४२,०४५/-** |
| ०४ | अहमदनगर मनमाड रस्त्याचे पुर्वेकडील वितरीका क्र. ११ चे बाजुने निमगाव शिव रस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | **८८,७५,३५०/-** |
| | **प्रकल्पाची एकूण रक्कम (रु.९९,४२,०४५+रु.८८,७५,३५०) रु.** | **१,८८,१७,३९५/-** |

त्यानुसार अहमदनगर मनमाड रस्त्याचे पुर्वेकडील वितरीका क्र. ११ चे बाजुने निमगाव शिव रस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी परवानगीसाठी कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक यांना दि.०७/०३/२०१८ पत्र देणेत आले आहे.तसेच वरील ०४ रस्त्यांचे विकसनासाठी इकडील दि.२४/०१/२०१८ अन्वये एकूण रु.१,८८,१७,३९५/-खर्चाचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे.

याबाबत विधी व न्याय विभागाचे दि.१४/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार विहीत नमुन्यात अंदाजपत्रके तयार करून घेणे, सर्व अंदाजपत्रके कार्यकारी अभियंता श्री साईबाबा संस्थान व सा.बां. विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून तपासून प्रमाणित करणे तसेच सदर अंदाजपत्रके तांत्रिक मान्यता प्रदान करणा-या क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रमाणित करणे, अंदाजपत्रकामध्ये १२% जी.एस.टी., आकस्मिक निधीकरीता ४%चा अंतर्भाव करणे व दरसूचीमध्ये कामगार विम्याकरीता तरतुद असल्याने स्वतंत्रपणे विम्याची तरतूद न करणे इत्यादी बाबींची पुर्तता करून अंदाजपत्रके नगरपंचायतीकडून तयार करून घेण्यात आलेली आहेत.

त्यानुसार अ.क्र.०१ ते ०३ चे रस्ते विकसित करणेसाठी रु.९९,४२,०४५/- ऐवजी रु.१,१२,४४,२००/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचे खर्चात रु.१३,०२,१५५/- इतकी वाढ होत आहे.सुधारीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ अंदाजीत किंमत रु. | कामाची तांत्रिक मान्यतेनंतर सुधारीत किंमत रु. |
|---|---|---|---|
| ०१ | जुना पिंपळवाडी रस्ता ते ओमसाई नगरकडे जाणारा व नंदु लोढा यांचे घरासमोरून विकास योजनेतील १८.० मी. रस्त्यापर्यंत ३५० मी. लांब व ६.०० मी. रुंद रस्ता कॉंक्रिटीकरण करण्यात यावा.( स.नं.६ मधील ले आऊट मधील रस्ता ) | ३५,०६,१९०/- | ३८,११,८००/- |
| ०२ | शिर्डी हद्दी मधील स.नं.९८ मधील पत्रकार कॉलणी मधील दक्षिणोत्तर रस्ता. (शिर्डी बन रस्ता ते ५०० रुम भक्तनिवास रस्ता पाणी टाकी लगत) असुन लांबी-४०० मी. व रुंदी ५.५० मी. कॉंक्रिटीकरणकरणे. | ३१,६४,८२४/- | ३२,०९,२००/- |
| ०३ | गावठाण हद्दीतील पालखी रस्त्याच्याकडेचे लगतचे पेव्हीग ब्लॉकचे नुतनीकरण व पथदिवे नुतनीकरण करणे. | ३२,७१,०३१/- | ४२,२३,२००/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **९९,४२,०४५/-** | **१,१२,४४,२००/-** |
| ०४ | अहमदनगर मनमाड रस्त्याचे पुर्वेकडील वितरीका क्र. ११ चे बाजुने निमगाव शिव रस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | **८८,७५,३५०/-** | **८८,७५,३५०/-** |
| | **प्रकल्पाची एकूण रक्कम रु.** | **१,८८,१७,३९५/-** | **२,०१,१९,५५०/-** |
| | **वाढीव खर्च रु.** | | **१३,०२,१५५/-** |

**प्रस्ताव**:- तरी वरीलप्रमाणे ४ रस्त्यांचे विकसनासाठी संस्थानचे अर्थिक निधीतून रु.१३,०२,१५५/- वाढीव रकमेसह एकूण रु.२,०१,१९,५५०/- इतक्या खर्चास मान्यतेसाठी तसेच मा. छाननी समितीची मान्यता घेवून सुधारीत प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत वाढीव रक्कम रु.१३,०२,१५५/-मात्र ही फार मोठी नाही. नगरपंचायत, शिर्डी सदर रक्कम स्वत:च्या निधीतून भरु शकेल. सदर रक्कम संस्थानने द्यावयाची झाल्यास त्यासाठी छाननी समिति व शासन यांची मान्यता घेण्यासाठी मोठा कालावधी लागेल. याबाबी विचारात घेता सदर रक्कम नगरपंचायत, शिर्डी यांनी स्वत:च्या निधीतून खर्च करणे योग्य राहील, असे समितीचे मत झाल्याने प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील अंदाजे ५६५ मी.लांबीचे रस्ते डांबरीकरण करणेसाठी रु.१६,०४,१००/- मात्रचे खर्चास मान्यता व ई-निविदा राबविणेकामी मंजूरी.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम २१ (१) अन्वये, "सिमतीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोट कलम(क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल," अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांचे निवासासाठी साईनगर, समर्पण, साईध्यान -०१ व ०२, साई चिंतन, साईस्मरण कर्मचारी वसाहतीचे इमारती आहे. सदर ठिकाणी वसाहतीचे अंतर्गत बाजूने रस्ते असून, तसेच उत्तरेस पुर्व- पश्चिम असा मुख्य रस्ता आहे. सदरील रस्त्याचा वापर निवासस्थानी असलेले कर्मचारी, अधिकारी, रुग्णवाहीका मोठया प्रमाणात करतात.

सदर ठिकाणी सन -२०१३ मध्ये डांबरीकरण करणेत आले होते. सततचे वापराने सदर ठिकाणचा डांबरी पृष्ठथर खराब झालेला आहे. याकरीता साईनगर कर्मचारी वसाहतील अंतर्गत रस्ते व सदर परिसराचे उत्तरेस असलेला पुर्व – पश्चिम असलेला मुख्य रस्ता खराब झालेल्या ठिकाणी खड्डे भरणे, त्यानंतर डांबरीकरण लिक्वीड सिलकोटसह करणे अत्यावश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१ | पुर्व – पश्चिम मुख्य रस्ता – १६३ मीटर लांबी. | १०५९.५० चौ.मी. |
| ०२ | अंतर्गत रस्ते – ४०२ मीटर लांबी | १६९०.०० चौ. मी. |
| | **एकूण -** | **२७४९.५० चौ.मी.** |

वरीलप्रमाणे रस्त्यांचे एकूण २७४९.५० चौ. मी. भागात खड्डे भरणे, डांबरीकरण करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सन २०१७-१८ चे राज्य दरसुचीनसार तयार करणेत आलेले आहे. अंदाजपत्रकानुसार रु.१६,०४,१००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. मात्र संस्थानचे परिपत्रक जा.नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २० टक्के ते ३० टक्के कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कमेत २०% कपात करुन B- 2 म्हणजेच Item Rate पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार याकामी २०% कपात करुन रु.१२,८३,२८०/- मात्र इतकी येते.

**प्रस्तावः-** तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.१२,८३,२८०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई- निविदा मागवून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील अंदाजे ५६५ मी.लांबीचे रस्ते डांबरीकरण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१२,८३,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **शिर्डी ते शिंगणापूर (वाकडी मार्गे) जाणाऱ्या रस्त्यास संस्थानमार्फत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देणेबाबत मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्षनेता यांचे दिनांक ०१ एप्रिल,२०१८ चे पत्र.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुद :** अधिनियम २१ (क) पोट कलम (१) नंतर खालीलप्रमाणे तरतुद आहे.

“ (१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय महामंडळांना शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.”

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** १. नि.क्र.७७९ दिनांक ०८/०९/२०१७
२. नि.क्र.९४९ दिनांक १४/११/२०१७

प्रस्तावना:- शिर्डी ते शिंगणापूर या राज्य क्र.६० हा एकुण ७७ कीलो मिटर लांबीचा रस्ता असून, सदर रस्ता हा शिर्डी- पिंपळवाडी-एकरुखे-गणेशनगर-वाकडी-श्रीरामपूर-बेलापूर–पढेगांव-मालुंजे-भेर्डापूर-पाथरे-मांजरी-पानेगांव-करजगांव-गणेशवाडी- विठ्ठलवाडी-हनुमानवाडी मार्गे शिंगणापूर येथे जात आहे. सदर रस्त्यापैकी पिंपळवाडी ते मालुंजे एकुण २१.५० किलो मिटर रस्त्याचे कामासाठी दि.३१ ऑगस्ट, २००७ ते दि.०३ जुलै २००९ या कालावधीत संस्थानमार्फत रु.१०.४३ कोटी इतके अनुदान कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे पूर्वतयारीकरीता संस्थान, शिर्डी नगरपंचायत व सर्व शासकीय विभागांचे संबंधित अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीतील सुचनांचे अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्र.प्रशा/ ५२५९/ २०१७ दि.०१/०९/२०१७ पत्रान्वये खालील रस्त्यांचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने संस्थान मार्फत याकामी रक्कम रु.२४ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन मिळावा जेणेकरुन सदरची कामे वेळत पूर्ण करता येतील असे कळविले होते.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित किंमत(रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (प्रजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/००मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३००.०० |
| २ | नांदुर्खी ते प्रराम–८ (प्रजिमा.८५) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १५०.०० |
| ३ | गोदावरी वसाहत ते रुई (प्रजिमा.९१) कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १७५.०० |
| ४ | रुई ते पिंपळवाडी रस्ता (प्रजिमा.८८) कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १००.०० |
| ५ | **पिंपळवाडी एकरुखे गणेशनगर वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता** | **१०००.००** |
| ६ | रांजणगांव खु ते खडकेवाके रस्ता (प्रजिमा.९२) कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३५०.०० |
| ७ | नांदुर्खी साकुरी रस्ता (प्रजिमा.१०) कि.मी. १०/५०० ते १२/५०० व २४/०० ते २८/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३२५.०० |
| | **एकूण रक्कम रुपये लक्ष -** | **२४००.००** |

उपरोक्तप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी सादर केलेला वरील रस्त्यांचे दुरुस्तीचे कामासाठी संस्थानकडून निधी मिळणेसबाबतचा प्रस्ताव दि.०८/०९/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले.

त्यानंतर मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता यांनी मा. मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना अग्रेषित केलेल्या दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्राव्दारे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आपत्कालीन परिस्थितीमध्ये खालील पर्यायी रस्त्यांची सुधारणा होणेबाबत विनंती केली.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित किंमत(रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (प्रजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३००.०० |
| २ | नांदुर्खी ते प्रराम–८ (प्रजिमा.८५) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १५०.०० |
| ३ | गोदावरी वसाहत ते रुई ( प्रजिमा.९१) कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १७५.०० |
| ४ | रुई ते पिंपळवाडी रस्ता ( प्रजिमा.८८) कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १००.०० |
| ५ | **पिंपळवाडी एकरुखे गणेशनगर वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता** | **१३००.००** |
| ६ | रांजणगांव खु ते खडकेवाके रस्ता ( प्रजिमा.९२) कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३५०.०० |
| ७ | नांदुर्खी साकुरी रस्ता ( प्रजिमा.१०) कि.मी. १०/५०० ते १२/५०० व २४/०० ते २८/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३२५.०० |
| | **एकूण रक्कम रुपये लक्ष -** | **२७००.००** |

याबाबत कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी क्र.सासंवि-१०१७/ १६४०/ प्र.क्र.१८२/ का.१६ दि.०९ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले.

1. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिरडीत होणारी श्री साईभक्तांची वर्दळ व संभाव्य गर्दी विचारात घेऊन, प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जा उन्नत झालेल्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्याकडे सादर केलेल्या रस्ता सुधारणा प्रस्तावाला विशेष बाब म्हणून तात्काळ मंजूरी देऊन निधीची तरतुद करण्याची विनंती केली आहे .
2. प्रस्तुत प्रकरणी मला आपणास असे कळविण्याचे निर्देश आहेत की, मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता यांनी त्यांच्या दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्राव्दारे विनंती केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये वरील ७ रस्त्यांच्या दुरुस्तीच्या आवश्यक्ता आणि सदर रस्त्यांची शताब्दी कालावधी मधील उपयुक्तता याबाबींचा साकल्याने विचार करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुषंगाने उचीत कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

याबाबतचा प्रस्ताव दि.१४/११/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ९४९ खालीलप्रमाणे झाला आहे.

“..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित रस्त्यांपकी शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्त्यावर साईभक्तांची ये-जा राहते, याकरीता शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्ता (ग्रामा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.३ कोटी मात्र निधी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले व उर्वरित रस्त्यांबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.”.

आता, मा. ना. श्री. राधाकृष्ण ए. विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांचेकडील दिनांक ०१ एप्रिल, २०१८ रोजीचे पत्रान्वये “ शिर्डी ते शिंगणापूर (वाकडी मार्गे) जाणारा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत खराब झालेला आहे. सध्या श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सुरु आहे. या रस्त्याच्या कामासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन दिल्यास वाहतुकीच्यादृष्टीने भाविकांची सोय होण्यास मदत होईल. कृपया, वरील रस्त्याच्या कामासाठी संस्थानमार्फत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, ही विनंती ” केली आहे.

**प्रस्ताव:-** वरीलप्रमाणे मा. ना. श्री. राधाकृष्ण ए. विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी शिर्डी ते शिंगणापूर रस्त्याचे कामासाठी संस्थानमार्फत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देणेबाबत केलेले मागणीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पिंपळवाडी- एकरुखे- गणेशनगर- वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी हा रस्ता शनि शिंगणापुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचे सोईचा व नजीकचा आहे. तरी सदर रस्त्याचेही मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **जलसंपदा विभागाची मौजे शिर्डी येथील स.नं.११४/९ व १२५/३ मधील ३२ आर जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्या बदल्यात मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं.८७ पकी ८८ पमधील संस्थान मालकीची ४० आर जागा त्यावर कार्यालय, गोडावून, अतिथीगृह व कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बांधकाम करुन त्यासह जलसंपदा विभागास हस्तांतरीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत झालेले निर्णय निरस्त करणे व याबाबत विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता सादर करणेत आलेला प्रस्ताव रद्द करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये “मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे” या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (३) अन्वये “ विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून,एका

वर्षापेक्षा अधिका मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही " अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेत संमत करणेत आलेले निर्णय:- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ मधिल निर्णय क्र.९१ पुढीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे. "पाटबंधारे खात्याने सुचविलेल्या दोन पर्यायानुसार वास्तुविशारदांकडून प्राथमिक स्वरुपाचे ले-आऊट व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन पाटबंधारे खात्याकडे पाठविणेसाठी वास्तुविशारदाची नेमणूक होणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार सदरहू प्रस्ताव मान्यतेस्तव मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली. "

तसेच दि.२२/०५/२०१० मधिल निर्णय क्र. ५१५ पुढीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे. " यावर सविस्तर चर्चा होऊन, जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील ३२ आर जागेंच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मौजे निमगांव कोर्हाळे शिवारातील गट नंबर ८७ प□व ८८ प□मधील ४० आर जागा कार्यालय, कर्मचारी निवासस्थाने आदि आवश्यक बांधकाम करुन देऊन हस्तांतरीत करण्यात यावी. याकामी करण्यात आलेल्या प्राथमिक कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या मान्यतेसाठी जलसंपदा विभागाचे मान्यतेसह विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. "

प्रस्तावना- मौजे शिर्डी येथे अहमदनगर–मनमाड महामार्गालगत सर्व्हे नं.११४/९ व १२५/३ मध्ये जलसंपदा विभागाची एकूण ३२ आर जागा आहे. सदर जागेत सद्यस्थितीत शाखा अभियंता, सिंचन शाखा, शिर्डी यांचे कार्यालय व कर्मचारी वसाहत या □मारती आहेत. सदर जागा संस्थानला प्राप्त करुन घेऊन, त्या ठिकाणी साई भक्तांसाठी मध्यवर्ती खोली वाटप व माहिती केंद्रासाठी □मारतीचे बांधकाम तसेच भविष्यात संस्थानच्या गरजेनुसार/आवश्यकतेनुसार बांधकाम करण्याचे प्रस्तावीत होते. त्यासाठी वास्तुविशारदांकडून प्राथमिक स्वरुपाचे ले–आऊट व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन पाटबंधारे खात्याकडे पाठविणेसाठी वास्तु विशारदाची नेमणूक होणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम – २००४ मधील तरतुदीनुसार सदरहू प्रस्ताव मान्यतेस्तव मा. विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव दि.०८/०२/२००९ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपूढे सादर करणेत आला होता. त्यास सदरहू सभेतील निर्णय क्र.९१ अन्वये मान्यता देणेत आली.

सदर प्रस्तावाबाबत मा. मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य तथा मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाचे दि.२२/०६/२०१० रोजी झालेल्या ब□कीत आयत्या वेळेचा ठराव क्र. ४३/१ खाललीप्रमाणे झालेला आहे.

"...जलसंपदा विभागाच्या मालकीच्या शिर्डी येथील सर्व्हे नं. ११४/९ क्षेत्र २० आर व सर्व्हे नं. १२५/३ क्षेत्र १२ आर असे एकूण ३२ आर क्षेत्र त्यावरील बांधकामासह श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना सदर क्षेत्राच्या बदली संस्थान मालकीच्या मौजे निमगांव – को-हाळे येथील सर्व्हे नं. ८७ व ८८ मधील ४० आर जागा शाखा कार्यालय, विश्रामगृह, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने ( रस्ते, वीज, पाणी □ सोयीयुक्त ) तसेच उद्यान व खेळाच्या म□□ासह श्री साईबाबा संस्थान, शिर्डीच्या खर्चाने तयार करुन देण्याच्या अटीवर हस्तांतर करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

तथापी सदर हस्तांतरण संबंधी जिल्हाधिकारी यांच्यासहमतीने व्हावे व संस्थानने प्रथम त्यांचे जागेवर बांधावयाचे शाखा कार्यालय,विश्रामगृह, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने ( रस्ते, वीज, पाणी □सोयीयुक्त) बांधून पूर्ण करुन ते जलसंपदा विभागाच्याअधिका-यांना हस्तांतर करावे व नंतरच अस्तीत्वातील शाखा कार्यालय, त्यातील □मारती व जागेचा ताबा घ्यावा असे नियामक मंडळाने सुचित केले."

मा. व्यवस्थापन समितीचे व जलसंपदा विभागाचे उपरोक्त निर्णयानुसार मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्रशासन यांचेकडेस दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१० रोजीचे पत्राद्वारे विषयांकीत प्रकल्पास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. तसेच आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स यांचेकडून जलसंपदा विभागासाठी करावयाच्या अंदाजे रक्कम रुपये ६.०१ कोटी □तक्या खर्चाचे अंदाजपत्रकांसह बांधकाम आराखडे तयार करुन जलसंपदा विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आले होते.

जलसंपदा विभागाने मान्यता दिलेल्या बांधकाम आराखडयानुसार, विहीत पध्दतीने बांधकामांचे विदयुत विषयक भाग व लॅण्ड स्केपींग वगळता रु.४,०४,००,४५८/- रकमेच्या कामासाठी निविदा मागविणेत

येवून प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेत उघडणेत आल्या. निविदा सादरकर्त्याशी चर्चा / वाटाघाटी करुन निम्मतम दराचे ( ५.४७ % कमी) ठेकेदार मे. के आर.आर इन्फ्रा. प्रोजेक्ट (प्रा.) लि. हैद्राबाद यांची निविदा निर्णय क्र.४९८ अन्वये स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देणेत यावा असे ठरले. त्यानुसार रु.४,००,८६,९७७/- मात्र इतक्या मंजूर रकमेचा कार्यादेश (विद्युत व लॅण्ड स्केपींग वगळून) बांधकाम ठेकेदार के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस् (प्रा.) लि.,हैद्राबाद यांना जा.नं.२१७९/२०११ दि.०१/०८/२०१२ अन्वये देणेत आला होता.

ठेकेदार यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार सदरहू कामाची मूदत दि.१५/०८/२०१५ ते दि.१४/११/२०१२ अखेर ( १५ महिने ) होती. विहीत कालावधीत ठेकेदार यांनी साईटवर स्टाफ क्वार्टर, गोडावून, कार्यालय, व विश्रामगृह इमारतीचे आर.सी.सी. फुटींग करीता खोदाई तसेच विश्रामगृह इमारती व्यतिरिक्त इतर इमारतींचे फाऊंडेशनपी.सी.सी. चे काम केले होते व दि.१२/०१/२०१२ पासून काम बंद ठेवले होते. ठेकेदार यांना काम सुरु करणेबाबत वेळोवेळी समक्ष तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करुनही ठेकेदार यांनी काम सुरु केले नाही. करीता आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स, मुंबई यांनी दि.१४/०६/२०१२ अन्वये ठेकेदार यांना Final Notice of Termination देणेत आली. ठेकेदार यांना सदर कामापोटी कुठलेही पेमेंट करण्यात आलेले नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार मा. विधी व न्याय विभागाकडे विषयांकीत जागा हस्तांतरणासाठी मान्यता मिळणेकरीता संस्थानकडील पत्र दि.२८/१०/२०१० अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. मा. विधी व न्याय विभागाने दि.०५/०२/२०११ चे पत्रान्वये सदर कामाबाबतची जलसंपदा विभागाच्या मान्यतेसह आवश्यक ती अंदाजपत्रके चालू डि.एस.आर. प्रमाणे तयार करुन आवश्यक नकाशासह शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे कडील दि.३०/०९/२०११ अन्वये प्लॅन व एस्टीमेट सादर करण्यात आले. अद्याप त्यांचेकडून सदर प्लॅन व एस्टीमेटला मान्यता प्राप्त झालेली नाही.

सदरहू प्रकल्पाबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.२१/०६/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४५६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"सदरहू प्रकल्पाचे ठेकेदार K R R Infra Project Pvt. Ltd., Hyderabad यांची संस्थानकडे जमा असलेली रु.१०,०२,१८०/- मात्र सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम जप्त करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच जलसंपदा विभागाचे संबंधीत सुधारीत एस्टीमेट विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले आहे. त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता येईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले."

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. सांसवि./२०१०/सं.क्र.८७९/का.१६ दि.२०/०३/२०१५ अन्वये शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने काही बाबींचा खुलासा करणेबाबत कळविले आहे. त्यातील मुद्दा क्र.७ अन्वये प्रकल्पाचे ठेकेदार यांचे संस्थानकडे जमा असलेली (EMD Rs.4,04,005/- + Initial S.D. Rs. 5,98,175/-) असे एकुण रु. 10,02,180/- इतके सिक्युरिटी डिपॉझीट जप्त करणेत आलेले आहे. सदर पत्रातील अ.क्र.४ नुसार विषयांकीत प्रकल्पाचे बांधकामासाठी या प्रकल्पाचे आर्किटेक्ट, सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स, मुंबई यांनी डी.एस.आर. (२०१४ -१५) प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसारसदर कामासाठी एकुण रु. ७,७०,६३,६०१/-इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी घेतलेल्या बैठकीत श्री साई प्रसादालयाचे लगत असलेल्या मौजे निमगांव - को-हाळे येथील गट नं.८७ , ८८ पैकी मधील जागेत स्वतंत्र प्रसाद लाडू युनिट प्रस्तावीत करावे अशी सुचना दिली होती. त्यानुसार दि.२३/११/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय क्र.७७१ खालील प्रमाणे समंत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मिती कामी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिटचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता वर्तमान पत्रातील जाहिर सुचनेद्वारे आर्किटेक्चरल सल्लागारांकडून ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर Request for Proposal प्रसिध्द करुन प्रस्ताव मागविणेत आले होते. त्यानुसार E- RFP प्रक्रिया पूर्ण करुन आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस, औरंगाबाद यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरहू प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकामी आर्किटेक्ट यांना लाडू प्रसाद विभागाचे

गरजेनुसार बांधकाम क्षेत्र निश्चीत करुन आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे आर्किटेक्ट यांनी आराखडा सादर केला आहे. आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या आराखडयामध्ये जलसंपदा विभागास हस्तांतर करणेसाठी प्रस्तावीत असलेल्या ४० आर जागेचा समावेश करणेत आलेला आहे. सदर जमिनीचे रेखांकनास मंजुरी मिळणेकामी उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्याबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी दि.०६/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे काही अटींवर तात्पुरत्या स्वरुपात मंजुरीची शिफारस केली आहे.

मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७, ८८ प□मध्ये संस्थानचे एकूण ३ हेक्टर क्षेत्र आहे. त्याप□ी स□क विश्रामगृहासाठी ६० आर क्षेत्र उपलब्ध करणेत आले आहे. तसेच महावितरणचे सबस्टेशनसाठी ५२ आर क्षेत्र उपलब्ध करणेत आले आहे. स□क विश्रामगृहासाठीचे ६० आर क्षेत्राकरीता संबंधित संस्थेने स्वतंत्र रेखांकन मंजूर करुन घेतलेले आहे. त्यामुळे उर्वरित २ हेक्टर ४० आर क्षेत्रासाठी रेखांकन मंजुरी प्रस्तावित आहे. अशा प्रकारे सदर भूखंडातून जलसंपदा विभागास हस्तांरीत करावयाचे प्रस्तावित ४० आर क्षेत्र हे नियोजित लाडू निर्मिती युनिट प्रकल्पासाठी वापरात येणार आहे. त्यामुळे सदर भुखंडातील ४० आर प्रस्तावित क्षेत्र जलसंपदा विभागास उपलब्ध करता येणार नाही.

**प्रस्ताव-** तरी जलसंपदा विभागाची मौजे शिर्डी येथील स. नं. ११४/९ व १२५/३ मधील ३२ आर जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्या बदल्यात मौजे निमगांव – को-हाळे येथील गट नं.८७ प□ ८८ प□धील संस्थान मालकीची ४० आर जागा त्यावर कार्यालय, गोडावून, अतिथीगृह व कर्मचारी निवासस्थान □ारतींचे बांधकाम करुन त्यासह जलसंपदा विभागास हस्तांतरीत करणेबाबत दि.०८/०२/२००९ व दि.२२/०५/२०१० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील अनुक्रमे निर्णय क्र. ९१ व निर्णय क्र.५१५ निरस्त करणे व सदर हस्तांतरणाचे मान्यतेसाठी विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आलेला प्रस्ताव रद्द करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जलसंपदा विभागाची मौजे शिर्डी येथील स. नं. ११४/९ व १२५/३ मधील ३२ आर जागा ही मोक्याच्या ठिकाणी असल्याने संस्थानला हस्तांतरीत करुन घेण्यात यावी. तसेच संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७, ८८ प□धील जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करावयाचे ४० आर क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रात लाडू निर्मिती युनिट प्रकल्प उभारणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मिती युनिटकरीता □ारतीचे नियोजीत बांधकामासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख यांनी सादर केलेल्या नकाशांना व अंदाजपत्रकीय खर्च रु.१५,९९,३६,७१३/- व शासनाचे प्रशासकीय परवानगीस पाठविणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतुद– अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " व खंड (घ) अन्वये "भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे" अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय–** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३२२(३०) संमत झालेला आहे.

" मौजे निमगांव को-हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदांप□ी निम्नतम दरधारक मे.सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस, औरंगाबाद हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे गट नं. ८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र प्रसादलाडू निर्मितीकामी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना नेमणूक पत्र देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.७०१ संमत झालेला आहे.

" आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी लाडु निर्मितीसाठी स्वतंत्र युनिट उभारणीचे सादरीकरण आजचे सभेत सादर केले. विचारलेल्या प्रश्नांचे उत्तरे दिली.

..यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु निर्मितीसाठी स्वतंत्र युनिट उपरोक्त प्रस्तावातील पर्याय ०१ प्रमाणे उभारणेत यावे, असे ठरले. त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदाची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. १४.४१ करोड मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना– मा. व्यवस्थापन समितीचे वर नमूद निर्णय क्र.३२२(३०) अन्वये वरील विषयांकीत प्रकल्पासाठी सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस् , औरंगाबाद यांची दि.०२/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे.

यापुर्वी आर्किटेक्ट यांनी सदर प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे दोन पर्यायांनुसार अंदाजपत्रक सादर केलेले होते.

| Sr.No. | Option Type | Discription | Built up area in Sqm. | Cost of Block Estimate in Cr. |
|---|---|---|---|---|
| 01 | Option – I | R.C.C. Building (Only GF) | 3275.075 | Rs.14.41 Cr. |
| 02 | Option- II | Compositee- PEB + RCC Building (Only GF) | 4102.91 | Rs.12.15 Cr. |

याबाबत वर नमूद व्यवस्थापन समिती निर्णय क्र.७०१ अन्वये पर्याय क्र.१ नुसार येणारे अंदाजे रु.१४.४१ कोटी खर्चास मान्यता देणेत आली आहे.

मौजे निमगांव को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं.८७ पै ८८ पै ४००० चौ.मी. क्षेत्रावर प्रस्तावित लाडू निर्मिती युनिट इमारत बांधणे या प्रयोजनासाठी रेखांकन मंजुरीकरीता उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे अर्ज करणेत आला आहे. त्यावर सहायक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांनी दि.०६/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये काही अटींवर तात्पुरत्या स्वरुपात परवानगीची शिफारस केली आहे. तथापी उपविभागीय अधिकारी यांचेकडील परवानगीचे पत्र अद्याप प्रतिक्षेत आहे.

आर्किटेक्ट यांनी यापुर्वी सादर केलेले अंदाजपत्रक हे सन २०१६-२०१७ चे जिल्हा दरसूचीवर आधारीत व ढोबळ स्वरुपाचे होते.आता आर्किटेक्ट यांनी अधिक अभ्यासांती नकाशामध्ये काही सुधारणा केल्या आहेत. सदर सुधारीत नकाशे सभेपुढे सादर करण्यात येत आहेत.

पुर्वीचे नकाशामध्ये बुंदी सुकविणे व पॅकींग करणेसाठी तळमजल्यावर प्रसादलाडु करीता १६० चौ.मी. व बुंदी प्रसाद करीता १६५ चौ.मी. असे एकूण ३२५ चौ.मी.क्षेत्र दर्शविलेले होते. आता सुधारीत नकाशामध्ये याकरीता पहील्या मजल्यावर प्रत्येकी ४५० चौ.मी.प्रमाणे एकूण ९०० चौ.मी. क्षेत्र दर्शविण्यात आले आहे. दिवसेंदिवस वाढत्या मागणीचा विचार करता याप्रमाणे वाढीव बांधकाम क्षेत्र आवश्यक आहे. तथापी बुंदी पहिल्या मजल्यावर नेणे व पॅकींग केलेले लाडू / बुंदी प्रसाद पाकिटे तळमजल्यावर आणणे यासाठी लिफ्ट अथवा कन्व्हेअर बेल्टचे स्वरुपात व्यवस्था करावी लागेल. तळमजला व पहिल्या मजल्याची उंची प्रत्येकी ६.३० मीटर इतकी दर्शविलेली आहे. तळमजल्यावरील बेसन, चक्की व थर्मिक फ्ल्यूईड हिटींग सिस्टिम यांना मेटल शीट रुफींग असून त्यांची उंची ९ मीटर दर्शविलेली आहे.

बिल्ट-अप एरिया व युनिट वाईज एरिया यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

I) GROUND FLOOR :-

NET B/UP AREA = 2512.19 SQM
EXTRA HEIGHT AREA = 1256.09 SQM
----------------
TOTAL AREA (GF) = 3768.28 SQM

II) FIRST FLOOR :-

NET B/UP AREA = 1268.88 SQM
EXTRA HEIGHT AREA = 634.44 SQM
----------------
TOTAL AREA (FF) = 1903.32 SQM
**TOTAL B/UP AREA (I+II) = 5671.60 SQM**

**UNITS WISE AREA**

| SR. NO. | UNIT | CARPET AREA IN SQM. | BUILT UP AREA IN SQM. |
|---|---|---|---|
| 1 | COLD STORE | 93.25 | 103.19 |
| 2 | SUB STORE | 93.25 | 103.19 |
| 3 | ONLINE BESAN CHAKKI UNIT | 221.00 | 238.32 |
| 4 | FLOOR STORAGE | 62.00 | 70.23 |
| 5 | PLATFORM FOR THERMO FLUID HEATIN SYSTEM | 182.00 | 200.00 |
| 6 | BESAN MIXING AND CLEANING | 92.35 | 101.43 |
| 7 | LADDU KITCHEN | 390.00 | 430.00 |
| 8 | FREE BUNDI KITCHEN | 390.00 | 430.00 |
| 9 | DISTRIBUTION COUNTER | 60.00 | 65.84 |
| 10 | ADMIN. OFFICE | 54.00 | 63.52 |
| 11 | DRYING AND PACKING (LADDU) | 450.00 | 490.00 |
| 12 | DRYING AND PACKING (FREE BUNDI) | 450.00 | 490.00 |
| 13 | TIME OFFICE | 20.00 | 24.73 |
| 14 | CHANGING ROOM (MALE) | 20.00 | 24.73 |
| 15 | CHANGING ROOM (FEMALE) | 20.00 | 24.73 |

आता आर्किटेक्ट यांनी वर नमूद तपशिलाप्रमाणे सुधारीत नकाशानूसार बांधकामासाठी सन २०१७-२०१८ चे विद्यमान ईएसएसआर दरांनुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| A) | CIVIL WORK, WATER SUPPLY, SANITARY, COMPOUND WALL, ROAD, PARKING ETC. | - RS.10,85,13,614.00 |
| B) | INTERNAL AND EXTERNAL ELECTRIFICATION, FIRE FIGHTING | - RS.1,13,24,165.00 |
| C) | HVAC EVAPORATIVE COOLING SYSTEM | - RS.1,07,00,000.00 |
| D) | COST OF FURNITURE | - RS.15,00,000.00 |
| E) | COST OF ETP PLANT | - RS.15,00,000.00 |
| | NET TOTAL | - RS.13,35,37,779.00 |
| | ADD 12% FOR GST ON (A+B) | - RS.1,43,80,534.00 |
| | ADD 4% CONTINGENCIES ON NET TOTAL | - RS.53,41,511.00 |
| | ADD 5% CENTAGE CHARGES ON NET TOTAL | - RS.66,76,889.00 |
| | **TOTAL ESTIMATED COST** | **- RS.15,99,36,713.00** |

**प्रस्ताव:**-तरी वरील विषयांकीत प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी तयार केलेल्या नकाशांचे अवलोकन होऊन त्यास मान्यता मिळणेस विनंती. तसेच आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या सविस्तर अंदाजपत्रकानुसार येणारे **अंदाजे रु.१५,९९,३६,७१३/-** त्तिक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरहू प्रकल्प हा मोठया स्वरुपाचा पायाभूत प्रकल्प असल्याने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९८** **यावेळी सदस्यांनी सभेस अशी माहिती दिली की, तिरुपती बालाजी येथील प्रसाद लाडू जादा कालावधीसाठी टिकून राहातात, सदर लाडू निर्मीतीच्या कार्यपध्दतीची माहिती घेऊन पुढील निर्णय घ्यावा.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगित ठेवणेत आला.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/प्र.अधिक्षक, लाडु प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.१३** **संस्थानमार्फत साजरे करण्यात येणाऱ्या ०३ मुख्य उत्सवांची निमंत्रण पत्रिका व त्यासोबत पाठविणेत येणारे उदी-प्रसादबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, अधिनियम २००४ चा (महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४) कलम १९ (भक्तमंडळ) **अधिनियमातील तरतुद –**

१९. (१) समारंभ, उत्सव, पुजा, इत्यादींची शिफारस करण्यासाठी, आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सामान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्थान सदस्य (सलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्तमंडळ असेल. सदस्यत्वाच्या प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.
(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असले तरी, भक्त मंडळाचे सदस्यत्व देण्यात येईल. परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पुर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.
(३) भक्त मंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्ये विनियमांद्वारे निर्धारित करून दिल्याप्रमाणे असतील. समिती, भक्त मंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदारने पूर्ण करावयाच्या इतर अटी व शर्ती देखील विनियमांद्वारे निर्धारित करून देईल.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन मा. व्यवस्थापन समितीने याकामी विनियम तयार करुन ते महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविले त्यास शासन पत्र क्र. सासंवि-२०१२/ प्र.क्र.१९/ पुनर्बाधणी-७/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ ऑक्टोबर, २०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे

भक्तमंडळाचे सभासदांबाबत विनियम विनियम, २०१३ (कलम ०४ ) खालीलप्रमाणे –
१. संक्षिप्त नांव:- या विनियमांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्त मंडळ विनियम २०१३, असे संबोधले जाऊ शकते.
२. व्याख्या :- या विनियमात, जर त्यामध्ये विषयास आणि संदर्भास काहीही प्रतिकुल नसेल तर .
(अ) “अधिनियम” म्हणजे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४)
(ब) “कार्यकारी अधिकारी” म्हणजे अधिनियामातील कलम १३ अन्वये नियुक्त करण्यात आलेले व्यवस्थापन समितीचे कार्यकारी अधिकारी .
(क) “व्यवस्थापन समिती” – म्हणजे अधिनियमातील कलम ५ अन्वये प्रस्थापितकरण्यात आलेली श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती.
३. सभासदात्वाचे **प्रकार आणि विहित वर्गणी:-** प्रत्येक प्रकारच्या सदस्यत्वाच्या वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे असतील:-

(अ) आश्रयदाते सभासद : ५,००,०००/- रूपये एक रकमी (२० वर्षांच्या कालावधीसाठी)
(ब) आजिव सभासद : ५०,०००/- रूपये एक रकमी (१५ वर्षाच्या कालावधीसाठी)
(क) सामान्य सभासद : ३,०००/- रूपये (१ वर्षाच्या कालावधीसाठी)

ज्या व्यक्तीचे भक्त मंडळाचा सभासद होण्याची इच्छा असेल त्याने या विनियमासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात कार्यकारी अधिका-यांकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
४. भक्तमंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार :-
(१) भक्त मंडळाच्या सभासदांना संस्थानच्या तिन उत्सावाचे, म्हणजेच राम नवमी, गुरू पौणिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवाचे निमंत्रण पाठवण्यात येईल, असे निमंत्रण, डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल द्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक संपर्काच्या इतर कोणत्याही पध्दतीने पाठवण्यात येईल.
(२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने “उदी प्रसाद” प्राप्त होण्यास पात्र असेल.
(3) हे विनियम लागू होण्यापूर्वीचे आश्रयदाते व आजिव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालु रहातील.
**५)** कार्यकारी अधिकारी उत्सव समारंभ किंवा पुजा या संबधी भक्त मंडळाच्या कोणत्याही सभासदाकडुन प्राप्त झालेल्या सुचना, शिफारसी किंवा प्रस्ताव यांची छाननी करतील आणि ते आपल्या यासंबंधीच्या मतासमावेत व्यवस्थापन समितीपुढे विचारार्थ सादर करतील.

भक्त मंडळ सभासदांसाठी पुर्वीचे नियम व आताचे विनीयमानुसार प्रतिवर्षी श्रीरामनवमी, श्री गुरुपार्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात खालील सभासदांना उत्सवाचे पत्रिकेबरोबर उदी प्रसाद पाठविण्यात येतो.

| अ.नं. | सभासदाचा प्रकार | फेब्रुवारी २०१८ अखेर सभासदांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | आश्रयदाता सभासद | ३७३५७ |

| | | |
|---|---|---|
| ०२ | आजिव सभासद | १७१७७६ |
| ०३ | सामान्य सभासद | ५२६ |
| | एकूण संख्या | २०९६५९ |

वरील एकूण सभासद संख्या २०९६५९ इतकी आहे. त्यातील ३३०७४ सभासदांचे पत्ते व्यवस्थित नसल्याने सदरच्या पत्रिका परत येत असल्यामुळे मा. वरीष्ठांच्या निर्देशानुसार सदरचे सभासदांना तात्पुरत्या स्वरुपात पत्रिका पाठविणे हे बंद करण्यात आले आहे. सदरच्या पत्रिका वगळून १७६६८५ सभासदांना निमंत्रण पत्रिकेबरोबरच उदीप्रसाद एकत्रितरित्या पोष्टाव्दारे पाठविण्यात येतो. मा. मंत्री महोदय, शिर्डी व परिसरातील प्रतिष्ठीत नागरीक यांनाही उदीप्रसाद व निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येतो. अशा एकूण १८०,००० सभासदांना निमंत्रण पत्रिकेबरोबरच उदीप्रसाद एकत्रित रित्या पोष्टाव्दारे पाठविणेत येतो.

सन २०१८ हे शताब्दी वर्ष चालू असल्याने सभासदांना उत्कृष्ट दर्जाची पत्रिका मिळावी ह्या हेतुने मा. व्यवस्थापन समितीने उत्कृष्ट दर्जाची पत्रिका छपाईबाबत निर्णय घेतला आहे. त्यामूळे प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई व पोस्टेज खर्च दुप्पट झाल्याचा दिसून येतो. शताब्दी वर्ष संपल्यानंतर नेहमीच्या पद्धतीने उत्सवाची निमंत्रण पत्रिका छोट्या आकारात छपाई करता येईल व त्यामुळे पोष्टेज व छपाई खर्च पुर्वीप्रमाणेच राहील.

तथापी आता मा.व्य.स.चे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं ७९, नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे.

प्रत्येक उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई व पोस्टेज खर्च कमी करण्यासाठी वर्षामधील सर्व उत्सवांचा उदी-प्रसाद एकदाच सर्व भक्तमंडळांना पाठविणेत यावा व ज्या भक्तमंडळ सभासदांचे ई-मेल प्राप्त आहेत, अशा भक्तमंडळ सभासदांना त्या-त्या उत्सवाच्या वेळेस निमंत्रण पत्रिका ई-मेलद्वारे पाठविण्यात याव्यात, असे ठरले.

तथापि संस्थानच्या अधिनीयमात भक्तमंडळ सभासदांना संस्थानमार्फत साजरे करणेत येणारे ०३ मुख्य उत्सवांचे (श्री रामनवमी, श्री गुरूपोर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सव) निमंत्रण पाठविणे तसेच या ०३ ही उत्सवांचा उदी-प्रसाद सभासदास पाठविण्याची तरतुद आहे. या तरतुदीनुसार सध्या उत्सवांची निमंत्रण पत्रिकेबरोबरच उदीप्रसाद एकत्रित रित्या पोष्टाव्दारे पाठविणेत येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीने निर्णयानुसार कार्यवाही करणेचे ठरविल्यास विनियम २०१३ तरतुदीनुसार भक्तमंडळ सभासदांना प्रत्येक उत्सवानंतर उदी प्रसाद मिळणार नाही.

त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय हा अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे असे नम्र मत आहे.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९ नुसार फेर निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.२९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९ रद्द करण्यात येऊन, भक्तमंडळाचे सदस्यांना पुर्वीप्रमाणेच निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१४** **प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडून श्री रामनवमी उत्सव २०१७ च्या पुनर्मुद्रण करण्यात आलेल्या निमंत्रण पत्रिका छपाईचे रु.२,०९,६००/- मात्र आदा करणे.**

**प्रस्ताव-** १) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रास्ताविक:- प्रवरा ऑफसेट,लोणी, यांनी दि.२५.०३.२०१८ चे पत्रान्वये कळविले आहे की, श्री रामनवमी उत्सव २०१७ च्या कार्यक्रम पत्रिका व पाकिट छपाई केली होती.परंतु पत्रिकेतील व पाकीटावरील नावामध्ये बदल झाल्यामुळे वरिष्ठांच्या सुचनेवरुन नवीन पत्रिका व पाकीटे छपाई करण्यास सुचना करण्यात आली. त्यानुसार नव्याने पत्रिका व पाकीटे छपाई केल्या जुन्या ४९,००० पत्रिका व पाकीटे वापरण्यात आल्या व १,३१,००० पत्रिका व पाकीटे

पुन्हा नव्याने छपाई केल्या तरी १,३१,००० पत्रिका व पाकीटे आम्ही छपाई केली असून, सदर बिल क्र.५७५ रक्कम रु.२,०९,६००/- होत असून सदर बिलाची रक्कम आद्याप पर्यंत आम्हाला मिळाली नाही. तरी बिलाची रक्कम मिळावी ही नम्र विनंती.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय–१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७.०३.२०१७ चे सभेत निर्णय क्र.२२४ नुसार दि.०६.०३.२०१७ चे स्थानिक उपसमितीचे सभेतचे इतिवृत्तातील शिफारशिंना खालीलप्रमाणे पुष्टी देण्यात आली.

सविस्तर चर्चा होऊन सन २०१७ या वर्षामधील संस्थान मार्फत साजरे होणा-या सर्व उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई करणेकामी प्रवरा ऑफसेट,लोणी यांचे प्रती नग रु.१.६० मात्र अंतिम निम्नतम दर स्वीकारणेत येऊन , त्यांना छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. तसेच अंतीम दर त्यांचेकडून लेखीस्वरुपात घेण्यात यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रस्तावना:- उपसमितीचे सभेत प्रवरा ऑफसेट, लोणी यांनी छपाई आदेशाची वाट न पहाता, तातडीने निमंत्रण पत्रिका छपाईचे काम चालू करुन ८ दिवसात पुरवठा पूर्ण करणेबाबत व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. श्री. भोसले साहेब यांनी सांगितले. त्यानुसार प्रवरा ऑफसेट, लोणी यांनी श्री रामनवमी उत्सव २०१७ चे १,८०,००० नग निमंत्रण पत्रिकांची छपाई केली व पाकीटे तयार करुन टप्प्याटप्याने पुरवठा सुरु करण्याचे काम चालू करतो असे सांगितले. प्रथम त्यांनी ४९,००० नग निमंत्रण पत्रिका छपाईचा पुरवठा केला व सदर पत्रिका पोष्टाव्दारे सभासदांना पाठविण्यात आल्या. उर्वरीत १,३१,००० नग निमंत्रण पत्रिकांचा पुरवठा करणे बाकी होते. श्री.बाजीराव,शिंदे , कार्यकारी अधिकारी यांची दि.२८.०२.२०१७ रोजी बदली होऊन नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक झाल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दि.१५.०३.२०१७ रोजी ५.०० वाजता पत्रिकेवरील नावात बदल करुन फेर निमंत्रण पत्रिका छपाई करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार त्याच दिवशी पत्रिकेवरील नावात बदल करुन मजकुर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून मान्य करुन, प्रवरा ऑफसेट, लोणी यांना १,३१,००० नग फेर निमंत्रण पत्रिका छपाईचे काम सुरु करणेबाबत दुरध्वनीवरुन कळविण्यात आले. तसेच दि.१६.०३.२०१७ रोजी मा. उपाध्यक्ष श्री. कदम साहेब यांचेशी निमंत्रण पत्रिकेवरील नावाबाबद बदल करणेबाबत चर्चा करण्यात आली असता. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचित केलेप्रमाणे पत्रिका छपाई करणेबाबत त्यांनी सांगितले.

विभागाचा अभिप्राय- सन २०१७ मधील श्रीरामनवमी उत्सवाच्या १,३१,००० निमंत्रण पत्रिकेच्या नावात बदल करुन पुन्हा निमंत्रण पत्रिका छपाई करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिल्याने उत्सवाच्या १,३१,००० नवीन पत्रिका आदेशा व्यतिरिक्त छपाई करण्यात आल्या. त्यामुळे प्रेसधारकाकडे छपाई झालेल्या १,३१,००० निमंत्रण पत्रिका प्रेसमध्ये पडून आहेत. सदरच्या पत्रिकांचे बिल प्रेसधारकाकडे पडून असलेल्या पत्रिकांची संख्या मोजून आदा करता येईल.

तरी प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडे आदेशा व्यतिरिक्त जादा छपाई होऊन पडून असलेल्या १,३१,००० निमंत्रण पत्रिकांचे १.६० प्रतीप्रमाणे होणा-या बिलाची रक्कम रु.२,०९,६००/- मात्र आदा करणेकामी निर्णयार्थ सादर .

**याबाबत चर्चेच्या वेळी संबधीत प्रेस धारकाला कार्यारंभ आदेश नसतांनाही तत्कालीन उपसमितीच्या बठकीत दिलेल्या तोंडी निर्देशानुसार त्याने निमंत्रण पत्रिकांची छपाई केली होती. त्याने छपाई केलेल्या सर्व निमंत्रण पत्रिका संस्थानकडे देण्याबाबत त्याचवेळी सांगीतले होते. त्याप्रमाणे त्यांनी छपाई केलेल्या सर्व म्हणजे ४९,००० निमंत्रण पत्रिका संस्थानकडे जमा केल्या. त्या निमंत्रण पत्रिका भाविकांना पाठविण्यात आल्या. त्यानंतर प्रेसधारकाला सुधारीत निमंत्रण पत्रिका छापणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला. त्यामुळे प्रेस धारकाने छपाई केलेल्या सर्व निमंत्रण पत्रिकांचे देयक यापुवीच आदा करणेत आले आहे. ही वस्तुस्थिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणली.**

**निर्णय क्र.३००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमुद केलेली वसतुस्थिती विचारात घेऊन प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१५** **आयकर डिमांड नोटीस दि.३१.१२.२०१७ रु.१८३.८६ कोटी संबंधित सद्यस्थिती अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** उप आयुक्त आयकर कार्यालय, पिरामल चेंबर, मुंबई यांचे मार्फत कर निर्धारण वर्ष सन २०१५-१६ चे कर निर्धारण करुन रु.१८३,८६,१४,३३०/- इतका कर देय असलेबाबत दि.३१.१२.२०१७ रोजीची आयकर कार्यालयाची नोटीस प्राप्त झाली होती. दि.०८.०१.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत सर्व सदस्यांना सदर नोटिसच्या प्रति वाटण्यात आल्या होत्या निर्णय क्र. १६/दि.०८.०१.२०१८ अन्वये सदर बाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करणे, आयकर लवादाकडे अपिल दाखल करणे, सदर प्रक्रियेसाठी अनुशंगिक प्रवास, इतर तत्सम खर्चास मान्यता देण्यात आली व मा.विश्वस्त ॲड.मोहन जयकर यांनी समन्वय

करणे असा निर्णय संमत झाला होता. दि.७.०३.२०१८ रोजीचे मा.व्य.स.सभेमध्ये सद्यस्थितीचे अवलोकन करण्यात येऊन निर्णय क्र. २०३/दि.७.०३.२०१८ अन्वये केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली आहे. तदनंतर आज अखेर झालेली कार्यवाही व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१. आयकर कार्यालय, पिरामल चेंबर, लालबाग, यांचेकडून दि.३१.१२.२०१७ रोजी संस्थानला रु.१८३ कोटी कर भरण्याची Assessment order झालेली आहे.

२. सदर बाबत स्थगिती मिळणेकामी व आयकर कार्यालयाकडून आयकर कायद्यातील तरतूदींचे पालन करुन कर निर्धारण करणेसंबंधित मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.३१.१.२०१७ रोजी Writ petitionNo.395/2018 दाखल करण्यात आले होते.

३. एकूण ३० दिवसांची मुदत पुर्ण झाल्यावर संस्थानचे बॅंक खाती गोठवून कर वसूलीबाबतची कार्यवाही होऊ नये करीता तातडीने मा.व्य.स.निर्णयानुसार दिल्ली येथील वरीष्ठ वकील ॲड.एस.गणेश यांचे मार्फत दि.९.२.२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाचा फेरकर निर्धारण करण्यात येऊन आयकर लवादाकडे अपिल दाखल करण्याचा व स्टे करिता आयकर विभागाकडे प्रस्ताव देण्याचा आदेश प्राप्त झाला आहे.

४. ऑर्डरचे तारखेपासून २ आठवडयांचे आत अपिल फाईल करणे आवश्यक होते. त्यास अनुसरुन आयकर आयुक्त (अपिल) यांचेकडे दि.१८.०२.२०१८ रोजी ऑनलाईन व दि.२०.२.२०१८ रोजी अपिल दाखल करण्यात आले आहे.

५. उप आयुक्त आयकर यांचे दि.७.२.२०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन दि.१३.२.२०१८ रोजी फेर कर निर्धारण सुनावणीकामी आयकर सल्लागार सीए श्री.राहूल केळकर, सीए श्री.दिपक टिकेकर, लेखाधिकारी श्री.एस.पी.लंके हजर होते. आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आल्यानंतर उपआयुक्त यांनी दि.१६.२.२०१८ रोजी फेर सुनावणीकरीता बोलविले होते. दि.१६.२.२०१८ त्यास अनुसरुन उपरोक्त प्रमाणे सुनावणीकरीता हजर राहिले होते.

६. उप आयुक्त आयकर यांनी दि.२०.२.२०१८ रोजी फेर कर निर्धारण करुन रु.१२२ कोटी देय कर असलेबाबत सुधारित कर निर्धारण नोटिस दिली आहे.

७. देय कर भरण्यास स्टे मिळणेकरिता मा.उच्च न्यायालयाचे रिट ऑर्डर नुसार दि.२७.२.२०१८ रोजी उप आयुक्त आयकर, आयुक्त आयकर व आयकर आयुक्त अपिल यांचेकडे Stay of Demand application करण्यात आला होता.

८. त्यास अनुसरुन त्यांनी दि.५.३.२०१८ रोजी उपआयुक्त आयकर विभाग, पिरामल चेंबर येथे सुनावणीकरीता बोलावीले होते. त्यास अनुसरुन आयकर सल्लागार सीए श्री.राहूल केळकर, सीए श्री.दिपक टिकेकर, लेखाधिकारी श्री.एस.पी.लंके हजर होते. तसेच उप आयुक्त आयकर यांनी दि.१६.२.२०१८ रोजी फेर सुनावणीकरीता बोलविले होते त्यासही हजर होते.

९. उप आयुक्त आयकर यांनी दि.२८.२.२०१८ रोजीचे पत्राने Stay of Demand application सुनावणीकरीता दि. ५.३.२०१८ रोजी बोलावले होते. त्यास कर सल्लागार सिए व लेखाधिकारी हजर होते.

१०. आयुक्त आयकर विभाग यांनी दि.७/३/२०१८ रोजीचे पत्राने Stay petition करिता दि.१३.३.२०१८ रोजी बोलावले होते. संस्थान सीए व लेखाधिकारी त्यास हजर होते. यावेळी त्यांनी एकूण देय करापैकी अखर्चित उत्पन्न करावर १०%व उर्वरीत वर २०% असे एकूण साधारणता रु.२० कोटी अपिल कार्यवाही करीता भरण्याबाबत चर्चा केली. बाबत मा.विश्वस्त व कार्यकारी अधिकारी यांना त्याबाबत कळवू असे सांगीतले होते. त्यांनी दि.१९.३.२०१८ रोजी पुन्हा बोलावले होते.

११. दि.१९.३.२०१८ रोजी मा.विश्वस्त श्री.जयकर व वरीष्ठ वकील एस गणेश यांचे मार्गदर्शनाने रिट पिटीशन करणारे ॲड.श्री.जुन्नरकर यांचेकडून उप आयुक्त आयकर, आयुक्त आयकर यांना अपिल कार्यवाही सुनावणी तारीख दि.२०.३.२०१८ असल्याचे व त्याप्रमाणे अपिल पुर्ण होईपर्यंत स्टे देणेबाबत पत्र दिले होते.

१२. दि.१४.३.२०१८ रोजीचे आयकर आयुक्त अपिल यांचे पत्राद्वारे दि.२०.३.२०१८ रोजी अपिल सुनावणी करीता बोलावले होते. त्यास अनुसरुन आयकर सल्लागार सीए श्री.राहूल केळकर, सीए श्री.दिपक टिकेकर, लेखाधिकारी श्री.एस.पी.लंके सुनावणीकरीता हजर होते.

१३. दि.२०.३.२०१८ रोजी दुपारी ४.३० वा. आयकर आयुक्त अपिल यांनी दूरध्वनीवरुन स्टे ऑफ डिमांड प्रस्ताव निकाली काढणेबाबत सुनावणीकरीता दि.२१.३.२०१८ रोजी बोलावले होते. त्यास अनुसरुन आयकर सल्लागार सीए श्री.राहूल केळकर, सीए श्री.दिपक टिकेकर, लेखाधिकारी श्री.एस.पी.लंके, श्री.सतिश खरात, लिपीक हजर होते. त्यांनी दि.२१.०३.२०१८ रोजी सुनावणी करुन ऑर्डर शिट दि.२०.०३.२०१८ चे तयार करुन त्यावर स्वाक्ष-या घेतल्या सदर बाबत यांचे निदर्शनास आणुन दिली. देय करापोटी काही रक्कम भरण्यास त्यांनी सुचविले सदर बाब मा.व्यवस्थापन समितीच्या व संस्थान अधिका-यांच्या अखत्यारीत असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे त्यांना सांगण्यात आले.

१४. दि.२२.३.२०१८ रोजी आयकर आयुक्त श्री.सतिश शर्मा यांचा लेखाधिकारी यांना दूरध्वनीवर फोन आला त्यांनी "संस्थान ने कर भरणेबाबत काय ठरविले आहे, आपले ॲडव्होकेट व कर सल्लागार फक्त पत्र व्यवहार करुन रक्कम भरण्याचे टाळत आहेत. दि.३१ मार्च पुर्वी आयकर भरण्यात आला नाही तर बॅंक ॲटॅचमेंटसह दोन कर निर्धारण वर्षे सुध्दा गृहित धरुन आयकर जबाबदारी ठरविण्यात येईल. त्यामुळे दि.२७.३.२०१८ पर्यंत कर भरणेबाबत व्यवस्थापन समिती, संस्थान अधिकारी यांना सदर बाबत माहिती द्यावी" असे सांगीतले होते.

१५. सदर कार्यवाही मा.विश्वस्त जयकर, वरिष्ठ वकिल एस.गणेश यांचे निदर्शनास आणुन दिली. यावर संस्थानच्या बॅंका अटॅचमेंट होऊन व्यवहार बंद होऊ नये करिता त्यांनी तातडीने मा.उच्च न्यायालयात ॲड. जुन्नरकर यांचे मार्फत रिट पिटीशन दाखल केले त्याची सुनावणी दि.२७.३.२०१८ रोजी वरिष्ठ वकिल एस.गणेश यांचेमार्फत होऊन दि.०५.०४.२०१८ रोजी वेबसाईटवर उपलब्ध झाली. मा.उच्च न्यायालयाची ऑर्डर झाली आहे.

१६. त्यामध्ये प्रमुखतः आयकर लवादाकडे अपिल सुनावणी झाली आहे. त्यांची ऑर्डर मिळेपर्यंत व त्यानंतर दोन आठवडे स्टे मिळाला आहे.

१७. सदर प्रक्रियेसाठी आज अखेर अनुशंगिक प्रवास/इतर तत्सम बाबींकरिता साधारणतः रु.२,८७,०९७/- इतका खर्च झाला असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | रिट पिटीशन नोटरी, झेरॉक्स व अनुशंगिक खर्च | ०३.०२.२०१८ | १७,४४९/- |
| २ | दिल्ली विमान प्रवास खर्च खर्च (मा. विश्वस्त व अडव्होकेट) | ०५.०२.२०१८ | २४,१५६/- |
| ३ | मुंबई -दिल्ली विमान प्रवास व हॉटेल व ( सीए व लेखाधिकारी) | ०५.०२.२०१८ | ७०,०७३/- |
| ४ | ॲड.एस.गणेश यांचे शिर्डी येथे हॉटेल खर्च | १८.०२.२०१८ | २७,३४३/- |
| ५ | ॲड.एस.गणेश यांचे दिल्ली ते मुंबई –दिल्ली विमान प्रवास खर्च | २५.०३.२०१८ | ६७,७६१/- |
| ६ | ॲड.एस.गणेश यांचे दिल्ली ते मुंबई –दिल्ली विमान प्रवास | ०४.०४.२०१८ | ८०,३१५/- |
| | | **एकुणः-** | **२,८७,०९७/-** |

त्यामध्ये प्रवासखर्च, हॉटेल, उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करणे व खर्चाचा समावेश आहे. कार्यवाही चालू असल्याने अद्याप एकुण खर्च निश्चित झालेला नाही.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १६/दि.०८.०१.२०१८ अन्वये समिती सदस्य ॲड.श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने आयकर नोटीस संबधीत अपिल, रिट पिटीशन व संपुर्ण कामकाज चालू आहे. याबाबत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ व पुढील योग्य त्या कार्यावाहीस्तव मान्यता मिळणेकामी मा.व्य.स.च्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन याकामी आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच आयकर डिमांड नोटीस बाबत मा.डॉ.राजाबाली सिंग, सदस्य यांनी देखील त्यांचे स्तरावर प्रयत्न करावेत, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१६** **आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये केलेल्या गुतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये कमाल व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये १ वर्षाच्या मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूकीस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तु केवळ राष्ट्रीयकृत बॅंकैत किंवा बॅंकामध्ये ठेव म्हणुन ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या

कलम २ च्या खंड(१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील, अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.९५२, दि.०६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडुन व्याजदर मागवुन, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बॅंकांकडे टप्याटप्याने गुंतवणुक करण्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणुक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरून राष्ट्रीयीकृत बॅंकाची आर्थिक् स्थिती पाहून केलेल्या गुंतवणुकांची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध् होणारा निधी व बचत खात्यामध्ये दैनंदिन खर्च वजा जाता उपलब्ध् होणारा निधी, याची विहित पध्दतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बॅंकांमध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणुक करण्यात आली आहे.

दि.३१ मार्च २०१८ अखेर आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल खालीलप्रमाणे:-

(आकडे रूपयांमध्ये )

| **अ.क्र.** | **बॅंकेचे नाव** | **दि. ३१ मार्च २०१८ अखेर असलेली गुंतवणुक** |
|---|---|---|
| १ | आंध्र बॅंक, शिर्डी | २,२९,७५,३६,६२४/- |
| २ | बॅंक ऑफ बरोडा, नाशिक | १,०१,०१,००,०००/- |
| ३ | कॅनरा बॅंक, शिर्डी | ९४,००,००,०००/- |
| ४ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | १७,२५,५०३/- |
| ५ | देना बॅंक, शिर्डी | ७२,००,००,०००/- |
| ६ | इंडियन बॅंक, शिर्डी | १,०३,५०,००,०००/- |
| ७ | ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स, शिर्डी | २,४८,००,००,०००/- |
| ८ | पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी | ७८,००,००,०००/- |
| ९ | सिंडीकेट बॅंक, शिर्डी | २,६०,००,००,०००/- |
| १० | युको बॅंक, शिर्डी | १७,००,००,०००/- |
| ११ | युनियन बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ५१,०७,००,०००/- |
| १२ | विजया बॅंक, शिर्डी | ८,३६,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम** | **२०,९०,५०,६२,१२७/-** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये राष्ट्रीयकृत बॅंकाकडुन व्याजदर मागवुन उच्चतम दराने दि.३१ मार्च २०१८ अखेर रू.**२०,९०,५०,६२,१२७/-** मात्र ची गुंतवणुक करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास व आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची विहित पध्दतीने मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवुन जास्तीत जास्त व्याजदराने गुंतवणुक करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रकरणी बॅंकांचे CRISIL किंवा MOODYS या सारख्या मानांकन संस्थांकडून Rating घेण्यात यावे, यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१७** **देगणीदार साईभक्तांना प्रसादरुपाने भेट देणेकामी पादुकांची प्रतिमा असलेली १०००० चांदीची नाणी बनविणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका -

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७२ व मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीचे शासन मान्यतेनुसार, जे

साईभक्त रुपये २५,०००/- मात्र वा त्यापेक्षा जास्त रक्कम रोख अथवा वस्तू – साहित्य रुपात देणगी देतील त्यांना संस्थान व्यवस्थापनामार्फत पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदी प्रतिमा (नाणी), ०१ साईचरित्र व श्री साईंचा ०१ श्रीडी फोटो प्रसादरुपाने देणेस मान्यता मिळालेली आहे.

तसेच सदर निर्णयाची कार्यवाही श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ पासून करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३-२४ मे, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४५३ अन्वये घेणेत आलेला असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५ जून, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४९४ अन्वये, विषयांकित प्रसाद रुपाने द्यावयाची शुध्द चांदीची प्रतिमा (नाणी) तयार करुन घेणेबाबत खालीलप्रमाणे सविस्तर निर्णय पारित करणेत आलेला आहे -

“.. प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांस अनुसरुन, रुपये २५,०००/- मात्र वा त्यापेक्षा जास्त देणगी देणारे साईभक्तांना संस्थान व्यवस्थापनामार्फत प्रसादरुपाने भेट द्यावयाचे २० ग्रॅम वजनाच्या श्रींच्या पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी केंद्र शासन मान्यता प्राप्त भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI ) या संस्थेकडून दरपत्रकात नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार व चांदीच्या मुल्यांमध्ये होणा-या वाढ अथवा घटीस अधीन राहून, १०००० नग थेट तयार करुन घेणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. यापैकी प्रथमतः २००० नग चांदीची नाणी तयार करुन घेण्यात यावी व याप्रमाणे भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच सदरची नाणी तयार झालेनंतर मुंबईहून शिर्डी येथे आणणेकामी विमा व इतर बार्बीसाठी येणा-या खर्चासही मान्यता देण्यात आली. ”

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५ जून, २०१७ रोजीचे निर्णयानुसार,भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांना आजपावेतो खालीलप्रमाणे वेळोवेळी आवश्यकतेनुसार कार्यादेश देणेत आलेले असून, त्यांनी सदर कार्यादेशांनुसार चांदी नाणींचा पुरवठा ही पूर्ण केलेला असून, बिलांची रक्कम आदा करणेत येऊन, हिशोब पूर्ण करणेत आलेला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ०१**

| **टप्पा क्रमांक** | **कार्यादेश क्रमांक / दिनांक** | **चांदी नाणी मागणी** | **चांदी नाणी पुरवठा केलेचा दिनांक** | **पुरवठा केलेली चांदी नाणी** | **पुरवठा झालेल्या चांदी नाणींचे बिलाची रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १४६६/ दि.१७ जून, २०१७ | २००० नग | ०६ जुल, २०१७ | १००० नग | २८,९६,३१९/- |
| | | | २७ जुल, २०१७ | १००० नग | |
| ०२ | २६०६/दि.१० ऑगष्ट, २०१७ | २००० नग | २१ सप्टेंबर, २०१७ | १५०० नग | २६,३२,६८०/- |
| | | | १० नोव्हेंबर, २०१७ | ०५०० नग | |
| ०३ | ४२५४/दि.१५ नोव्हेंबर, २०१७ | ४००० नग | २० डिसेंबर, २०१७ | २००० नग | २७,३५,६८०/- |
| | | | १३ जानेवारी, २०१८ | २००० नग | २७,३५,६८०/- |
| ०४ | ५६८८/ दि.२४ जानेवारी, २०१८ | २००० नग | ११ एप्रिल, २०१८ | २००० नग | २७,३५,६८०/- |
| | | **१०००० नग** | - | **१०००० नग** | **१,३७,३६,०३९/-** |

**०३.** सदर योजनेची कार्यवाही, श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ चे मुख्य दिवशी म्हणजेच दिनांक ०९ जुलै २०१७ रोजी, मा. व्यवस्थापन समिती सदस्यांचे उपस्थितीत करणेत आलेली असून, सध्या या योजनेनुसार पात्र ठरणा-या देणगीदार भक्तांना प्रसाद रुपाने पादुकांची प्रतिमा असलेली चांदी नाणी वाटप करणेत येत आहे.

**०४. तक्ता क्रमांक ०१ मध्ये नमुद करणेत आलेल्या १०००० नग** चांदी नाणींचे प्रसादरुपाने वाटप करणेत आलेल्या संख्येचा गोषवारा खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक ०२**

| **अ.नं.** | **तपशील** | **चांदी नाणीसंख्या / नग** |
|---|---|---|
| ०१ | दि. १२ एप्रिल, २०१८ अखेर भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून लेखाशाखेकडे जमा झालेली नाणी | **१००००** |

| | | |
|---|---|---|
| ०२ | दि.१२ एप्रिल, २०१८ अखेर रु.२५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या देणगीदार भक्ताना वाटप करण्यात आलेल्या चांदीची नाणी | **७६५५** |
| ०३ | दि. १२ एप्रिल, २०१८ अखेर लेखाशाखेकडे शिल्लक असलेली नाणी | **२३४५** |

थोडक्यात, विषयांकित योजना कार्यान्वीत केलेपासून, म्हणजेच दि.०९ जुलै २०१७ ते दि.१२ एप्रिल २०१८ अखेर १० महिन्यांच्या कालावधीत एकूण ७६५५ साईभक्तांना देणगी कार्यालयामार्फत चांदीची नाणी प्रसादरुपाने वाटप करण्यात आलेले आहेत. म्हणजेच प्रतिदिवशी सरासरी साधारणतः २८ नाणी वाटप करण्यात आलेली आहेत. त्याअनुषंगने उपरोक्त संदर्भ क्र.०३ चे निर्णयानुसार मागिवण्यात आलेल्या एकूण १०००० नग चांदीच्या पादुकांपैकी फक्त २३४५ नग शिल्लक आहेत.

आता, माहे एप्रिल-मे,२०१८ ते माहे जुलै २०१८ या कालावधीत शनिवार-रविवार जोडून येणा-या सलग सुट्टया,महाराष्ट्र / कामगार दिन, माहे मे-जून, २०१८ ची उन्हाळी सुट्टी, माहे जुलै २०१८ मध्ये येणारा श्री गुरुपौर्णिमा उत्सव तसेच शताब्दी वर्षाचे अंतिम पर्वात श्री साईंचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. याकालावधीत श्री साईंचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढते रहाणार असल्याने,देणगीदार भक्तांची संख्या ही वाढती राहणे स्वाभाविक आहे, त्यामुळे प्रसादरुपाने चांदी नाणी अधिक वाटप होतील, असा अंदाज आहे. या बाबीचा विचार करतां, वर नमुद केलेली शिल्लक चांदी नाणी जास्तीत जास्त साधारणतः दि.२५ जून, २०१८ पर्यन्त पुरतील, असा अंदाज आहे.

**०५.** उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मध्ये नमूद केलेप्रमाणे, माहे जुलै २०१७ ते माहे एप्रिल, २०१८ अखेर भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून तयार करुन घेणेत आलेल्या १०००० नग चांदी नाणीसाठी आलेला एकूण खर्च रुपये १,३७,३६,०३९/- मात्रचा विचार करतां, २० ग्रॅम वजनाची पादुका प्रतिमा असलेली शुध्द चांदीचे ०१ नग नाणे बनविणेसाठी सरासरी पूर्णाकिंत रक्कम रुपये १,३७४/- मात्र खर्च आलेला आहे.

**०६.** याव्यतिरिक्त दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी चांदी नाणी आणणेकामी संस्थानचे प्रतिनिधी भारत सरकार टंकसाळ, मुंबई येथे समक्ष गेले होते. त्यावेळेस भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचे विपणन अधिकारी श्री. शोएब शेख व श्री. पंकज चेहेडी यांनी चर्चेचे दरम्यान असे सांगितले की, संस्थान व्यवस्थापनाने एकाच वेळेस व एक वर्षाचे कालावधीत आवश्यकतेनुसार ४ टप्प्यात एकूण १०००० नग चांदीची नाणी पुरवठा करणेचा कार्यादेश दिलेस, सध्या चांदीचे बाजारभावातील दर कमी असल्याने साधारणतः ०१ नग चांदी नाण्यामागे रुपये १५० ते २०० मात्रचा फायदा होणेची शक्यता आहे. या बाबीमध्ये १०००० नग चांदी नाणीचा पुरवठा होईपावेतो दर निश्चित व एकच राहतील.

(ब) प्रस्ताव- रक्कम रुपये २५,०००/- मात्र वा त्यापेक्षा जास्त देणगी देणारे देणगीदार साईभक्तांना संस्थान व्यवस्थापना मार्फत प्रसादरुपाने भेट द्यावयाचे २० ग्रॅम वजनाच्या श्री साईबाबांच्या पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी संपत आलेली आहेत. त्यासाठी उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ मध्ये नमूद केलेल्या सविस्तर विवेचनास अनुसरुन, सदर नाणी भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून नव्याने १०००० नग एका वर्षाचे कालावधीत आवश्यकतेनुसार ४ टप्प्यात (२५०० नग प्रति टप्पा) बनवून घेणेकामी, तसेच यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१८** **जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रु.१ कोटी अर्थसहाय्य मागणीचे प्रस्तावावर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय, अहमदनगर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सशस्त्र सेना ध्वजदिन २०१७ निधी संकलनाबाबत जा. क्र. १३१२/१/जिसैका-३, दि. २९ जानेवारी २०१८ अन्वये ध्वजदिन निधीसाठी खालीलप्रमाणे पत्र पाठविले आहे.

सदर पत्रात, भारताला स्वातंत्र मिळून ७० वर्ष होत आहेत. या काळात तीन युद्धे तसेच इतर अनेक लढायांना आपले जवान सामोरे गेले आहेत. आजही आपल्या देशाच्या उत्तर सीमा धगधगतच आहेत. या सर्व युद्धात आपल्या सैनिकांनी केलेल्या पराक्रमाची शर्थ बलिदान, त्याग व सोसलेल्या यातना यांचे विस्मरण होऊन चालणार नाही.

"मातृभुमिच्या संरक्षणाबरोबर देशातंर्गत उद्भवणा-या कायदा व सुव्यवस्था विषयक समस्या, भुकंप, महापूर अपघात या सारख्या असंख्य आपत्तीत दुर्देवी नागरीकांच्या सहाय्याला तत्परतेने व समर्थपणे धावून केलेल्या बहुमोल कामगिरीचा विसर भारतीयांना कधीही पडणार नाही. भारतीय सरहद्दीवर तसेच देशातंर्गत

मोहिमेमध्ये दरवर्षी अनेक सैनिक वीरगती प्राप्त होतात.तसेच असंख्य जखमी व अपंगही होतात. त्यांचे ऋुण आपणा सर्वांवर आहे. त्याच बरोबर त्यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी ही आपणावर आहे. आपण देशात सुरक्षित आहोत, याचे श्रेय सीमेवर हुतात्म स्विकारलेल्या हजारो शहिदांना व आजही प्राणपणाने लढणा-या वीरसैनिकांना द्यावे लागेल''.

या सैनिकांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७, डिसेंबर हा दिवस सर्वत्र ध्वजदिन म्हणून साजरा करण्यात येऊन ध्वजदिन निधी संकलीत करण्यात येतो. सदर निधीचा विनियोग युध्दात शहीद होणा-या वीरांच्या व अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटूंबांकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि पुनर्वसनासाठी केला जातो. त्यासाठी श्री साईबाबा संस्थानकडून रक्कम रू. १कोटी (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी) आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती केली आहे.

**<u>अधिनियमातील तरतूद</u> :-** सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७ (६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतूद आहे.

**<u>मागील वर्षीची कार्यवाही</u> :-** मागील वर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१८ नुसार व विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रं. सासंवि१०१७/४३प्र. क्र.१८४/का. १६ दि.०८.१२.२०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचा-याकडून रक्कम रू.२,७१,९७५/- मात्र व उर्वरीत संस्थानची रक्कम रू. ४८,२८,०२५/- असे एकूण रक्कम रू.५१ लाख मात्र जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यात आलेली आहे. जा. क्र. १३०३/जिसैकका-३, दि.०१.०३.२०१८ नुसार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांचे स्वाक्षरीचे रु. ५१.०० लक्षचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

यावर्षी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांनी रक्कम रू.१ कोटी मात्रची मागणी केलेली असून संस्थान कर्मचारी यांचे पगारातून कपात करून जमा होणारी रक्कम रू. २,७३,७८५/- खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे आहे. मात्र प्रत्यक्ष रक्कम अदा करतेवेळी सेवानिवृत्त/बडतर्फ कर्मचारी यांचेमुळे संस्थान आस्थापनेवरील कर्मचारी कमी होऊ शकतात. त्यामुळे कर्मचारी कपात रकमेतही फरक पडू शकतो.

| अ.नं. | वेतन बॅन्ड | एकूण अधिकारी कर्मचारी | प्रतिअधिकारी/ कर्मचारी वसूली | वसूली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ) १५६००-३९१०० | १० | **३००** | ३,०००.०० |
| ०२ | (उपअभियंता व शिक्षक) १५६००-३९१०० | ७७ | **३००** | २३,१००.०० |
| ०३ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ९३००-३४८०० (पो. उपनिरिक्षक) | ०१ | **२४०** | २४०.०० |
| ०४ | ९३००-३४८०० (अधिक्षक व इतर) | ३९३ | **२४०** | ९४,३२०.०० |
| ०५ | ५२००-२०२०० | ७०२ | **१२५** | ८७,७५०.०० |
| ०६ | ४६५०-१७४०० (अर्धवेळ शिक्षक ९३००-३४८००) | ०२ | **१००** | २००.०० |
| ०७ | ४४४०-७४४० (वर्ग ४ कर्मचारी) | ८५३ | **७५** | ६३,९७५.०० |
| ०८ | फिक्स पे | १२ | **१००** | १,२००.०० |
| | **एकूण कर्मचारी संख्या– २०५०** | | **कर्मचारी वसूली रक्कम रू. २,७३,७८५.००** | |

उपरोक्त तक्त्यातील कर्मचारी वसूली एकूण रक्कम रू. २,७३,७८५/- व मा. व्यवस्थापन समितीने संस्थानकडून देय होणारी/ मंजूर केलेली रक्कम मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय अ.नगर यांचेकडे जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी उपलब्ध द्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय:-

१) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सनिक कार्यालय, अहमदनगर यांना महाराष्ट्र शासनाकडून सशस्त्र सेना ध्वजदिन २०१७ निधी संकलनाकरिता संपूर्ण अहमदनगर जिल्हयासाठी रु.१,८४,९८,४८०/- (रुपये एक कोटी चौ-यांशी लाख अठ्ठयान्नव हजार चारशे ऐंशी मात्र) तिके उद्दीष्ठ ठरवून दिलेले आहे. मात्र त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे रु. १ कोटी मात्रची मागणी केलेली आहे.

२) सशस्त्र सेना ध्वजदिन २०१६ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून रु. ५१ लाख निधी देण्यात आलेला आहे.

३) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३०२३ कोटी मात्र रुपयांचा कृतीआराखडयास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु निधी प्राप्त नाही त्यामुळे संस्थानचा स्वतःचा निधीही खर्च होणार आहे.

४) मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव मंजूर झालेनंतर त्यास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल.

५) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सनिक कार्यालय, अहमदनगर यांना निधी आदा केलेनंतर मा. जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

तरी संस्थान कर्मचारी पगारातून जमा होणारी रक्कम व मा. व्यवस्थापन समितीने मंजूर केलेली रक्कम संकलीत करून मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सनिक कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रक्कम देणेबाबत व रक्कम द्यावयाची झाल्यास किती रक्कम द्यावी याबाबत निर्णय होण्यासाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हाधिकारी तथा जिल्हा सनिक कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी संस्थान कर्मचाऱ्यांच्या वर्गणीसह रु.१ कोटी अर्थसहाय्य देण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१९** **दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना कुटूंब आधार योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसन निधीचे विनीयोगास ६ महिने मुदतवाढ देण्याची त्यांनी केलेल्या अर्जावर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी कुटुंब आधार योजनेच्या माध्यमातून योजना राबविली आहे. पोशिंद्याचा आत्महत्या हा कलंक पुसण्याच्या माध्यमातून त्यांना प्रयत्न सुरू केला आहे. त्यास अनुसरून त्यानी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे आर्थिक अनुदान मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- दि.२७ .०३.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाचे बठकीत निर्णय क्र. २२९ अन्वये चर्चा होऊन दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून आधार देत आहे. त्यामुळे मानव जातीचे कल्याण या उद्दात्त हेतूने छाननी समितीचे मान्यतेने दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस तुर्तास रु. १ कोटी मात्र रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात यावी व सदरहू रकमेचा विनीयोग ते कशा प्रकारे करणार याबाबतचा त्यांचेकडून अहवाल घेण्यात यावा.

तसेच सदरहू अनुदान देणेपुर्वी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

छाननी समितीचा निर्णय:- आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांचे पुर्नवसनासाठी आर्थीक मदत देणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन, दि.२७ .०३.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २२९ अन्वये रक्कम रु.१ कोटी मात्र अनुदान स्वरुपात आर्थिक मदत दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना देणेस मान्यता देण्यात आली. परंतु वरील आर्थिक मदत वितरण करणेपुर्वी दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेकडून रु. १ कोटी मात्र रकमेचा विनीयोग ती संस्था कशाप्रकारे, कोणत्या प्रकल्पातंर्गत व किती दिवसात करतील याची माहिती व बाधीत कुटुंबाची यादीसह सादर करावी. तसेच छाननी समितीचे मदतीबद्दलचे निकष क्र. २ ते ६ यांची पुर्तता करून घेण्यात यावी. त्याबाबत सर्व अटी शर्ती नमुद करून दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा, असे ठरले.

शासन निर्णय :-

१. शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९१२/प्र. क्र.९८/का.१६ दि. ०१ ऑगस्ट २०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतुदीस अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, जिल्हा यवतमाळ या संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या ''कुटूंब आधार योजना'' या योजनेसाठी एक विशेष बाब म्हणून रु. १ कोटी इतके अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामधील अट क्रं. २ व ३ खालीलप्रमाणे आहे.

**२.** श्री संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानला सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबासाठी शेळी पालन, गोपालन, किरणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने करणे बंधनकारक राहील.

३. श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या सदर निधीचा उपयोग योग्य प्रकारे करण्यात आला आहे. याबाबत श्री साईबाबा संस्थानकडून दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ या संस्थेच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण व पडताळणी करण्यात येईल.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा. छाननी समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेला रु.१.००कोटी देणेपुर्वी करारनाम्याच्या अटी शर्ती मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ रोजीचे सभेत सादर केल्या असता, त्यावर निर्णय क्र. ७०८ अन्वये चर्चा होऊन, दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांना मान्यता देण्यात आली.

करारनामा:- दि. २४.०८.२०१४ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तर्फे मुख्यलेखाधिकारी यांनी व दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेतर्फे सचिव श्री विजय पुरूषोत्त्म कद्रे यांचेशी अटी शर्ती नुसार करारनामा झाला आहे.

इंडेम्निटी बॉंड:- याबाबत संस्थान पॅनलवरील ॲड. यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना रक्कम रु.१ कोटी देणेपुर्वी त्यांचेकडून क्षतीपुर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बॉंड) लिहून घेणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार दि. ०३.१०.२०१७ रोजी दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे कडून क्षतीपुर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बॉंड) लिहून घेण्यात आलेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- दि.२५ .०९.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाचे बैठकीत निर्णय क्र. ७९२ अन्वये मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद, खंडपीठात सदर अनुदान वितरणासंदर्भात जनहित याचिका दाखल केलेबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. पी. आय. एल. एस. टी नं. ३००६०/२०१७ मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल आहे. परंतु मा. उच्च न्यायालयाने निधी देण्यास मनाई आदेश दिलेला नाही. याकरिता पंडीत दिनदयाळ बहुउद्देशीय संस्था यवतमाळ यांना मंजूर झालेला निधी देणेस हरकत नाही. असे समिती सदस्यांचे मत झाले व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने सुरू करावी, असे ठरले.

दिनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेला रु. १.०० कोटी देणेसाठी मा. व्यवस्थापन समिती, छाननी समिती व महारष्ट्र शासन, यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच सबंधीतांशी छाननी समितीच्या निर्णयाप्रमाणे करारनामा, इंडेम्निटी बॉंड झालेला आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा:-** मात्र विधी विभागाचे दि. ०९.०९.२०१७ रोजीच्या टिपण्णीनुसार मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद, खंडपीठात सदर अनुदान वितरणासंदर्भात जनहित याचिका दाखल केल्याचे दिसते. त्यासंदर्भात दि. २५.०९.२०१७ रोजीचे सभेत सदरहू विषयावर विस्तृत चर्चा झाली. पी. आय. एल. एस. टी नं. ३००६०/२०१७ मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल आहे. परंतु मा. उच्च न्यायालयाने निधी देण्यास मनाई आदेश दिलेला नाही. त्यामुळे पंडीत दिनदयाळ बहुउद्देशीय संस्थेस अनुदान देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीने सहमती दर्शविली आहे.

रक्कम आदा:- मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी त्यांचा बचत खाते नंबर- 34537996235, IFSC- SBIN0011428 असा कळविला होता. सदरची रक्कम रु. १,००,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी मात्र) RTGS द्वारे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा यवतमाळ येथे बचत खात्यामध्ये दि. ९.१०.२०१७ रोजी जमा झालेली आहे.

शासन निर्णय अट क्रं.२:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी विधी व न्याय विभागाचे निर्णयाप्रमाणे दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ रक्कम आदा करण्यात आली. शासन निर्णयातील अट क्रं. २ अन्वये “श्री संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानला सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबासाठी शेळी पालन, गोपालन, किरणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने करणे बंधनकारक राहील.” अशी अट घालण्यात आली होती.

अहवाल मागणी:- दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना अनुदान देऊन तीन महिने झालेनंतर जा. नं. एसएसएस/वशी-लेखा-अनुदान/५५९४/२०१८ दि. २० जानेवारी २०१८ अन्वये १) साहित्य वितरणाची सद्यस्थिती काय आहे २) जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेली आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मंजूर यादीची प्रत पाठवावी. ३) साहित्य वितरणाची कार्यवाही सुरू केली असल्यास, आतापर्यंत वितरीत केलेल्या साहित्याचा तपशील खालील नमुन्याप्रमाणे पाठविण्यात यावा.

| अ न. | लाभार्थींचे नाव व पत्ता | जिल्हाधिका-यांच्या आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या यादीतील अनुक्रमांक | वाटप केलेले साहित्य | साहित्याची किंमत |
|---|---|---|---|---|
| | | | | |

तसेच उपरोक्त नमुन्यातील अहवाल दरमहा १० तारखेपर्यंत पाठविण्यात यावा. असे कळविण्यात आले होते.

माहिती:- त्यास अनुसरून दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे दि. ०८.०२.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात त्यांनी आमचे संस्थेतर्फे प्रकल्पाचे अंमलबजावणीकरिता उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे. २) संस्थानला सादर केलेल्या ३८८ परिवाराचे सर्वेक्षण सुरू केले असून ७२ कटुंब जिल्हाधिकारी यांनी पात्र असल्याचे कळविले असून त्यापकी ५२ कुटुंबाची आवश्यक कागदपत्र संकलित करण्यात आली असून उर्वरीत परिवारांच्या कागदपत्रांचे संकलनाचे कार्य चालु असुन सोबत व्यवसाय निश्चितीचे काम देखील सुरु आहे. ३) आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवाराकरिता आरोग्य शिबीराचे आयोजन संस्थेच्या दीनदयाल प्रबोधिनी मध्ये करण्यात आले असून त्यासाठी पुणे येथील ख्यातनाम स्त्रीरोग तज्ञ यांनी तपासणी करून उपचार केले आहेत. ४) पात्र कुटुंबातील विद्यार्थ्यांना शक्षणीक अर्थसहाय्य देखील करण्यात आले. ५) कुटुंब आधार योजनेचा एक भाग म्हणून भाऊबीज निमीत्त परिवारांना भेट देवून साडी चोळी देण्यात आली. ६) पात्र परिवारांचे सर्वेक्षण तसेच कागदपत्रे संकलनाचे काम पुर्ण झालेनंतर व्यवसाय निश्चितीकरिता तालुकानिहाय बठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यानंतर या परिवारांना संबंधीत व्यवसायाचे तज्ञांकडून प्रशिक्षण देण्याची सुद्धा संस्थेची योजना आहे. त्यानंतर सबंधीत परिवारांना निवडलेल्या व्यवसायानुसार सहाय्य करण्यात येणार आहे. ७) पात्र परिवारांना वस्तु वितरीत करतांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पदाधिका-यांना निमंत्रीत करण्यात येईल असे कळविले आहे.

अहवाल मागणी:- त्यानंतर पुनश्चः जा. नं. एसएसएस/वशी-लेखा-अनुदान/६८५६/२०१८ दि. २१ मार्च २०१८ अन्वये दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेशी शासन निर्णयातील अट क्रं. २ अन्वये “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबियांसाठी शेळी पालन, गोपालन, किराणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी सदर संस्थेने बंधनकारक राहील” अशी तरतुद आहे.

आपणांस अनुदान दिलेल्या रकमेचा कालावधी दि. ०८.०४.२०१८ रोजी पुर्ण होत असून, आपणांस यापुर्वीच्या पाठविलेल्या पत्राप्रमाणे कार्यवाही करून, खर्च झालेला निधीचे अंतिम विवरण सादर करावे तसेच शिल्लक राहिलेला निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे जमा करण्यात यावा. असे कळविण्यात आले होते.

मुदतवाढ मिळणेबाबत पत्र:- त्यास अनुसरून दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचे दि. १५.०३.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी ९३ परिवार शासकीय पात्र यादीत असल्याचे आढळून आले आहेत. कागदपत्र संकलनाचे तसेच या परिवाराशी चर्चा करून व्यवसाय निश्चितीचे कार्य आजही सुरू आहे.

या परिवारासोबत आजपर्यंत झालेल्या प्राथमिक चर्चेनुसार अधिकतम परिवार शेळीपालन व दुग्धव्यवसाय करण्यात इच्छुक आहे. परंतु यावर्षी विशेषतः यवतमाळ जिल्हयात अत्यंत कमी पाऊस पडल्यामुळे भीषण दुष्काळ आहे. लोकांना पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. अशा अवस्थेत पशुपालनसारखा व्यवसाय करणे अत्यंत अवघड आहे. त्याकरिता येणा-या पावसाळयाची वाट पहाणे क्रमप्राप्त आहे.

या परिवाराच्या मागणीनुसार सध्याच्या अवस्थेत शेळीपालन अथवा दुग्धव्यवसाय सुरू करणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे त्यांनी संस्थेला पावसाळा सुरू झाल्यानंतर व पुरेशे पाणी व चारा उपलब्ध झाल्यानंतर त्यांना शेळीपालन अथवा दुग्ध व्यवसाय सुरू करणे जास्त उपयुक्त आणि संयुक्तीक होईल.

तेव्हा आपणांस विनंती की, सदर परिवारांचे पुर्नवसनाकरिता "कटुंब आधार योजनेअंतर्गत" संस्थेस प्राप्त झालेल्या निधीचा विनीयोग करण्यासाठी ६ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी केलेली निधी विनियोगास मुदतवाढ मागणी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय:-

१) दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांना रक्कम विनीयोगाचा कालावधी दि. ०८.०४.२०१८ रोजी पुर्ण झालेली आहे.

२) दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांना रक्कम विनीयोगाचा कालावधी ६ महिने वाढवून देणेचे विनंतीवर निर्णय होणेबाबत.

३) दिनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी दिलेल्या निधीतून **अ)** आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवाराकरिता आरोग्य शिबीराचे आयोजन संस्थेच्या दीनदयाल प्रबोधिनी मध्ये करण्यात आले असून त्यासाठी पुणे येथील ख्यातनाम स्त्रीरोग तज्ञ यांनी तपासणी करून उपचार केले आहेत. **ब)** पात्र कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणीक अर्थसहाय्य देखील करण्यात आले. **क)** कुटुंब आधार योजनेचा एक भाग म्हणून भाऊबीज निमीत्त परिवारांना भेट देवून साडी चोळी देण्यात आली. सदर खर्च संस्थेने सादर केलेला नाही.

४) दि. ०१ ऑगस्ट २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील अटि व शर्तीनुसार कुटुंब आधार योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांच्या पुर्नवसनासाठी त्यांना गोपालन, शेळीपालन, किराणादुकान, आटाचक्की शिवणकाम मशिन इत्यादि उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी रु. १ कोटी दिलेले आहेत. संस्थेने आरोग्य तपासणी, शैक्षणीक सहाय्य, भाऊबीज निमित्त परिवारांना साडीचोळी इत्यादि बाबींवर खर्च केलेला आहे. या बाबी आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे उत्पन्नांचे साधन होऊ शकत नाही.

५) सदर संस्थेला दि. दि. ९.१०.२०१७ रोजी रु. १ कोटी वितरीत करण्यात आलेले आहे. संस्थेने ६ महिन्यांचे कालावधीत फक्त ९३ लाभार्थ्यांची निवड केल्याचे कळविले आहे. तसेच आजपावेतो किती खर्च झाला आहे, ते देखील कळविलेले नाही. त्यामुळे पुढील ६ महिन्यातही संस्थेकडून उद्दिष्ठ पुर्ती होईल असे वाटत नाही.

६) मा. व्यवस्थापन समितीने ६ महिन्यांची मुदतवाढ दिल्यास विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासनाची मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल. व सबंधीतांना तसे कळविण्यात येईल.

७) मुदतवाढ न मिळाल्यास झालेला तपशीलवार खर्च मागविता येईल व अनुज्ञेय खर्च वजा जाता शिल्लक रक्कम परत मागविता येईल.

उपरोक्त बाबींवर निर्णयास्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना कुटूंब आधार योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसन निधीचे विनीयोगास ६ महिने मुदतवाढ देण्यास व तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसारच सदरची रक्कम खर्च करण्यात यावी याबाबत संबधीतांना सुचीत करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.२०** **मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipmant for Eye Rediology Cardiology Department " साठी रक्कम रुपये २.३५ कोटी आर्थिक मदत देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १५.०४.२०१८ रोजीच्या मा. मुख्यमंत्री महोदय यांचेसोबत आपल्या झालेल्या चर्चेनुसार माँ भवानी हॉस्पीटल, नागपूर साठी आवश्यक वद्यकीय उपकरणे खरेदीसाठी रु. २.३५ कोटी अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला असल्याचे श्री पांडूरंग मेहर, अध्यक्ष श्री भवानी माता सेवा समिती नागपूर यांनी मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना दि. २३.०४.२०१८ रोजीच्या ई मेल द्वारे कळविले आहे. त्यानुसार श्री पांडुरंग मेहर, अध्यक्ष श्री भवानी माता सेवा समिती, नागपूर यांनी मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रस्ताव पाठवून अर्थसहाय्य करणेबाबत विनंती केली आहे.

सदर प्रस्तावात त्यांनी श्री भवानी माता सेवा समितीच्या वतीने नागपूर मधील पारडी भागात "मॉ भवानी हॉस्पीटल" चे निर्माण कार्य सुरू केलेले आहे. या हॉस्पीटलमध्ये गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी अत्याधुनिक सुविधेसह एकूण ११० बेडची व्यवस्था करण्यात येणार आहे असे त्यांचे प्रस्तावात नमूद आहे. संस्थेमार्फत सामुहिक विवाह, धमार्थ दवाखाना, शक्षणीक व शालेय वस्तुंचे वितरण, भोजन वितरण अन्नदान, महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आदि उपक्रम राबविले जातात.

श्री भवानी माता सेवा समिती, नागपूर यांचा माँ भवानी हॉस्पीटल निर्मितीचा उपक्रम प्राप्त दान व सामाजिक सहभागातून पुर्ण होणार आहे. या सेवाभावी कार्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून "Equipments for Eye, Rediology, Cardiology Department" साठी रक्कम रु. २.३५ कोटी आर्थिक सहाय्य करणेबाबत कळविले आहे.

अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-

अधिनियम कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, **निरीश्रित** अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा तर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय:-

१) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी प्रमाणेच श्री भवानी माता सेवा समिती ही एक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था असून संस्थेला आयकर विभागाचे ८० जी चे प्रमाणपत्र प्राप्त आहे. तसेच संस्थेने सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन केले असता, संस्थेला वस्तु रोख व तर माध्यमातून मोठया प्रमाणात देणग्या प्राप्त झाल्या असल्याचे दिसते. अशा प्रकारच्या भारतात अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे एकाच संस्थेला अशाप्रकारे अनुदान देणे योग्य होणार नाही.

३) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३०२३ कोटी रुपयांचा कृतीआराखडयास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु निधी प्राप्त नाही त्यामुळे संस्थानचा स्वतःचा निधीही खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्य होणार नाही, असे वाटते.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipmant for Eye Rediology Cardiology Department " साठी रक्कम रुपये २.३५ कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी छाननी समितीची व शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

**विषय नं.२१** **शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षीत असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे..

प्रस्तावना– संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा असेबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीच्या सभेत निर्णय क्रं.२१२ अन्वये निर्णय झालेला आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.टीपीएस-१६१२/ ५२२ (न)/ पुर्नबांधणी क्रं.५८/प्र.क्र./१०३/१२ नवी-९ दि.२८/१२/२०१२ अन्वये प्रारुप विकास योजना-शिर्डी (वाढीव हद्द) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये भागश: मंजूरीबाबत अधिसुचना तसेच सारभूत बदल्यांच्या पुर्नप्रसिध्दीबाबत सुचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत.

शिर्डी वाढीव विकास आराखडयात संस्थानसाठी खालीलप्रमाणे आरक्षणे दर्शविलेली आहेत.

| अ.नं. | आरक्षण क्रं. | आरक्षणाचा हेतू | बाधीत सर्वे नं. | क्षेत्र हे.आर.चौमी. | भूसंपादन संस्था |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पार्कींग | २०७ प.,२०८ प.,२१५ ते २१९ प. | २.५९.०० | शिर्डी नगरपंचायत/ शिर्डी साईबाबा संस्थान |
| २ | २ | मनोरंजन पार्क | २०५ प.,२०६ प. | २.९७.०० | श्री साईबाबा संस्थान |
| ३ | ४ | वृध्दाश्रम | २२१ प. ते २२३ प. | १.००.०० | श्री साईबाबा संस्थान |
| ४ | ७ | संस्थान हेतू (पिलग्रिम ॲमिनिटीज) (भक्तनिवास,सांस्कृतिक केंद्र, समाज भवन, मनोरंजन केंद्र इ.) | २०२ प.,२०३ प. | २.००.०० | शिर्डी नगरपंचायत/ श्री साईबाबा संस्थान |
| ५ | २२ | शैक्षणिक कारणासाठी | १९५ प.,१९६ प.,२१२ प.,२१३ प. | ६.५५.०० | श्री साईबाबा संस्थान |

सदर वाढीव विकास आराखडयास संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी संबंधीची व प्रस्तुत आरक्षणापैकी संस्थानला जमीन खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबतची माहिती यासोबत परिशिष्ट अ मध्ये सादर केलेली आहे. त्यात संस्थानसाठीचे आरक्षण क्रमांक,आरक्षण हेतू,जागेचे लोकेशन,भूसंपादन संस्था,आरक्षित केलेले एकूण क्षेत्र,आरक्षणामुळे बाधीत होणारे सर्वे नंबर, एकूण आरक्षणापैकी संस्थानने खरेदी केलेले क्षेत्र,खरेदी करावयाचे राहीलेले एकूण क्षेत्र, उर्वरित क्षेत्रापैकी जमीन खरेदी देणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जदाराचे नाव व अर्जाची तारीख,खरेदी द्यावयाचे सर्वे नंबर,क्षेत्र आणि सन २०१७-१८ चे रेडी रेकनरप्रमाणे जमीनीचे दर इ.बाबतची सविस्तर माहिती सोबतचे परिशिष्ट अ मध्ये सादर केलेली आहे. तसेच श्री साईबाबा संस्थानकरीता आरक्षित असलेल्या

शिर्डी (बिरेगाव) वाढीव विकास आराखडयातील क्षेत्र,सर्वे नं.,स्थळदर्शक इ.बाबतची माहीती दर्शविणारा बिनस्केली कच्चा नकाशा परिशिष्ट ब मध्ये यासोबत सादर केलेला आहे.

तसेच उक्त वाढीव विकास आराखडयातील आरक्षित असलेल्या क्षेत्राचे झोनबाबतची माहीती मा.सहायक संचालक, नगररचना,अहमदनगर यांचेकडून मागविली असता त्यांनी सदर क्षेत्राचा विकास आराखडा नकाशा इकडेस सादर केलेला आहे. तो परिशिष्ट क मध्ये यासोबत सादर केलेला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता उक्त वाढीव विकास आराखडयातील आरक्षित क्षेत्र हरित पट्टयात येत नसलेचे दिसून येते.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त आरक्षणनिहाय जमीनीसंबंधी खालीलप्रमाणे अभिप्राय सादर करणेत येत आहे.

१) आरक्षण क्रं.१ पार्कीग साठी एकूण क्षेत्र २.५९ हेक्टर इतके आरक्षित केलेले असून त्यापैकी ०.८० आर इतके क्षेत्र संस्थानने खरेदी केलेले आहे. आरक्षित क्षेत्रापैकी खरेदी करावयाचे राहीलेले क्षेत्र १.७९ आर इतके आहे. आज मितीस संस्थानकडे उपरोक्त उर्वरित क्षेत्रापैकी १.४०.११ इतके क्षेत्र खरेदी देणेसाठीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदरचे क्षेत्र श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचे पूर्व बाजूस असून श्रीं चे मंदिरापासून सुमारे २ ते २.५ किमी. अंतरावर असून नगरपंचायतीच्या रस्त्यालगत पूर्वेस आहे. सदरचे क्षेत्राची भूसंपादन संस्था शिर्डी नगरपंचायत/श्री साईबाबा संस्थान अशी दर्शविलेली आहे. पार्किंगसाठी संस्थानला मंदिराच्या सर्व बाजूने वाहने पार्किंगसाठी जागेची आवश्यकता आहे. सन २०१७-२०१८ च्या रेडीरेनकनर नूसार जमीनीचा दर प्रती आर रु. १०,७०,०००/- असून १.७९ हे.आर जागेसाठी रक्कम रु.१९,१५,३०,०००/- एवढी मोबदला रक्कम द्यावी लागणार आहे सदरची मोबदला रक्कम अतिशय जास्त आहे त्यामुळे याबाबत मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घ्यावा.

२) आरक्षण क्रं.२ मनोरंजन पार्क साठी एकूण क्षेत्र २.९७ हेक्टर इतके आरक्षित केलेले आहे. सदर क्षेत्र खरेदी देणेकामी जमीन मालकांनी संस्थानकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदरचे क्षेत्र श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचे पूर्व बाजूस असून श्रीं चे मंदिरापासून सुमारे २.५ ते ३ किमी. अंतरावर आहे. सदरचे मनोरंजन पार्कचे आरक्षण सर्वे नं.२०५ प☐ि २०६ प☐ा क्षेत्रावर दर्शविलेले असून सदर आरक्षित क्षेत्रातून पाटबंधारे विभागाचे ड्रेनेज चर व रस्ता गेलेला असल्याचे दिसून येते त्यामुळे सदर आरक्षणातील क्षेत्राचे दोन भाग पडतील व सदर क्षेत्र सलग राहणार नाही. संस्थान मालकीच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील जमीनी गट नं.१९८,१९९,२००,२०१ या क्षेत्रामध्ये संस्थानचे साईसृष्टी,तारांगण,म्युझियम इ. प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यामुळे प्रस्तुत आरक्षित क्षेत्र संस्थानला मनोरंजन पार्कसाठी घेणेचे प्रयोजन राहात नाही.

३) आरक्षण क्रं.४ वृध्दाश्रम साठी एकूण क्षेत्र १.०० हेक्टर इतके आरक्षित केलेले आहे. सदरचे क्षेत्र खरेदी देणेकामी जमीन मालकांनी संस्थानकडे प्रस्ताव अद्याप सादर केलेले नाहीत. सदरचे क्षेत्र श्रीं चे मंदिरापासून सुमारे ३ किमी. पेक्षा जास्त अंतरावर असून पाटबंधारे विभागाचे ड्रेनेज चराच्या पूर्वेकडेस रस्त्याचे लगत आहे. तथापि सदर क्षेत्रामध्ये सध्यस्थितीत जमीन मालकांनी घराचे पक्के बांधकाम करुन वस्ती वस्ती केलेली आहे. संस्थानने मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील शेती महामंडळाची जमीन क्षेत्र ५२.३५ हेक्टर इतकी कायम खरेदी मिळणेकामी शेती महामंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. संस्थानला वृध्दाश्रम बांधावयाचा झाल्यास शेती महामंडळाकडील खरेदी करावयाच्या प्रस्तावित क्षेत्रात वृध्दाश्रम प्रस्तावित करता येईल. यास्तव आरक्षण क्रं.४ वृध्दाश्रमासाठी आरक्षित केलेले क्षेत्र संस्थानला खरेदी करण्याचे प्रयोजन राहात नाही.

४) आरक्षण क्रं.७ पिलग्रिम ॲमिनिटीज (भक्तनिवास,सांस्कृतिक केंद्र,समाज भवन,मनोरंजन केंद्र इ.) साठी एकूण क्षेत्र २.०० हेक्टर इतके आरक्षित केलेले आहे. सदरचे क्षेत्र श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचे पूर्व बाजूस असून श्रीं चे मंदिरापासून सुमारे २ ते २.५ किमी. अंतरावर आहे. सदर क्षेत्राची भूसंपादन संस्था शिर्डी नगरपंचायत/श्री साईबाबा संस्थान अशी संयुक्त दर्शविलेली आहे. सदर आरक्षण क्षेत्रापैकी संस्थानने १ हे.२० आर इतके क्षेत्र खरेदी केलेले आहे तसेच या क्षेत्राचा अद्यापपावेतो कोणत्याही प्रयोजनासाठी वापर केलेला नाही. उर्वरित क्षेत्र खरेदी देणेकामी संबंधीत जमीन मालकांनी संस्थानकडे अद्याप प्रस्ताव सादर केलेले नाहीत तसेच संस्थानने मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील शेती महामंडळाची जमीन क्षेत्र ५२.३५ हेक्टर आर इतके कायम खरेदी मिळणेकामी शेती महामंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर खरेदी करावयाच्या प्रस्तावित क्षेत्रात भविष्यात पिलग्रिम ॲमिनिटीज प्रस्तावित करता येईल. यास्तव संस्थानसाठी सदर आरक्षण क्रं.७ चे प्रयोजन राहात नाही.

५) आरक्षण क्रं.२२ शैक्षणिक हेतूसाठी एकूण क्षेत्र ६.५५ हेक्टर इतके आरक्षित केलेले असून त्यापैकी संस्थानने क्षेत्र २.१७ हेक्टर इतके क्षेत्र यापूर्वीच खरेदी केलेले आहे. उर्वरित क्षेत्रापैकी क्षेत्र ३.३६.६२ हेक्टर इतके खरेदी देणेसाठीचे प्रस्ताव संस्थानकडे जमीन मालक यांनी सादर केलेले आहेत. सदरचे क्षेत्र शिर्डी-साकुरी शिव बिरेगाव बन या ठिकाणी असून श्रीं चे मंदिरापासून सुमारे ३ किमी. अंतरावर आहे. सदर क्षेत्राचे पूर्व व दक्षिण बाजूस नगरपंचायतचे रोड आहेत.प्रस्तावित शैक्षणिक संकुलाचे बांधकाम निमगांव को-हाळे येथील ग.नं १८३ क्षेत्र (५.४०) हे.आर मध्ये करणेबाबत व्यवस्थापनाचे सभेत निर्णय झालेला आहे त्यानुसार इंग्लीश मिडीयम स्कुल, कन्या विद्या मंदीर,विद्यालय,महाविद्यालयाकरिता इमारती बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत आराखडा तयार करणेत आला आहे.त्यानूसार प्रस्तावित शैक्षणिक संस्था मौजे निमगांव को-हाळे येथे प्रस्तापित झालेनंतर प्रस्तुत आरक्षित क्षेत्र संस्थानला शैक्षणिक हेतूकरिता खरेदी करण्याचे प्रयोजन राहत नाही.

उपरोक्त प्रस्ताव आरक्षणातील जमीनी खरेदी करणेकामीच्या धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षीत असलेल्या शिर्डी व परिसरातील शेतजमीनीच्या रेडीरेकनरचे दर खूपच जास्त आहे. त्या तुलनेने शेती महामंडळाच्या जमीनीचे दर कमी असुन सदर जमीनी खरेदी करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच प्रस्तावीत आरक्षणाखालील प्रयोजनासाठी संस्थानकडून यापुर्वीच अन्य ठिकाणी प्रकल्प प्रस्तावीत आहेत. त्यामुळे तुर्त आरक्षणाखालील जमीनी खरेदी करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. यास्तव शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षीत असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी न करता त्यावरील आरक्षण रद्द करण्यासाठी संबधीतांना कळविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२** **गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास श्री साई संस्थान एम्पलॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

प्रस्ताव– गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावना– शिर्डी येथील गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ (क्षेत्र १३ चौमी) मध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी ही सोसायटी चालवत असलेला मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसाय दि.०७/११/२०१२ पासून आजअखेर चालू आहे.

उक्त सोसायटीकडून दि.०७/११/२०१३ पूर्वी एक वर्षासाठी आकारलेले भू-भाडे दरमहा रक्कम रु.४,८४०/- मध्ये दि.०७/११/२०१३ नंतर प्रति वर्षी १० टक्के प्रमाणे वाढ करुन खालील तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठी सोसायटी कडून भाडे वसूल करणेकामी म्हणजेच दि.०७/११/२०१२ ते दि.०६/११/२०१६ अखेर उक्त सोसायटीकडून वसुल करावयाचे भाडे रक्कम रु.३७,२२४/- तिकी वसुल करुन घेवून व खालील तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठीचे करारनामे पूर्वीप्रमाणेच नोटरीसमोर नोंदविणेकामी व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांचे दि.२६/०९/२०१६ रोजीचे पत्राप्रमाणे दि.०७/११/२०१६ ते दि.०६/१०/२०१७ या ११ महीन्यांच्या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.७,०८६/- + १०% रु.७०९/- = एकूण रक्कम रु.७,७९५/- तिकी निश्चित करुन त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आलेला होता.

| अ.नं. | करारनामा तारीख | मासिक भाडे | वसूल करावयाचे एकूण भाडे | वसूल झालेले एकूण भाडे | भाडे वसूल करावयाची बाकी | करारानुसार पुढील १०% दरमहा होणारी भाडेवाढ रक्कम (रकाना क्रं.३ मधील रकमेच्या १०% रक्कम) | १०% भाडेवाढ धरुन दरमहा होणारे एकूण भाडे (रकाना क्रं.३+७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०७/११/२०१२ ते दि.०६/११/२०१३ | ४,८४०/- | ५८,०८०/- | ५८,०८०/- | --- | ४८४/- | ५,३२४/- |
| २ | दि.०७/११/२०१३ ते दि.०६/११/२०१४ | ५,३२४/- | ६३,८८८/- | ५८,०८०/- | ५,८०८/- | ५३२/- | ५,८५६/- |
| ३ | दि.०७/११/२०१४ ते दि.०६/११/२०१५ | ५,८५६/- | ७०,२७२/- | ५८,०८०/- | १२,१९२/- | ५८६/- | ६,४४२/- |
| ४ | दि.०७/११/२०१५ ते दि.०६/११/२०१६ | ६,४४२/- | ७७,३०४/- | ५८,०८०/- | १९,२२४/- | ६४४/- | ७,०८६/- |
| | एकूण - | | २,६९,५४४/- | २,३२,३२०/- | ३७,२२४/- | | |

(अक्षरी रु.सदोतीस हजार दोनशे चोवीस मात्र)

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्रं.७६४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडून गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम चालविण्याच्या व्यवसायाचे, प्रस्तावात नमूद केलेनुसार भाडे वसुल करणेत यावे व पुढील कालावधीसाठी त्यांना मुदतवाढ देणेपूर्वी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेत यावी,"असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे उक्त सोसायटीकडून दि.०७/११/२०१२ ते दि.०६/११/२०१६ या कालावधीतील भाडे वसुल करण्यात येवून ळिकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४५२९/२०१७ दि.२९/११/२०१७ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६(१३चौमी.) मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुन चालविणेच्या व्यवसायास दि.०७/११/२०१६ ते दि.०६/१०/२०१७ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ देवून दरमहा भाडे रक्कम रु.७,०८६/-+ १०% रु.७०९/-= एकूण रक्कम रु.७,७९५/- ितकी निश्चित करुन त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामी मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/ २०३६/प्र.क्र.२२२/का.१६ दि.०१/०३/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ चे पोटकलम (३) नुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची जागा ११ महिन्यांसाठी भाडेतत्वावर देण्याकरीता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. यास्तव प्रस्तुत प्रकरणी दि.२०/१२/२०१२ पासून ११ महिन्यांचे करारनामे करुन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने कार्योत्तर मान्यता देता येईल. तसेच भविष्यात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करारनामा करुन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी," असेबाबत ळिकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- उक्त सोसायटीकडून मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६४ प्रमाणे दि.०७/११/२०१२ ते दि.०६/११/२०१६ या कालावधीतील भाडे अलाहीदा वसुल करणेत आलेले आहे. परिणामी उक्त सोसायटीस उक्त कालावधीसाठीची मुदतवाढ मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयाने अलाहीदा वाढवून दिलेली असलेचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर कालावधीसाठीची मुदतवाढ देणे व संपुष्टात आलेल्या कालावधीचा करारनामा करणे आणि भाडे वसुलीकामी पुन:श्च मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेचे प्रयोजन नाही,अशी धारणा आहे.

मात्र शासनाकडील उपरोक्त दि.०१/०३/२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ (१३ चौमी.) मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास दि.०७/११/२०१६ ते दि.०६/१०/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.७,०८६/-+ १०% रु.७०९/- = एकूण रक्कम रु.७,७९५/- ितकी निश्चित करुन त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामी कार्योत्तर मान्यता मिळणेसाठीचा,तसेच उक्त सोसायटीने सदर व्यवसायाची पुढील मुदत दि.०७/१०/२०१७ ते दि.०६/०९/२०१८ या ११ महीन्यांच्या कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी दि.०२/०४/२०१८ रोजी ळिकडेस सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने व मा.शासनाचे उपरोक्त दि.०१/०३/२०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन उक्त सोसायटीस दि.०७/१०/२०१७ ते दि.०६/०९/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.७,७९५/-+ १०% रु.७८०/- = एकूण रक्कम रु.८,५७५/- ितकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे ११ महिन्यांसाठीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल. त्यासाठीचा सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.७,७९५/-+ १०% रु.७८०/- = एकूण रक्कम रु.८,५७५/- ितकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग/संरक्षण विभागप्रमुख)**

---

**विषय नं.२३** **श्री साई संस्थान एम्पलॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि., शिर्डी यांना चालविण्यास दिलेल्या कियॅास्क/ गाळे यांचे मुदतवाढ व भाडे निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या कियॅास्क/गाळे यांचे मुदतवाढीबाबत व भाडे निश्चितीबाबत ..

प्रस्तावना- १)श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/११/२०१३ निर्णय क्रं.९२८ अन्वये संस्थान परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,पादत्राणेगृह,प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल चालविण्यास व तात्पुरते व्यवसाय करणेसाठी खालील ठिकाणी चालविणेस दिलेले १४ कियॅास्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१४ रोजी संपलेली होती.

| अ.नं. | ठिकाण | कियॅास्क संख्या |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग-१ परिसर | ०४ |
| २ | साईआश्रम भाग-२ परिसर | ०१ |
| ३ | साईप्रसादालय परिसर | ०१ |
| ४ | द्वारावती निवासस्थान परिसर | ०२ |
| ५ | साईउद्यान परिसर | ०२ |
| ६ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | ०१ |
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | ०३ |
| | एकूण | १४ |

**२)** पुढील मुदत वाढवून मिळणेकामीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीच्या सभेत सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.२७४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा,असे ठरले. तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या कियॅास्क/गाळे त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासन आदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेत येवून मागील अटी शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

**३)** प्रस्तुतच्या ठरावास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात १४ कियॅास्क/गाळे प्रति कियॅास्ककरीता मागील मासिक परवाना फी रु.३,०००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,०००/-+ १०% रक्कम रु.३००/-= रु.३,३००/-) रु.३,३००/- (अक्षरी रु.तीन हजार तीनशे मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१४ ते दि.०६/१२/२०१५ या एका वर्षाच्या कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन क्रमांकडील जा.क्रं.एसएसएस/मालमत्ता/३७८८/२०१५ दि.०७/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देणेत येवून मुदतवाढ देणेत आलेली असून दि.०९/१०/२०१५ रोजी करारनामा करुन घेणेत आलेला आहे.

**४)** दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२७४ अन्वये झालेल्या ठरावानुसार सदरचा प्रस्ताव क्रमांकडील जा.क्रं.एसएसएस/ मालमत्ता/४४७२/२०१५ दि.०९/११/२०१५ रोजी मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई यांचेकडे शासन मान्यतेसाठी पाठविणेत आलेला आहे.

**५)** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या १४ कियॅास्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१५ रोजी पूर्ण होत असल्याने त्यांनी जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२३६/२०१५ दि.०४/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये पुढील ५ वर्षांकरीता व्यवसाय चालविणेस मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

६) सदर पत्राप्रमाणे दि.०७/१२/२०१५ ते दि.०६/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी उक्त सोसायटीस मुदत वाढवून देणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.५७४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क वापरासाठी मागील मासिक परवाना फी १०% वाढ व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१५ ते दि.०६/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचेच अटी/ शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.” सदर निर्णयाप्रमाणे उक्त सोसायटीबरोबर करारनामा करुन घेणेत आलेला आहे.

७) दरम्यानचे काळात उपरोक्त पॅरा.अ.नं.४ मध्ये नमूद केलेप्रमाणेच्या पत्रास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१५/१०१२/प्र.क्रं.१७८/का.१६ दि.२०/०४/२०१७ अन्वये मंत्रालय परिसरातील जागा महाराष्ट्र मंत्रालय ॲन्ड अलाईड ऑफीसेस को-ऑप.बॅंक व दि महाराष्ट्र मंत्रालय व संलग्न कर्मचारी को-ऑप.क्रेडीट सोसा. लि. यांना सामान्य प्रशासन विभागाकडून भाडेतत्वावर वाटप करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता,इलाखा शहर (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी आवश्यक त्या अटी व शर्तीसह संबंधीत संस्थांसोबत करारनामा केला आहे. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रं. शाकाजा-१५९७/प्र.क्रं.१०५/९७/२२ दि.२६/१०/२००३ मधील तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता,इलाखा शहर (सा.बां.) विभाग,मुंबई यांच्या कार्यालयाकडे जागेच्या भाडयाचा भरणा करण्यात येतो. मात्र सदर शासन निर्णयातील तरतुदी केवळ बृहन्मुंबई आणि उपनगरातील शासकीय कार्यालयाकरीता लागू आहेत. बृहन्मुंबई आणि उपनगर वगळता इतर शासकीय कार्यालयातील जागा भाडयाने देणे वा शासकीय कार्यालयांसाठी जागा भाडयाने घेणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे शासन परिपत्रक दि.२३/०४/१९८४ व दि.१६/०२/१९८७ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. या परिपत्रकातील तरतुदीनुसार जागा भाडयाने देण्यासाठी संबंधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडून भाडे योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांना चालविण्यास दिलेल्या संस्थान परिसरातील १४ कियॉस्क/गाळयांना मुदतवाढ देण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिपत्रकानुसार उपरोक्त कियॉस्क/गाळयांचे भाडे शिर्डी विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडून निश्चित करुन घेवून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे आणि विद्युत वापरासह इतर अटी व शर्तीसह प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

८) सदर पत्राचे अनुषंगाने इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३७९२/२०१७ दि.१४/१०/२०१७ अन्वये मा.उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,राहाता यांचेकडेस प्रचलित भाडेदर मिळणेकामी पत्र निर्गत करणेत आले. त्यास अनुसरुन मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांनी त्यांचेकडील जा.क्रं.रेशा/८७१९/२०१७ दि.२८/१२/२०१७ अन्वये भाडे निश्चिती प्रमाणपत्र इकडेस सादर केले असून त्यात त्यांनी खालीलप्रमाणे भाडे निश्चित केले असल्याचे नमूद केले आहे.

| अ.नं. | कियॉस्कचे ठिकाण | सर्वे नं. | कियॉस्कची साईज | कियॉस्क संख्या | दरमहा भाडे रक्कम रु. | एकूण भाडे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग-१ परिसर | १०८ प. | ९x१० फूट | ४ | रु.५३१/- प्रति कियॉस्क | रु.२,१२४/- |
| २ | साईआश्रम भाग-२ परिसर | १७२ प. | ९x१० फूट | १ | रु.२७२/- | रु. २७२/- |
| ३ | साई प्रसादालय परिसर | ८५ प. | ९x१० फूट | १ | रु.२७२/- | रु. २७२/- |
| ४ | द्वारावती निवासस्थान परिसर | १४८ प. | ९x१० फूट | १+१ | रु.४४३/-+ रु.८८७/- | रु.१,३३०/- |
| ५ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | १०७ प. | ९x१० फूट | १+२ | रु.४४७/- + रु.१,३४२/- | रु.१,७८९/- |
| ६ | साईउद्यान परिसर | ४ प. | ९x१० फूट | २ | रु.९७०/- प्रति कियॉस्क | रु.१,९४०/- |
| ७ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | २ व ३ प. | ९x१० फूट | १ | रु.९७०/- | रु. ९७०/- |
| | **एकूण** | | | **१४** | | |

**९)** उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५७४ प्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या १४ कियॉस्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१५ रोजी पूर्ण होत असल्यामुळे मागील मासिक परवाना फी रु.३,३००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,३००/-+ १०% रक्कम रु.३३०/-= रु.३,६३०/-) रु.३,६३०/- (अक्षरी रु.तीन हजार सहाशे तीस मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१५ ते दि.०६/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. म्हणजेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे रु.३,६३०/- इतके दरमहा प्रति कियॉस्क भाडे निश्चित करणेत आलेले आहे.

**१०)** मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे निश्चित केलेले भाडे व मा.व्यवस्थापन समितीने निश्चित केलेले भाडे यात मोठी तफावत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेले भाडे अत्यंत अल्प व तोकडे आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेले भाडे संस्थानच्या दृष्टिने किफायतशीर ठरणार नाही.

विभागाचा अभिप्राय- उक्त सोसायटीची उपरोक्त १४ कियॉस्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१६ रोजी संपलेली आहे. तथापि उक्त १४ कियॉस्क आजही सोसायटीच्या वापरात आहेत. तेंव्हा सदर सोसायटीस उक्त १४ कियॉस्कची वापराची पुढील ११-११ महिन्यांसाठीची मुदत दि.०७/१२/२०१६ ते दि.०६/११/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी प्रति कियॉस्कचे मागील मासिक भाडे रु.३,६३०/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,६३०/-+ १०% रक्कम रु.३६३/-= रु.३,९९३/-) रु.३,९९३/- (अक्षरी रु.तीन हजार नऊशे त्र्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन तसेच दि.०७/११/२०१७ ते दि.०६/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे रु.३,९९३/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,९९३/-+ १०% रक्कम रु.३९९/- = रु.४,३९२/-) रु.४,३९२/- (अक्षरी रु.चार हजार तीनशे ब्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

यास्तव सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्पलॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि., शिर्डी यांना चालविण्यास दिलेल्या कियॉस्क/ गाळे यांचे मुदतवाढ व भाडे आकारणी बाबत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे रु.३,९९३/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,९९३/-+ १०% रक्कम रु.३९९/-= रु.४,३९२/-) रु.४,३९२/- (अक्षरी रु.चार हजार तीनशे ब्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग )**

---

**विषय नं.२४** **दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि., मुंबई यांना श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास मधील १०x१५ फुट या आकाराचा गाळा नं.९ नोगा ब्रँण्ड फुड प्रोडक्टस् विक्री केंद्रासाठी लिव्ह अँण्ड लायसेन्स तत्वावर मिळणेबाबत, विभागीय व्यवस्थापक दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि., मुंबई यांचे पत्र क्र.एनओजीए/ एमकेटीजी/ २०१८-१९/१६, दि.०४.०४.२०१८ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता,भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

प्रस्ताव- दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास मधील १०x१५ फूट या आकाराचा गाळा नं.९ नोगा ब्रँण्ड फूड प्रॉडक्टस विक्री केंद्रासाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत..

प्रस्तावना– दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांनी यापूर्वी त्यांचेकडील दि.०६/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डीचे परिसरात नोगा ब्रँण्ड फूड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली होती. तद्नुषंगाने सदर प्रॉडक्ट हे शेतकरी व ग्राहकांच्या उपयोगाचे आहेत, परंतु नवीन दर्शन रांगेचे काम सुरु होत असलेने विविध विभागांनी साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ येथील गाळे वापरास घेतले असल्याने या दोन्ही ठिकाणी भाडेतत्वावर देणेसाठी गाळे उपलब्ध नसल्याचे तेथील विभाग प्रमुखांनी कळविलेले आहे. त्यामुळे सध्या दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन

लि.मुंबई यांना गाळा उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. या दोन्ही ठिकाणी पुढे गाळा रिकामा झाल्यास त्यांना भाडेतत्वावर गाळा उपलब्ध करुन देता येईल,असेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीच्या सभेत सादर करणेत आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीनचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.६१८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि महाराष्ट्र ॲग्रो डिस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना, त्यांचे नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री करणेसाठी वाहन उभा करणेकामी साईआश्रम भक्तनिवास परिसरामध्ये संस्थानच्या विहित अटी/शर्तीनुसार जागा उपलब्ध करुन देण्यात यावी,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे उक्त संस्थेबरोबर पत्रव्यवहार करेणत आलेला आहे व त्यात ठरलेप्रमाणे जागा वापरासाठी देण्याच्या जागेचे भाडे निश्चित करणेचे प्रकरण चालू आहे.

दरम्यानचे काळात मा.रिजनल मॅनेजर, दि महाराष्ट्र ॲग्रो डिस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नोगा/एमकेटेजी/२०१८-१९/ १६ दि.०४/०४/२०१८ अन्वये “सदरची संस्था ही महाराष्ट्र शासन अंगीकृत संस्था असून सदर संस्था, ऑरेंज ज्यूस,तर स्वाद असलेले ज्यूस, फळांच्या रसापासून केलेले पेय, साखर पाक,टोमॅटो रस,टोमॅटो ज्यूस,फळांचा पाक (जॅम) प्रकारचे नोगा ब्रॅण्डचे प्रॉडक्ट तयार करुन विक्री करते. त्यासाठी संस्थानने साईआश्रम भक्तनिवास परिसरात वाहन उभे करुन सदरचे प्रॉडक्टस विक्री करणेकामी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. तदनुसार संस्थेने साईआश्रम भक्तनिवास परिसरात लाडू विक्री केंद्राच्या बाजूस उपलब्ध असलेल्या मोकळया जागेत ८x१० फूट ही जागा वाहन उभे करण्याऐवजी स्टॉल ठेवण्यासाठी पसंत केलेली आहे.सदर कामी संस्थेचे अधिकारी यांनी दि.०३/०४/२०१८ रोजी संस्थानचे उपजिल्हाधिकारी यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यात उपरोक्त मोकळया जागेऐवजी साईआश्रम भक्तनिवास येथील बांधीव गाळा नं.९ हा नोगा प्रॉडक्टस विक्रीकामी मिळणेसाठी विनंती केलेली आहे. सदर गाळा वापरास मिळणेकामीच्या संस्थानच्या सर्व अटी व शर्ती संस्थेला मान्य राहतील. तरी सदरचा गाळा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर नोगा प्रॉडक्टस विक्री केंद्रासाठी वापरास मिळावा,”असेबाबत विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- साईआश्रम भक्तनिवास येथील गाळा नं.९ चे आकारमान सुमारे १० x१५ फूट असे असून त्यात सध्यस्थितीत संस्थानचे ध्वनिक्षेपण विभागाचे सामान ठेवणेत आलेले आहे. सदरचे ध्वनिक्षेपण विभागाचे सामान इतरत्र हलवून उक्त संस्थेस सदरचा गाळा ११ महीन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडे दराने व विद्युत बील वेगळे आकारुन वापरास देता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग )**

---

**विषय नं.२५** **श्रीमती आर लिलावतीबाई चेन्नई यांचा परिकलपट्टु व्हिलेज येथील गट नं.२६८ सर्व्हे नं.३३/११ मधील २०८० स्के.फुट जागा साईबाबा संस्थानला दान करणेबाबतचा दिनांक ३०.०३.२०१७ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- श्रीमती आर.लिलावतीबाई,चेन्नई यांचा परीकलपट्टू व्हीलेज येथील गट नं.२६८ सर्वे नं.३३/११ मधील २०८० स्क्वे.फूट जागा दान देणेबाबतचा दि.३०/०३/२०१७ रोजीचा अर्ज

प्रस्तावना- श्रीमती आर.लिलावतीबाई,चेन्नई यांनी परीकलपट्टू व्हीलेज येथील गट नं.२६८ सर्वे नं.३३/११ मधील २०८० स्क्वे.फूट जागा श्री साईबाबा संस्थानला दान देणेबाबतचा विषयांकित दि.३०/०३/२०१७ रोजीचा अर्ज कडेस सादर केलेला आहे. अर्जात नमूद केलेली मिळकत ही चेन्नई शहरापासून सर्वसाधारणपणे १२० किमी.दूर अंतरावर आहे.

तत्राप प्रस्तुतची जागा श्री साईबाबा संस्थानला संस्थानचे माहीती केंद्र स्थापित करण्यासाठी उपयुक्त ठरेल किंवा कसे याबाबतचे प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग व जनसंपर्क अधिकारी,जनसंपर्क कार्यालय यांचेकडून अभिप्राय मागविणेत आले.

१) जनसंपर्क अधिकारी यांनी त्यांचेकडील दि.१२/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहे.

"संस्थानचे माहीती केंद्र इतर राज्यात सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ चे सभेत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे इतर राज्यांमध्ये संस्थानचे माहीती केंद्र सुरु करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.सचिन तांबे व जनसंपर्क अधिकारी यांचे मंडळ गठीत करण्यात आले,असा निर्णय झालेला आहे.

तरी श्रीमती आर.लिलावतीबाईयांचा विल्लूपूरम,तामिळनाडू येथील सर्वे नं.७/२ बी,७/४ नवीन सर्वे नं.३३/११ मधील प्लॉट नं.२६८ (२०८० स्क्वे.फूट) जागा दान घेणेबाबत वर निर्देशित केलेल्या समिती सदस्यांशी चर्चा करावी,असे मत आहे,"असेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

२) तसेच प्रकाशने विभाग यांनी त्यांचेकडील दि.०७/१०/२०१७ रोजीच्या पत्राप्रमाणे खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत.

अ) उक्त जागा ही तामिळनाडू राज्याच्या राजधानी चेन्नईपासून (मुख्य शहरापासून) १२० किमी.अंतर दूरवर आहे.

ब) जा.नं.एसएसएस/काअ/स्वीय/५६५/२०१७ दि.२४/०४/२०१७ अन्वये ज्या राज्यात माहीती केंद्र नाहीत त्या राज्याच्या मुख्य शहरात माहीती केंद्र सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेतला आहे.

क) चेन्नई पासून ५० किमी.अंतरावर देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचे श्री साई मंदिर परिसरातील जागेत संस्थानचे माहीती केंद्र सुनियोजित पध्दतीने कार्यान्वित आहे.

ड) उपरोक्त जागा अविकसित/मोकळी जागा आहे. तेथे विकसित करणे इतर अनुषंगिक बाबी यावर संस्थानचा होणारा खर्च विचारात घेता माहीती केंद्र सुरु करणे आवश्यक ठरणार नाही.

सबब वरील मा.व्यवस्थापन समिती निर्णय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी कक्षाकडून प्राप्त आदेशानुसार देणगी दाखल मिळत असलेल्या जागेत माहीती केंद्र सुरु करणे संस्थानचे हितावह ठरणार नाही,असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- जनसंपर्क अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर केल्यास, इतर राज्यांमध्ये संस्थानचे माहीती केंद्र सुरु करणेकामी गठीत करण्यात आलेल्या मंडळाचे समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हेव इतर समिती सदस्यांची त्यावर चर्चा होईल.

तसेच प्रकाशने विभागाचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता तामिळनाडू राज्यातील उपरोक्त जागा दान स्वरुपात स्विकारणे संस्थानला किफायतशीर ठरणार नाही. तथापि अर्जदार यांची दान करणेच्या इच्छेच्या अनुषंगाने सदरची जागा अर्जदार यांनी त्यांचे मर्जीनुरुप विक्री करुन त्यापासून मिळणारी रक्कम संस्थानला दान केल्यास ती स्विकारता येईल. तसे अर्जदार यांना कळविता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विभागाच्या अभिप्रायाप्रमाणे विभागाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२६** **तामिळनाडू मधील वेप्पमपट्टु येथील प्लॉट नं.३१ मधील ३४८० स्क्वे.फुट जागा वेल्लारी, श्रीपेरुमबुदुर येथील प्लॉट नं.३६ मधील १५२० स्क्वे.फुट व अण्णमबेदू येथील प्लॉट नं.९३ बी मधील १२८६ स्क्वे.फुट प्लॉटस श्री साईबाबा संस्थानला दान देणेबाबत श्रीमती डी.कामात्वी, चिंताद्रीपेट,चेन्नई यांचा दि.२७.०४.२०१७ चा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

प्रस्ताव- तामिळनाडू राज्यामधील वेप्पमपट्टू येथील प्लॉट नं.३१ मधील ३४८० स्क्वे.फूट जागा, वेल्लारी,श्रीपेरुमबुदूर येथील प्लॉट नं.३६ मधील १५२० स्क्वे.फूट व अण्णमबेदू येथील प्लॉट नं.९३ बी मधील १२८६ स्क्वे.फूट प्लॉटस श्री साईबाबा संस्थानला दान देणेबाबतचा श्रीमती डी.कामात्वी,चिंताद्रीपेट,चेन्नई यांचा प्रस्ताव.

प्रस्तावना- तामिळनाडू राज्यामधील वेप्पमपट्टू येथील प्लॉट नं.३१ मधील ३४८० स्क्वे.फूट जागा, वेल्लारी,श्रीपेरुमबुदूर येथील प्लॉट नं.३६ मधील १५२० स्क्वे.फूट व अण्णमबेदू येथील प्लॉट नं.९३ बी मधील १२८६ स्क्वे.फूट प्लॉटस श्री साईबाबा संस्थानला दान देणेकामी श्रीमती डी.कामात्ची,चिंताद्रीपेट,चेन्नई यांचेकडील दि.२७/०४/२०१७ रोजीच्या अर्जान्वये संस्थानकडे प्रस्ताव सादर केला आहे.

सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदार श्रीमती डी.कामात्चीयांचेशी दि.०९/०६/२०१७ रोजी दूरध्वनीवरुन संपर्क साधून उक्त प्लॉटचे राजधानी चेन्नईपासूनचे अंतराबाबत विचारणा केली असता त्यांनी वेप्पमपट्टू येथील प्लॉट नं.३१ मधील ३४८० स्क्वे.फूटही जागा चेन्नईपासून सर्वसाधारणपणे २० किमी.अंतरावर आहे. वेल्लारी,श्रीपेरुमबुदूर येथील प्लॉट नं.३६ मधील १५२० स्क्वे.फूट ही जागा चेन्नईपासून सर्वसाधारणपणे ४५ किमी अंतरावर आहे आणि अण्णमबेदू येथील प्लॉट नं.९३ बी मधील १२८६ स्क्वे.फूट ही जागा चेन्नईपासून सर्वसाधारणपणे २० किमी.अंतरावर असलेचे सांगितलेले आहे.

तसेच उपरोक्त जागा संस्थानला संस्थानच्या माहीती केंद्रासाठी उपयुक्त ठरेल किंवा कसे याबाबतचे संस्थानचे प्रकाशने विभागाचे अभिप्राय मागविणेत आले. त्याप्रमाणे प्रकाशने विभागाने त्यांचेकडील दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत.

१) उक्त ३ ही जागा हया तामिळनाडू राज्याच्या राजधानी चेन्नईपासून (मुख्य शहरापासून) २० ते ४५ किमी अंतरा�क्या दूरवर आहेत.

२) ज्या राज्यात माहीती केंद्र नाहीत त्या राज्याच्या मुख्य शहरात माहीती केंद्र सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेतलेला आहे.

३) चेन्नई पासून ५० किमी.अंतरावर देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचे श्री साई मंदिर परिसरातील जागेत संस्थानचे माहीती केंद्र सुनियोजित पध्दतीने कार्यान्वित आहे.

४) उपरोक्त जागा अविकसित/मोकळी जागा आहे. तेथे विकसित करणे, �र अनुषंगिक बाबी यावर संस्थानचा होणारा खर्च विचारात घेता माहीती केंद्र सुरु करणे आवश्यक ठरणार नाही.

यास्तव उपरोक्त देणगीदाखल मिळत असलेल्या जागेत माहीती केंद्र सुरु करणे संस्थानचे हितावह ठरणार नाही,असेबाबत अभिप्राय सादर केलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय– प्रकाशने विभागाचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता तामिळनाडू राज्यातील उपरोक्त जागा दान स्वरुपात स्विकारणे संस्थानला किफायतशीर ठरणार नाहीत. तत्राप अर्जदार यांची दान करणेचे �छेच्या अनुषंगाने विचार करता सदरच्या जागा अर्जदार यांनी त्यांचे मर्जीनुरुप विक्री करुन त्यापासून मिळणारी रक्कम संस्थानला दान केल्यास ती स्विकारता येईल. तसे अर्जदार यांना कळविता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विभागाच्या अभिप्रायाप्रमाणे विभागाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२७** **साईबाबा संस्थान परिसरामध्ये शेतमाल विक्री स्टॉलसाठी आदर्श साई माऊली शेतकरी उत्पादक कं.दहीगाव बोलका, ता.कोपरगाव या संस्थेस दुकानासाठी भाडेतत्वावर जागा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्ताव- साईबाबा संस्थान परिसरामध्ये शेतमाल विक्री स्टॉलसाठी आदर्श साई माऊली शेतकरी उत्पादक कं.दहीगाव बोलका, ता.कोपरगाव या संस्थेस जागा देणेबाबत..

प्रस्तावना– मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.विपने/७९५८/२०१७ दि.१५/१०/२०१७ अन्वये आदर्श साई माऊली शेतकरी उत्पादक कं.दहीगाव बोलका,ता.कोपरगाव या संस्थेस शेतमाल भाजीपाला, फळे,धान्य घेऊन स्वच्छता प्रतवारी व पॅकींगचे माध्यमातून विक्री करणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत �केडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- यापूर्वी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स),मुंबई यांनी सुध्दा साईबाबा संस्थानच्या जागेमधील जागा संस्थेच्या दुकानासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत दि.१६/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. त्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला असून त्यावर निर्णय क्रं.८३६ प्रमाणे "महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या.(महाटेक्स),मुंबई यांना त्यांच्या संस्थेच्या दुकानासाठी संस्थानची जागा उपलब्ध करुन दिल्यास �रही संस्था जागेची मागणी करतील. याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला."असेबाबत निर्णय झालेला आहे.

तसेच उक्त संस्थेने मागणी केलेप्रमाणेची जागा सध्यस्थितीत संस्थान परिसरात उपलब्ध नसलेने अर्जदार संस्थेची विनंती मान्य करता येत नाही,असेबाबत मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा, मु.पो.लोणी,ता.राहाता यांना कळविता येईल.त्यासाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विभागाच्या अभिप्रायाप्रमाणे आदर्श साई माऊली शेतकरी उत्पादक कं.दहीगाव बोलका,ता.कोपरगाव यांना दुकानासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत मा.विरोधी पक्षनेते यांना कळविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२८** **२०१७-१८ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी दुध बिस्कीटे पुडे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५४ नुसार माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधी मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना खालीलप्रमाणे चहा,कॉफी,दुध,बिस्किट पुडयांचे मोफत वाटप करणेत आले आहे.

| माहे | चहा | कॉफी | दुध | बिस्किट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१७ | १९२४४५ | ६००३३ | १९२२१ | १२०७५ | ६८३०२७ |
| मे २०१७ | १६८०६४ | ६५४४० | २२४६१ | ४४९६ | ६२२३११ |
| जुन २०१७ | २०९८५५ | ९६७६२ | ३२०२५ | | ८२७८५१ |
| जुल[२०१७ | २६५७१८ | १०३५०० | ३४१०६ | ५२५० | ९७०५०४ |
| ऑगस्ट २०१७ | २३१०९८ | ९८७०२ | २९६६७ | ५३७८ | ८७४१९३ |
| सप्टेबर२०१७ | २५९२२७ | ११६०५२ | ३२०७५ | ६४०२ | ९९४८४५ |
| ऑक्टोबर २०१७ | २७६५३९ | १३०१६५ | ३६१६४ | ९७२५ | ११००६९० |
| नोव्हेबर २०१७ | २९१४८६ | १२१३७३ | ३३८२६ | १०३४८ | ११००३०९ |
| डिसेबर २०१७ | १९६९९८ | १५७९४० | ४१४०७ | २४१२८ | १११२६७७ |
| जानेवारी २०१८ | ३४५५३५ | १३९४०१ | ४०९७५ | २४८१६ | १३५६२७८ |
| फेब्रुवारी २०१८ | १५५६७६ | ७६६१४ | २६३३९ | १०७७१ | ६७४०६६ |
| मार्च २०१८ | १९३९७३ | ९०३९२ | ३२४१२ | ११३३० | ८१३००८ |
| **एकूण संख्या** | २७८६६१४ | १२५६३७४ | ३८०६७८ | १२४७१९ | |
| **दर** | २ | ३ | ३ | ५ | |
| **एकूण रुपये** | **५५७३२२८** | **३७६९१२२** | **११४२०३४** | **६२३५९५** | १११०७९७९ |

वरील प्रमाणे माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर शांतिनिवास / भक्तनिवास दर्शन रांगेमध्ये मोफत वाटप झालेल्या चहा,कॉफी,दुध,,बिस्किट पुडे यासाठी एकूण झालेल्या रुपये - १,११,२९,७५९ ( अक्षरी रुपये-एक कोटी अकरा लाख एकोनतीस हजार सातशे एकोनसाठ मात्र) खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा विषय सविनय सादर

**निर्णय क्र.३१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, २०१७-१८ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी दुध बिस्कीटे पुडे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्र.अधिक्षक,कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.२९** **दरवर्षीप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दर्शिनी /दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका प्रकाशित करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेसाठी येणाऱ्या छपाई खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार–प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प्रस्तावना:- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दर्[illegible]नी तसेच श्री साई दिनदर्शिका छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन दिल्या जातात.

प्रस्ताविकः- मा. व्यवस्थापन समिती दि.०८.०९.२०१७ रोजीची सभा निर्णय क्र.७६८ (०५) सन २०१८ चे श्री साई दर्[illegible]नी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीच्या सभेच्या मान्यतेनुसार विहित पध्दतीने छपाई करुन, वृत्तपत्रात ई-निविदा सूचनेस प्रसिध्दी देऊन, पात्र निविदाकारांना मा. उपव्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्युनतम दरधारकांकडून छपाई करुन घेणेबाबत आदेश पारीत करण्यात आलेला होता. दि.१०.०४.२०१८ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | आदेशीत संख्या | ई-निविदेतील मंजूर दर रु. प | विक्री दर रु. प | जमा संख्या | शिल्लक साठा दि.१०.०४.१८ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | श्री साई दर्[illegible]नी २०१८<br>सेमी डिलक्स प्रकारात (७.५०"x९.७५") | २२५००० | ८६/- | ८६/- | २२५००० | ५५२ |
| ०२ | श्री साई दर्[illegible]नी २०१८<br>पॉकेट साईज (३.४"x ४.५०") | ७५००० | १०.५० | १०/- | ७५००० | ०० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०१८<br>०१ पाने मोठे (१९"x२९") | ४२५००० | १५.१२ | १५/- | ४२५००० | ८१५३२ |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल २०१८<br>कॅलेंडर्स (८ पेजेस)<br>आकार २२.००"x३५.००" | २०००० | २०१.६० | २०२/- | २०००० | २८३१ |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल २०१८<br>कॅलेंडर्स (७पेजेस)<br>आकार १९.२५"x२७.२५" | १०००० | २२४/- | २२४/- | १०००० | ०३ |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल २०१८<br>कॅलेंडर्स (सिंगल पेज)<br>आकार १९.००"x२७.००" | ४००० | २३७.४० | २३७/- | ४००० | १४१५ |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क २०१८<br>कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"x०७.००" | १५००० | १२२.३१ | १२२/- | १५००० | ०० |
| ०८ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क २०१८<br>कॅलेंडर्स<br>(कारोनाडो पेपर, ०७ पेजेसवर पाटपोट छपाई)<br>आकार ९.७५"x०७.००" | १०००० | ५३.५५ | ५४/- | १०००० | ०० |

उपरोक्त तक्त्यातील सन-२०१८ च्या साई दर्[illegible]नी व दिनदर्शिक व डिलक्स दिनदर्शिकांचा छपाईकामी रु.३,६१,५५,२५०/- मात्रचा प्रत्यक्ष खर्च आलेला असून साई दर्[illegible]नी व दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडर्स-२०१८ जमा झालेल्या आहेत.

प्रस्तावः- सन-२०१८ च्या साई दर्[illegible]नी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिकेला भक्तांचा माहे डिसेंबर व जानेवारी व फेब्रुवारी माहिन्यात विक्रीचा चांगल्या प्रकारे दसरा, दिपावली व नाताळ सुट्टया कालावधी विचारात

घेता प्रतिसाद लक्षात घेता, सन २०१९ करीता प्रस्तावित छपाई संख्या, मागील वर्षाच्या दरामध्ये १०% वाढ ग्राहय धरण्यात आलेली आहे. अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल पुढील पानांवर सादर केलेला आहे.

| अं.नं. | तपशिल (सन २०१९) | प्रस्तावति छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | आदेशीत संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी -२०१९<br>आकार ७.५०"x९.७५" | २,३०,००० | १००/- | २,३०,००,०००/- |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०१९<br>पॉकेट साईज (३.४"x ४.५०") | २,००,००० | ११/- | २२,००,०००/- |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका- २०१९<br>०१ पानी मोठे आकार १९"x२९" | ३,७५,००० | २५/- | ९३,७५,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल- २०१९ कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" | २०,००० | २५०/- | ५०,००,०००/- |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट-२०१९ कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | १०,००० | २७५/- | २७,५०,०००/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स-२०१९ (सिंगल पेज) आकार १९"x२७" | २००० | २७५/- | ५,५०,०००/- |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"x०७" | १५,००० | १७५/- | २६,२५,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क २०१८ कॅलेंडर्स<br>(कारोनाडो पेपर, ०७ पेजेसवर पाटपोट छपाई)<br>आकार ९.७५"x०७.००" | १०००० | ६५/- | ६,५०,०००/- |
| | | | एकूण रुपये | ४,६१,५०,०००/- |

(अक्षरी रु. चार कोटी एकसष्ट लाख पन्नास हजार मात्र.)

विभागाचा अभिप्राय/ स्पष्टः- उपरोक्त तक्त्यातील प्रस्तावित श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिक सन २०१९ ह्या सप्टेंबर-ऑक्टोंबर माहिन्यात छपाई होऊन विक्रीसाठी उपलब्ध झाल्यास, सदरचा साठा हा मार्च-२०१९ अखेर विक्री होईल. साईबाबा जीवन व कार्य त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार–प्रसार होणेस मदत होईल.

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु.४,६१,५०,०००/- (अक्षरी रु. चार कोटी एकसष्ट लाख पंन्नास हजार मात्र.) खर्च अपेक्षित आहे.

सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.०९ कोटी अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर दैनंदिनी व दिनदर्शिकांची विक्री केली जात असल्याने खर्च झालेल्या प्रमाणात रक्कम जमा होत असते.

सबब प्रस्तावित दैनंदिनी / दिनदर्शिकांची २०१९ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.४,६१,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी

३) आय टी विभागामार्फत संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेस मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई करुन पुरवठा कार्यादेश पारित करणे □कामकाज पध्दतीस मान्यता असावी.

५) प्रस्ताविक श्री साई दर्शिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आलेस, पुन्हा प्रथम कार्यादेशातील मागणी संख्या २५ टक्के जादा छपाई करुन घेणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

उपरोक्त सन-२०१९ साठी मागणी तक्त्यातील दर्शविलेनुसार श्री साई दर्शिनी/दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन घेण्यास मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दर्शिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका प्रकाशित करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेसाठी येणाऱ्या** अंदाजे रु.४,६१,५०,०००/- मात्रच्या **छपाई खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी अशाही सुचना करण्यात आल्या की, कालनिर्णय दिनदर्शिकेप्रमाणे संस्थानच्याही तीन आकारामध्ये (ऑफीस,घरघुती व कार साईज) दिनदर्शिका छपाई करण्यात याव्यात.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री रामनवमी उत्सव २०१८ चे १०० पानी साईलिला विशेषांक छपाईचे दरांसह वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे १०० पानी साईलिला विशेषांक छपाईकामी दि.२७.०२.२०१८ रोजी मान्यतेस्तव टिपणी सादर करणेत आली होती त्यात नियमित पुण्यतिथी विशेषांकानुसार एकूण- रू.१,८८,७६०/- जास्तीच्या खर्चास व साईलिला विशेषांक प्रसिध्दीस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करणेत आला असता, निर्णय क्र.१८७ ने खर्चास मान्यता मिळालेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०४.०४.२०१८ नुसार दि.०७.०३.२०१८ चे मा.व्यवस्थपपन समितीचे इतिवृत्त वाचून कायम करतेवेळी सदर विशेषांक हा १०० पानांचा करून घेणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मे.टॅको व्हीजन प्रा.लि.मुंबई यांनी दि.०७.०४.२०१८ चे मेलद्वारे १०० पानी विशेषांकासाठी प्रती मराठी अंकासाठी रू.३३.५२ व हिंदी-इंग्रजी अंकाकरीता रू.३०.२० असे दर मिळावेत, असे कळविलेले आहे.

दि.१६.०४.२०१८ रोजी उपरोक्त विषयाबाबत टिपणी सादर केली असता त्यावर मा.उप कार्यकारी अधिकारी यांनी टिपणीवर सारांकश विचार करून मराठी साईलिला श्रीरामनवमी विशेषांक उत्सवाचे औचित्य साधून मराठी अंक १०० पानांसाठी दर रू.३०.५० व हिंदी-इंग्रजी श्रीरामनवमी विशेषांक १०० पाने साठी रू.२८.६६ असे दर मंजूर करता येतील, असे नमूद केले आहे. मा.मुख्यलेखाधिकारी यांनी १०० पानांचे अंक छपाईसाठी व त्यासाठीचे दरास मंजूरी घेणेसाठी विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे असे सुचविलेले आहे. त्यास दि.२४.०३.२०१८ चे चर्चेनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी वरीलप्रमाणे एव्हरेज दर बरोबर असलेबाबत निर्देश दिलेले आहे.

**मागणी**:-वरील आशय पाहता श्री रामनवमी साईलिला विशेषांक मराठी व हिन्दी-इंग्रजी १०० पानांचा तयार करणेकामी दि.०४.०४.२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे इतिवृतात येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून श्री साईलिला मराठी विशेषांक १०० पानी एकूण ७००० अंकासाठी ७००० x रू.३०.५० = रू.२,१३५००- व हिंदी-इंग्रजी १०० पानी विशेषांकासाठी एकूण १५००० प्रतीसाठी एकूण- १५०००x रू.२८.६६ = रू.४,२९,९०० /- एकत्रित रक्कम रू.६,४३,४००/- (अक्षरी सहा लाख त्रेचाळीस हजार चारशे रू.मात्र) चा खर्च श्री रामनवमी विशेषांक १०० पानांसाठी येणार आहे. त्यानुसार टॅको व्हिजन मुंबई यांना कार्यादेश पारीत करता येईल. तरी श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे १०० पानी साईलिला विशेषांक छपाईचे दरांसह वाढीव खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे १०० पानी साईलिला विशेषांक छपाईकामी प्रति अंक रु.१/- मात्र वाढ देण्यात यावी, असे ठरले** **(कार्यवाही-प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.३१** **पाणी शुध्दीकरणासाठी माहे जुलै-२०१८ ते जुन-२०१९ या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी अंदाजे रु.१६,२२,५००/- चे खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

प्रस्तावना:- संस्थानकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करणेत येत आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करणे आलेली असून, सदरहू चार साठवण तलावांची एकुण पाणी साठवण क्षमता ३११ एम.एल.(द.ल.लिटर) इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (इरिगेशन) विभागाकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, साठवण तलावातील पाणी शुध्द करणेसाठी ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध), फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनंदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी साठवण तलावातील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी व याकामी येणारे अंदाजे रु.१२,१६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/११/२०१६, निर्णय क्रं.७९० खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला होता.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी शुध्दीकरणांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली ब्लिचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४९२/१९ अन्वये मे.विक्रम केमिकल्स, सिन्नर यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२०१८/२०१७, दि.१४/०७/२०१७ अन्वये ब्लिचिंग पावडर रु.१४,७६०/- प्रती टन (व्हॅटसह) या दराने व फेरीक ॲलम रु.६,४००/- प्रती टन (व्हॅटसह) एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा करणेकामी आदेश देण्यात आला तर मे.जी.एस.कमर्सियलकार्पोरेशन, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२०१९/२०१७, दि.१४/०७/२०१७ अन्वये क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) रु.३,०००/- प्रती सिलेंडर (व्हॅटसह) एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा करणेकामी आदेश देण्यात आला. सदरहू पुरवठाधारकांना एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. सदरहु कालावधी माहे जुन २०१८ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर मटेरियलचा माहे जुलै-२०१७ ते मार्च-२०१८ या कालावधीत झालेला खर्च तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | माहे जुन २०१७ अखेर विभागाकडील शिल्लक | मागणी करण्यात आलेले मटेरियल | माहे मार्च २०१८ अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक मार्च २०१८ अखेर | मागणी येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर | १.६२५ मे.टन | २०.२५० मे.टन | २०.८७५ मे.टन | १.०० मे.टन | १४.७५० मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | ९.४८० मे.टन | २८.०२० मे.टन | ३२.६४० मे.टन | ४.८६० मे.टन | ३१.९८० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०२ सिलेंडर | ३४ सिलेंडर | ३१ सिलेंडर | ०५ सिलेंडर | ०६ सिलेंडर |

माहे एप्रिल ते जुलै कालावधीत जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणारे पाणी हे जादा प्रमाणात दुषित, गाळ मिश्रीत व पाण्याला वास येत असलेने या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी जादा प्रमाणात मटेरियलचा वापर करावा लागतो.

**प्रस्ताव:-** माहे जुलै-२०१८ ते जुन-२०१९ या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल** | **आवश्यकता** | **अंदाजे दर** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु.२८,०००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | ९,८०,०००.०० |
| ०२ | फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५५ मे.टन | रु.८,०००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | ४,४०,०००.०० |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ४५ सिलेंडर | रु.४,५०० प्रती सिलेंडर | २,०२,५००.०० |
| | | | **एकुण रक्कम:-** | **१६,२२,५००.००** |

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून खरेदी विभागामार्फत माहे जुलै-२०१८ ते जुन-२०१९ या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरीयल खरेदी करता येईल असे मत आहे.

वरील नमुद केलेनुसार पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे **रु.१६,२२,५००/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु.१६,२२,५००/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३२** **सी.सी.टी.व्ही.यंत्रणेतील व्हिडीओ फुटेज माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** प्रस्ताविक – संस्थानच्या सी.सी.टि.व्ही विभागांतर्गत Live दर्शन, व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी, सी.सी.टि.व्ही यंत्रणाबाबतची कामे चालू आहेत. त्याचे थोडक्यात विवरण खालीलप्रमाणे.

१) Live दर्शन – श्रींच्या समाधीचे Live दर्शन , Tata Sky मार्फत पहाटे ४.३० ते रात्री १०.४५ पर्यत चालू राहाते. हे Live दर्शन Tata Sky च्या Dish Tv वर व संस्थानमधील टि.व्ही वर चालू असते. याचे रेकॉर्डींग होत नसून ते फक्त पक्षेपीत केले जात असल्याने त्याचे स्टोअरेजची सुविधा नाही.

२) व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी – संस्थानमधील आयोजित कार्यक्रमांचे, आलेले मान्यवर व अतिथी यांचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग सी.सी.टि.व्ही मधील कर्मचा-यांमार्फत आवश्यकतेप्रमाणे केले जात आहे. तसेच मा.खरेदी समितीच्या बठकीमधील तांत्रिक व वाणिज्य ई निविदा उघडते वेळीचे व्हिडीओ शुटींग केले जात आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे मा.उपसमितीमध्ये ही फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्यात येते. तसेच संस्थानमध्ये आयोजित केलेल्या विविध स्टेज कार्यक्रमांचे व्हिडीओ व फोटोग्राफी केली जात आहे.

३) सी.सी.टि.व्ही - संस्थानमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर, मंदिर परिसर, दर्शन लाईन महत्वाच्या ठिकाणी सध्या १०१ सी.सी.टि.व्ही कॅमेरेव्दारे २४ तास रेकॉर्डींग केले जाते. यावर नजर ठेवण्यासाठी गुरुस्थान समोरील बेसमेंट येथे सी.सी.टि.व्ही नियंत्रण कक्षाची उभारणी केली असून, तेथे सी.सी.टि.व्ही व्दारे येणा-या दृश्यांचे विविध डिस्पले स्क्रिनवर दिसण्याची सोय केली आहे या ठिकाणी सी.सी.टि.व्ही चे दोन कर्मचारी २४ तास कार्यरत असतात आवश्यकतेप्रमाणे सुरक्षा विभागाचे कर्मचारी तेथे लक्ष ठेवण्यासाठी नेमण्यात येतात. येथे बाहेरील कोणत्याही व्यक्तीस सुरक्षतेच्या कारणास्तव प्रवेश देण्यात येत नाही. सी.सी.टि.व्ही यंत्रणेव्दारे होत असलेले रेकॉर्डींग सध्या फक्त ३ दिवस उपल्बध राहाते त्यानंतर ते आपोआप पुसले जाऊन त्यावर परत रेकॉर्डींग प्रक्रिया सातत्याने चालू असते. रेकॉर्डींग होत असलेले सर्व्हर हे १० वर्षापुर्वीचे जुने असल्याने त्याची साठवण क्षमता कमी आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टि.व्ही विभागांतर्गत कामकाज करत आहे. त्यातील

**अ.नं. १** प्रमाणे Live दर्शनाचे रेकॉर्डींग होत नसल्याने ते फक्त Live पाहण्यापुरतेच उपल्बध असते.

**अ.नं.२** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टि.व्ही विभागातील कर्मचा-यांनी संस्थानध्ये आवश्यकतेप्रमाणे घेतलेले शुटींग व फोटोग्राफीची मागणी केल्यास मा.विश्वस्तांना सी.डी.च्या स्वरुपात उपलबध करुन देण्यात येते. सदर माहिती बाहेरील व्यक्तींनी मागविल्यास ती मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांच्या निर्देशाप्रमाणे देण्यात येतात. परंतू ,

**अ.नं.३** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टि.व्ही यंत्रणेचे रेकॉर्डींग हे मंदिर, मंदिर परिसर तसेच दर्शन लाईन ठिकाणचे असल्याने ते बाहेर देण्यात येत नाही. परंतु माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये ब-याचवेळेस खाजगी व्यक्ती हे सी.सी.टि.व्ही फुटेज मिळण्याबाबत अर्ज करीत आहेत. फुटेज सुरक्षेच्या कारणास्तव देण्याचे नाकारल्यास सदर व्यक्ती अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच मा.राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे अपिल करत असतात.
यामुळे मंदिर व मंदिर परिसरातील टि.व्ही यंत्रणेतील व्हिडीओ फुटेज, माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये मागणी केल्यास त्याबाबत योग्य तो निर्णय होणकरीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करता येईल.

तसेच उपरोक्त संदर्भीय दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१, निर्णय क्र. ८२९ अन्वये "सुरक्षा यंत्रणेसाठी बसविलेले सीसीटीव्ही कॅमे-याचे **Video** फुटेज माहिती अधिकारात देणेकामी मा. माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेणेत यावा, त्यासाठी त्यांना मुद्देसुद पत्र पाठविणेत यावे" असा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन, सुरक्षा यंत्रणेसाठी बसविलेले सीसीटीव्ही कॅमे-याचे **Video** फुटेज माहिती अधिकारात देणेकामी मा. माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेणेबाबत दि.२३/१०/२०१४ रोजी व दि.१६/०६/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली आहे, परंतु सदर टिपणीस मान्यता देण्यात आलेली नाही. तदनंतर दि. २२/०९/२०१५ रोजी माहिती आयुक्तांचे अभिप्राय घेणेकामी पुनश्चः टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी "सुरक्षेच्या कारणास्तव आवश्यकता वाटत नाही तशी तरतुद कायद्यात आहे" असे निर्देशित केलेले आहे. सदर निर्देशास अनुसरुन सुरक्षा यंत्रणेसाठी बसविलेले सीसीटीव्ही कॅमे-याचे **Video** फुटेज माहिती अधिकारात देणेकामी मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात आलेला नाही.

मागणी– उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मंदिर व मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा ही सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन कार्यान्वित करणेत आलेली आहे. यामुळे सदर सीसीटीव्ही यंत्रणेतील कॅमे-यांचे संस्थान परिसरातील टिव्ही संचावर कुठेही लाईव्ह चित्रीकरण प्रक्षेपण करणेत येत नाही अथवा सदर यंत्रणेतील सीसीटीव्ही फुटेज फक्त पोलिस विभाग व कोर्टकामकाजा व्यतिरीक्त इतर कोणासही देण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भीय दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१, निर्णय क्र. ८२९ अन्वये **"सुरक्षा यंत्रणेसाठी बसविलेले सीसीटीव्ही कॅमे-याचे Video फुटेज माहिती अधिकारात देणेकामी मा. माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेणेत यावा, त्यासाठी त्यांना मुद्देसुद पत्र पाठविणेत यावे"** असा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन, माहिती आयुक्तांचा अभिप्राय घेणेकामी दि.२३/१०/२०१४ रोजी व दि.१६/०६/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली आहे. परंतु सदर टिपणीस मान्यता देण्यात आलेली नाही. तदनंतर दि.२२/०९/२०१५ रोजी माहिती आयुक्तांचे अभिप्राय घेणेकामी पुनश्चः टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी **"सुरक्षेच्या कारणास्तव आवश्यकता वाटत नाही तशी तरतुद कायद्यात आहे"** असे निर्देशित केलेले असल्याने मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात आलेला नाही.

याबाबत निर्णय होणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय □छाननी करुन अनुमान – तांत्रिक व कायदेशीर.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा ही सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन कार्यान्वित करणेत आलेली आहे. यामुळे सदर सीसीटीव्ही यंत्रणेतील कॅमे-यांचे संस्थान परिसरातील टिव्ही संचावर कुठेही लाईव्ह चित्रीकरण प्रक्षेपण करणेत येत नाही अथवा सदर यंत्रणेतील सीसीटीव्ही फुटेज फक्त पोलिस विभाग व कोर्टकामकाजा व्यतिरीक्त इतर कोणासही देण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भीय दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१, निर्णय क्र. ८२९ अन्वये "सुरक्षा यंत्रणेसाठी बसविलेले सीसीटीव्ही कॅमे-याचे Video फुटेज माहिती अधिकारात देणेकामी मा. माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेणेत यावा, त्यासाठी त्यांना मुद्देसुद पत्र पाठविणेत यावे" असा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन, माहिती आयुक्तांचा अभिप्राय घेणेकामी दि.२३/१०/२०१४ रोजी व दि.१६/०६/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली आहे. परंतु सदर टिपणीस मान्यता देण्यात आलेली नाही. तदनंतर दि.२२/०९/२०१५ रोजी माहिती आयुक्तांचे अभिप्राय घेणेकामी पुनश्चः टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी "सुरक्षेच्या कारणास्तव आवश्यकता वाटत नाही तशी तरतुद कायद्यात आहे" असे निर्देशित केलेले असल्याने मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात आलेला नाही.

सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन संस्थानला केंद्र व राज्य शासनाच्या गुप्तचर विभागाकडुन वेळोवेळी हायअलर्टच्या सुचना येत असतात. त्या दृष्टीने सीसीटीव्ही फुटेज देण्याबाबत संस्थानचे स्पष्ट मत खालीलप्रमाणे देत आहे.

अ) पोलिस यंत्रणा, केंद्र व राज्य शासनाच्या गुप्तचर विभाग यांना तपासकामी त्यांच्या मागणीप्रमाणे संस्थानमध्ये सीसीटीव्ही यंत्रणेतील फुटेज उपलब्ध असल्यास ते देण्यास हरकत नाही.

ब) माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील,कलम ८-माहिती प्रकट करण्याबाबत (१) मधील-(छ)-जी माहिती प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवीतास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपुवर्क दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले साहाय्य ओळखता येईल अशी माहिती व (ञ)-जी माहिती प्रकट करणे हे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती,केंद्रीय जन माहिती अधिका-याची, राज्य जन माहिती अधिका-याची किंवा अपील प्राधिका-याची खात्री पटली असेल, ती खेरीज करुन, जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खासगीबाबत आगंतुक हस्तक्षेप करील अशी वैयक्तीक तपशीलासंबंधातील माहिती प्रकट करण्यात येत नाही.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे संस्थानमधील सीसीटीव्ही फुटेज "अ" नुसार पोलिस यंत्रणा व राज्य गुप्तचर विभाग यांना तपासकामी देण्यात यावेत. परंतु माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ८ (१)

मधील "**छ**" व "**ञ**" मध्ये नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे सीसीटीव्ही फुटेज बाहेरील खाजगी अर्जदारास नाकारण्यात यावेत याप्रमाणे कार्यवाही होण्याच्या निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला.** **(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)**

---

**विषय नं.३३** **दि.२७ जुलै २०१८ चे रात्रौ खग्रास चंद्रग्रहण असलेमुळे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणे तसेच दि.२८.०७.२०१८ रोजी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवणेबाबत.**

**प्रसताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत समाधी मंदिर येथे विविध उत्सव, स्थानिक उत्सव, सण, महोत्सव असे कार्यक्रम साजरे करण्यात येतात. त्याचप्रमाणे दाते पंचांगानुसार शिर्डी येथे चंद्रग्रहण व सुर्यग्रहण दिसणार असल्यास पंचांगाचे तिथीनुसार व मार्गदर्शनाप्रमाणे ग्रहणाचे वेध पाळण्यात येत नाहीत, अशी पुर्वीपासुन प्रथा आहे.

**प्रस्ताव-** दाते पंचांगकर्ते, सोलापूर आषाढ शु.॥१५,शके १९४०, शुक्रवार, दि.२७ जुलै २०१८चे रात्री खग्रास चंद्रग्रहण दिसणार आहे, असे दाते पंचांगकर्ते, सोलापूर यांचे पंचांगामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे कार्यक्रमामध्ये बदल करावा लागणार आहे. यावर्षी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ दि.२६/०७/२०१८ ते दि.२८/०७/२०१८ अखेर साजरा करण्यात येत आहे. त्यामुळे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी खग्रास चंद्रग्रहण आले आहे. ग्रहण कालावधी खालीलप्रमाणे आहे-

**ग्रहण कालावधी-**

| **दिनांक** | **ग्रहण स्पर्श** | **ग्रहण मध्य** | **ग्रहण मोक्ष** | **एकूण ग्रहण कालावधी** |
|---|---|---|---|---|
| दि.२७ - २८/०७/२०१८ | रात्रौ.२३:५४ | रात्रौ.०१:५२मि | रात्रौ ०३:४९मि. | **३ तास ५५ मिनीटे** |
| | (दि.२७ जुल) | (दि.२८ जुल) | (दि.२८ जुल) | |

याबाबत मंदिर पुजारी श्री.बाळासाहेब जोशी व श्री.दिलीप सुलाखे यांनी ग्रहण कालावधीबाबत मत अनुभवातून व्यक्त केले आहे. तरी त्यामध्ये खालील गोष्टी नमूद केल्या आहेत.

१) ग्रहण स्पर्श ते ग्रहण मोक्ष या कालावधीत प्रथेप्रमाणे श्रींचे समाधी मंदिरामध्ये संस्थान पुजा-यांमार्फत मंत्रोच्चार करण्यात येईल.

२) ग्रहणानंतर श्रींचे समाधी व मूर्तीस पहाटे ४.०० वा स्नान घालण्यात येईल. त्यानंतर दैनंदिन कामकाज नेहमीप्रमाणे होईल.

३) प्रथेप्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी समाधी मंदिराचे शेजारील स्टेजवरील कलाकार हजेरीचा कार्यक्रम करता येणार नाही.

विभागाचा अभिप्राय- दाते पंचांगकर्ते, सोलापूर यांचे शिवी सन-२०१८-१९चे पंचांग पा.नं.२४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आषाढ शु॥१५, शके १९४०, शुक्रवार, दि.२७ जुलै २०१८ चे रात्री खग्रास चंद्रग्रहण भारतात दिसणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषा करता येईल.

अ) श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे असुन प्रथेप्रमाणे ग्रहणकाळामध्ये (दि.२७.०७.२०१८ चे रात्रौ २३:५४ ते दि.२८.०७.२०१८ चे पहाटे ०३:४९ -०३ तास ५५ मिनीटे) समाधी मंदिर उघडले ठेवल्यास दर्शन पुर्णपणे बंद ठेवून मंत्र पठण (मंत्रोच्चार) करणे.मुख्य दिवशी दर्शन बंद असलेने मंदिर बंद ठेवणेबाबत निर्णय व्हावा.

ब) तसेच श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे कालावधीत मुख्य दिवशी ग्रहणामध्ये दर्शन बंद असल्याने साईभक्तांना श्रींचे दर्शन घेता येणार नाही. ग्रहण कालावधी २३.५४ ते रात्री ०३.४९ असा ०३ तास ५५ मिनिटे व स्नासाठी १० मिनिटे असे एकूण ०४ तास ०५ मिनिटे साईभक्तांचे दर्शन बंद राहणार असलेने श्रीगुरुपौर्णिमेचे मुख्य दिवशी मंदिर रात्री (दि. २७/०७/२०१८ ) बंद ठेवणेबाबत तसेच दि. २८/०७/२०१८ रोजी (उत्सव सांगता तीसरा दिवस ) मंदिर

०४.०० वाजता उघडून काकड आरती करुन स्नान झालेनंतर दर्शनास प्रारंभ करणे. दि. २८/०७/२०१८ चौथा शनिवार व दि. २९/०७/२०१८ रोजी रविवार असलेने गर्दीचे प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने दि. २८/०७/२०१८ रोजी मंदिर रात्रभर उघडे ठेवल्यास जास्तीत जास्त साईभक्तांना दर्शनाचा लाभ घेता येईल. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

यापुर्वीही ग्रहण कालावधीत श्रींचे दर्शन बंद ठेवण्यात आले होते व दैनंदिन कार्यक्रमामध्ये बदल करण्यात आलेला होता. तरी दाते पंचांगानुसार व मंदिर पुजारीयांचे लेखी अभिप्रायानुसार वरील नमूद केल्याप्रमाणे

**अ)** प्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी दि.२७.०७.२०१८चे रात्रीसमाधी मंदिर उघडले ठेवल्यास दर्शन पुर्णपणे बंद ठेवून मंत्र पठण (मंत्रोच्चार) करणे. मुख्य दिवशी दर्शन बंद असलेने मंदिर बंद ठेवणेबाबत निर्णय व्हावा.

**ब)** प्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे सांगता दिवशी (दि.२८/०७/२०१८) श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२७ जुलै २०१८ चे रात्रौ खग्रास चंद्रग्रहण असल्यामुळे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात प्रस्तावात नमुद केलेल्या अ व ब प्रमाणे बदल करणेस मान्यता देण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच उत्सवाचे मुख्य दिवशी होणाऱ्या कलाकार हजेरीचे कार्यक्रम दि.२८.०७.२०१८ रोजी मंदिर रात्रभर उघडे राहणार असल्याने त्यादिवशी आयोजित करावे, असे ठरले. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३४** **कार्यालयीन कामाकरीता Toyot कंपनीची Innova Crysta दोन वाहने खरेदी कामी वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः- कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील, असे नमुद केलेले आहे.

प्रस्तावनाः- दि.०८/०१/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२७ नुसार, "संस्थान कार्यालयीन कामाकरीता विहीत पध्दतीने २ टोयाटो इनोवा व २ बोलेरो या कंपनीची अत्याधुनिक कार्यालयीन वाहने खरेदी करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आलीहोती.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार, सध्या बाजारात Toyota कंपनीचे InnovaCrysta 2.4 ZX MT / 7 (रंग- सुपर व्हाईट) हे अत्याधुनिक मॉडेल चे वाहन उपलब्ध आहे. या मॉडेलची दोन वाहने खरेदी कामी (विमा रकमेसहीत) अंदाजे रु.४८ लाख पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

"महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक- भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग-III/ उद्योग-४ दिनांक ०१/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिके मधील ३.२.३ मध्ये,"कोणत्याही वाहनाचे दरकारार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी, अशी तरतुद आहे तसेच सदरची बाब आर्थिक स्वरुपाची आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार,जा.नं.एसएसएस/वाहन/६९८४/२०१८ दि.२७/०३/२०१८ चे पत्रान्वये,Toyota कंपनीचे InnovaCrysta2.4 ZX MT / 7 (रंग- सुपर व्हाईट)दोन वाहने खरेदी कामी टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक मागणीचे पत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे मा.सदस्य व टोयोटाकंपनीचे विविध पुरवठादारांना मेल / दुरध्वनीव्दारे देखील कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार दि.११/०४/२०१८ मुदती अखेर प्राप्त झालेली ५ पुरवठादारांची बंद दरपत्रके दिनांक १९/०४/२०१८ चे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडली असता त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | पुरवठादाराचे नांव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वाय.एम. मोटर्स प्रा.लि., भोसरी, पुणे | शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद | चौधरी टोयोटा, धुळे | शॉ टोयोटा, पुणे | वासन टोयोटा, केडगांव , अहमदनगर |
| Ex. Show Room Price | 20,21,500.00 | 20,12,000.00 | 20,12,000.00 | 20,12,000.00 | 20,12,000.00 |
| Zero Dep. Insurance | 73,247.00 | 60,143.00 | 81,253.00 | 74,413.00 | 60,007.00 |
| CRTM (RTO) | 2,500.00 | 2,000.00 | 2,500.00 | --- | 2,500.00 |
| TCS | 20,215.00 | 20,120.00 | 20,120.00 | 20,120.00 | 20,120.00 |
| **Total** | 21,17,462.00 | **20,94,263.00** | 21,15,873.00 | 21,06,533.00 | 20,94,627.00 |
| **दोन वाहनांकरीता (रु.)** | 42,34,924.00 | **41,88,526.00** | 42,31,746.00 | 42,13,066.00 | 41,89,254.00 |
| Remark | | **L-1** | | **L-3** | **L-2** |

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील पुरवठादारांचे दरांचा विचारकरता, शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद यांचे निम्नतम दर प्रति वाहन रु.२०,९४,२६३/- (दोन वाहनांकरीता रु.४१,८८,५२६/-) दिलेले असुन त्यांचे सदरचे निम्नतर दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस खरेदी समितीने मान्यता दिलेली आहे. सदरचा खर्च सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मोटारकार वाहन खरेदी खर्च या अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल.

मागणी- तरी उपरोक्त प्रमाणे शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद यांचे निम्नतर दर स्विकारुन त्यांना Toyota कंपनीची दोन InnovaCrysta 2.4 ZX MT/7 (रंग- सुपर व्हाईट)वाहने खरेदी कामी कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३२०** **कार्यालयीन कामाकरीता Toyota कंपनीची Innova Crysta दोन वाहने खरेदी कामी मागविण्यात आलेल्या दरपत्राकातील निम्नतम दरधारक शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी वाहनाच्या किंमतीमध्ये वाढ झालेली असल्याने दरपत्रकात नमुद केलेल्या दरामध्ये वाहन देऊ शकत नाही, असे त्यांनी सांगीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, L-2 दरधारक वासन टोयोटा, केडगांव , अहमदनगर , यांना विचारणा करुन ते L-1 च्या दरात Toyot कंपनीची Innova Crysta दोन वाहने देण्यास तयार असतील तर त्यांचेकडून तसे लेखी पत्र घेऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

**विषय नं.३५** **एसएमएस सुविधा पुरविणेकामी पुरवठाधारक M/s Netcon Solutions Pvt. Ltd.Mumbai यांची सेवा बंद करुन याकामी संस्थानचे प्रचलीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून निम्नतम दरधारकांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य / समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-दि.१४.०७.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४१९ (०५)

प्रास्ताविक:- श्री साईभक्तांना त्यांनी दिलेल्या देणगी संदर्भातील निरोप, विविध सुविधांसंदर्भात सुचना तसेच संस्थानचे वतीने साजरे करण्यात येणारे उत्सवांचे निमंत्रण व तत्सम माहिति त्यांचे मोबाईल फोनवर एसएमएसद्वारे पुरविणेकामी पुरवठाधारकाची नेमणुक करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीन ई-निविदा प्रक्रिया राबवून,मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०७.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१९ (०५) अन्वये M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना भारतातील एसएमएससाठी रु. ०.६९ प्रति एसएमएस व भारताबाहेरील एसएमएससाठी रु. १.०० प्रति एसएमएस याप्रमाणे जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/ २२१३/ २०१६, दि.०३ ऑगष्ट, २०१६ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. सदरचे कार्यादेशाप्रमाणे M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांनी दि.०१.११.२०१६ पासुन संस्थानचे एसएमएस सुविधा पुरविणेचे काम सुरु केलेले होते.

याकामी प्रसिध्द करणेत आलेल्या निविदेमध्ये एसएमएससाठी चे दर हे सर्व करासहीत असावेत असे नमुद करणेत आलेले होते, परंतु M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांनी सादर केलेल्या बीलांमध्ये GST ची रक्कम स्वतंत्र नमुद करणेत आलेली होती. याबाबत त्यांना दुरध्वनी तसेच ई-मेलद्वारे सुचित

केले असता त्यांनी सुरवातीस त्यांची बीले GST सह अदा करणेत यावीत असे ई-मेलद्वारे कळविलेले होते. परंतु निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणेच बीलाची रक्कम संस्थानमार्फत अदा करणेत येईल असे M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना कळविले असता, त्यांनी सदंर्भ क्रं. ०२ चे ई-मेलद्वारे त्यांचे बीलाची मुळ रक्कम (GST विरहीत) अदा करणेस सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांचे माहे डिसेंबर-२०१७ अखेरची बीलेअकाऊंट विभागामार्फत अदा करणेत आलेली आहेत. याकामी एका वर्षाकरीता साधारण १५८६१३६ एसएमएससाठी ०.०६९ दराप्रमाणे रक्कम रुपये १०९४४३/- मात्र तिका खर्च आलेला आहे.

माहे-फेब्रुवारी-२०१८ पासून M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांनी कोणतीही पुर्वसुचना न देता सदरची सेवा बंद केलेली आहे. याबाबत त्यांना वेळोवेळी दुरध्वनीद्वारे संपर्क करुन तसेच संदर्भीय ई-मेलद्वारे कळविले असता, याबाबत त्यांनी कोणताही स्पष्ट खुलासा केलेला नसून सदरची सेवाही पुर्ववत सुरू केलेली नाही. सदरची सेवा बंद असलेकारणाने साईभक्तांना ऑनलाईन सर्व्हिसेस कार्यप्रणालीबाबत, देणगी व तिर अनुषांगिक एसएमएस तसेच संस्थान प्रशासनास कॅश-काऊंटींग संदर्भातील एसएमएस पाठविणे शक्य होत नाही.

उपरोक्तप्रमाणे M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना वारंवार सुचित करुनही एसएमएस पुरविणेकामीची सुविधा ते पुर्ववत सुरू करत नसल्यामुळे त्यांना याकामी देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणेची सेवा बंद करता येईल, तसेच याकामी संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून निम्नत्तम दरधारकाची नेमणूक करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना वारंवार सुचित करुनही एसएमएस पुरविणेकामीची सुविधा ते पुर्ववत सुरू करत नसल्यामुळे त्यांना याकामी देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणेची सेवा बंद करणेबाबत, तसेच याकामी संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून निम्नत्तम दरधारकाची नेमणूक करणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय □ छाननी करुन अनुमान:- तांत्रिक,आर्थिक,प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना वारंवार सुचित करुनही एसएमएस पुरविणेकामीची सुविधा ते पुर्ववत सुरू करत नसल्यामुळे त्यांना याकामी देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणेची सेवा बंद करणेच्या, तसेच याकामी संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून निम्नत्तम दरधारकाची नेमणूक करणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला.** **(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त दि.०२.०६.२०१८ ते दि.०८.०६.२०१८ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयात कान, नाक, घसा नेि मोफत शस्त्रक्रिया शिबीर तसेच कर्णबधीर रुग्णांना मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजनासाठी रु.१२,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. – मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

प्रास्ताविक- महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि.१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्साही वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त

साईभक्तांचा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

साईसमाधी शताब्दी सोहळा अधिक संस्मरणीय आणि अर्थपुर्ण व्हावा या उद्देशाने श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालये विभागाने शताब्दी वर्षात मोफत कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया व श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजन करण्याचा मानस केला आहे. तरी यानिमित्ताने दि.०२/०६/२०१८ ते दि.०८/०६/२०१८ या कालावधीत शिर्डी येथे श्री साईनाथ रुग्णालयात सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया शिबीरासाठी डॉ.धनंजय कुलकर्णी , डॉ.गजानन काशिद, अहमदनगर, डॉ.अमोल देशपांडे,पुणे, डॉ. रविंद्र कुलकर्णी , कोपरगांव व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉ.शोभना कोल्हे व डॉ.अमोल जोशी सहभाग नोंदविणार आहेत. तसेच श्रवणयंत्र वाटप करणेकामी लागणा-या ऑडीओमेट्री तपासणी कामी श्री. सागर व श्री. किशोर गायकवाड हे दोन Audiologist Ampliphone India या कंपनीकडुन ऑडीओलॉजिस्ट म्हणुन येणार आहेत. श्री साईनाथ रुग्णालयांत ईएनटी व ऑप्थल ओटी असुन त्यामध्ये सदर शिबीरावेळी ऑप्थल सर्जरी बंद ठेवुन नाक, कान, घसा, सर्जरीसाठी ती उपलब्ध करुन देणेत येईल.

मोफत कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया व श्रवणयंत्र वाटप शिबीर पार पाडण्यासाठी बांधकाम विभाग, विदयुत विभाग, मेकॅनिकल विभाग, जनसंपर्क कार्यालय, आय.टी.विभाग, कॅन्टीन विभाग, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, वाहन, साईआश्रम-१, श्री साईप्रसादालय, साईभक्त निवासस्थान, कामगार विभाग, मध्यवर्ती औषध भांडार, बगीचा विभाग, मंदीर विभाग, बी.व्ही.जी. इंडीया लि., प्रकाशने विभाग, इ. विभागांनामार्फत संबंधीत कामे करुन घेणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- मोफत कान, नाक, घसा विभागातील शस्त्रक्रिया शिबीरामधे नाव नोंदणी,(Face Surgeries,Stepes,DCR,Tympanoplasty,Nasal Polyp,Sinusitis) असे विविध आजारांवर शस्त्रक्रिया व्दारे उपचार करणेत येणार आहेत. तसेच अशा प्रकारचे शस्त्रक्रियेसाठी खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया नुसार जास्तीचा खर्च आकारणी करण्यात येतो.

ग्रामीण भागातील रुग्ण अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यापासुन वंचित राहतात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत आयोजित करणे आवश्यक वाटते. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल.

साधारणपणे कान, नाक,घसा विभागातील किमान १०० रुग्णांवर आवश्यक त्या शस्त्रक्रिया तसेच ५०० ते ७०० रुग्णांना श्रवणयंत्र वाटप करणेचा मानस आहे. सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य ती कानाची चाचणी करण्यात येणार असुन त्यानंतर निवड करण्यात आलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेत येणार आहेत. तसेच श्रवणयंत्र वाटप करणेपुर्वी रुग्णाची Audiology सारखी तपासणी करुन कानाचे मशीन देणेत येणार आहे. सदर Audiology साठी बाहेरुन दोन Audiologist बोलवावे लागतील.याकरिता त्यांना प्रत्येकी दिवसाचे १००० /- रुपये मानधन दयावे लागेल. त्याअनुषंगाने श्री. सागर व श्री. किशोर गायकवाड हे दोन Audiologist Ampliphone India या कंपनीकडुन येण्यास तयार आहेत.

प्रत्येक ऑडीओलॉजी करीता खाजगी रुग्णालयात ६००/- रुपये खर्च येतो.परंतु हे लोक पूर्ण दिवस १०००/- रु मानधनावर ऑडीओलॉजी करणेस तयार आहेत. त्यापैकी दि.०२/०६/२०१८ व ०३/०६/२०१८ या दिवशी बाहेरुन येणारे डॉक्टर्स हे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणार आहेत. व दि.०४/०६/२०१८ व दि.०८/०६/२०१८ या दिवशी आपल्या श्री साईनाथ रुग्णालयातले डॉक्टर्स इतर कानासंबंधी शस्त्रक्रिया करणार आहेत.तसेच शिबीरासाठी आवश्यकतेनुसार व्हिजीटिंग पॅनलवरील भूलतज्ञ बोलविणे आवश्यक आहे व त्यांना त्याबदल्यात संस्थान नियमानुसार ठरलेले दर देणे आवश्यक आहे.

मोफत कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया व श्रवणयंत्र वाटप शिबीरामध्ये खुर्च्या, जाहिरातीसाठी फ्लेक्स बोर्ड, वृत्तवाहीनीवरील बातम्या, वृत्तपत्रात जाहिराती व येणा-या मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्या साठी वाहन व्यवस्था, व्हि.आय.पी. भोजन व्यवस्था, दर्शन व्यवस्था, निवास व्यवस्था, औषध व्यवस्था इत्यादीची संस्थान मार्फत मोफत व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच शिबीरासाठी येणारे डॉक्टर्स हे बाहेरील असलेमुळे त्यांची जेवणाची व नाष्टयाची सोय बाहेरील हॉटेलमध्ये करणे गरजेचे आहे. तसेच शिबीरकामी एकुण

२ ऑपरेशन थिएटरची आवश्यकता असलेमुळे ऑप्थल विभागातील शस्त्रक्रिया दि.०२/०६/२०१८ ते ०३/०६/२०१८ या तारखेला बंद ठेवाव्या लागतील.

तसेच शिबीरासाठी इत्यादी अनुषंगीक बाबींसाठी अंदाजे रक्कम रु. १२ लाख ५० हजार मात्र खर्च अपेक्षित आहे.

याकरिता उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

तसेच संस्थानच्या इतर विभागाकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगीक बाबींची पुर्तता होणेस विनंती.

दि.०२/०६/२०१८ ते दि.०८/०६/२०१८ रोजी मोफत कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया व श्रवणयंत्र वाटप शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| **अ.नं.** | **विभाग** | **विभागांमार्फत करावयाचे कामाचा तपशिल** | **विभागांमार्फत करणेत येणारा अंदाजे खर्च रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | दि.०२/०६/२०१८ रोजी उद्घाटनासाठी २० मान्यवरांसाठी स्टेज व्यवस्था (‘६० X ९०’ साईज). | २,००,०००/- |
| ०२ | जनसंपर्क कार्यालय, श्री साईबाबा हॉस्पीटल | वृत्तपत्र व वृत्तवाहिणीवर **कान, नाक,घसा विभागातील शस्त्रक्रिया व श्रवणयंत्र वाटप** शिबीराची प्रसिदधी करुन गरजु रुग्णांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. | ४,०००/- |
| ०३ | विद्युत विभाग | दि.०२/०६/२०१८ रोजी उद्घाटनासाठी शिबीर स्थळी मंडपामध्ये आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक पॉईट, ७ स्टॅंड फॅनची व ५ कुलरची व्यवस्था करणेत यावी. | १,०००/- |
| ०४ | कॅन्टीन विभाग | १)दि.०१/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर ०९ दिवसाकरीता मान्यवर तथा डॉक्टर्स व इतर स्टाफसाठी आवश्यकतेनुसार मोफत चहा/ कॉफी/बिस्कीटची व्यवस्था करणे.<br>२) १/२(०.५) लिटर ५०० पाणी बाटली मोफत व्यवस्था करणे. | १०,०००/- |
| ०५ | ध्वनीक्षेपण विभाग | १)दि.०२/०६/२०१८ रोजी शिबीरस्थळी उद्घाटनासाठी साऊड सिस्टीम ची पोडीयमसह व्यवस्था करणे.<br>२)शिर्डी व शिर्डी परिसरात अनाऊसमेंटची योग्य ती व्यवस्था करणे. | ५,०००/- |
| ०६ | सीसीटीव्ही विभाग | दि.०२/०६/२०१८ रोजी उद्घाटन कार्यक्रमासाठी फोटोग्राफरची व व्हिडीओ शुटींगची व्यवस्था करणे.<br>२) मंदीर परिसरात टीव्हीवर शिबीराची(Audio Clip) माहिती प्रसारित करणे.<br>३)शिबीरकालावधी झालेनंतर सदर शिबीराचे फोटो श्री साईनाथ रुग्णालयातील प्रशासकीय कार्यालयाकडे सॉप्ट काफी पाठविणे. | ५,०००/- |
| ०७ | वाहन विभाग | १)दि.०१/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर ०९ दिवसाकरीता मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी मागणीप्रमाणे मंदीर, प्रसादालय येथे येण्या जाण्यासाठी आवश्यकतेनुसार वातानुकुलीत वाहनाची व्यवस्था करणे.<br>२) शिबीरकामी साहित्य ने आण करणेकामी मागणीनुसार वाहनाची व्यवस्था करणे.<br>३)शिर्डी व शिर्डी लगतच्या १५० किलोमीटरच्या परिसरामध्ये दि.१५/०५/२०१८ ते दि.३०/५/२०१८ अखेर अनाऊसमेंट कामी एका गाडीची व्यवस्था करणे. | २०,०००/- |
| ०८ | व्दारावती भक्तनिवास | डॉक्टर्स व इतर स्टाफसाठी विनामुल्य ०५ एसी रुम ,५ नॉन एसी रुम दि.०१/०६/२०१८ ते दि.१०/०६/२०१८ अखेर १० दिवसाकरीता विनामुल्य व्यवस्था करणे. | ३०,०००/- |
| ०९ | श्री साईप्रसादालय | १)दि.०१/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर ०९ दिवसाकरीता | ४०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मान्यवर तथा डॉक्टर्स तसेच इतर स्टाफ (१०० व्यक्ती) यांना विनामुल्य नाष्टा पुरविणे.<br>२)दि.०१/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर ०९ दिवसाकरीता बाहेरील डॉक्टरांकरिता प्रसाद भोजनाची व्हि.आय.पी कक्षात अथवा बाहेरील हॉटेलमध्ये व्यवस्था करणे.<br>३) तसेच इतर स्टाफ साठी दि.०१/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर दोन वेळच्या प्रसाद भोजनाची व्ही आय पी कक्षात करणेत यावी. | |
| १० | जनसंपर्क कार्यालय | आवश्यकतेप्रमाणे मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी मोफत श्रींच्या दर्शनाची व्हि.आय.पी. दर्शन व्यवस्था करणे. | ५,०००/- |
| ११ | कामगार विभाग | दि.०२/०६/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ अखेर ०८ दिवसांकरिता शिबीराकामी सकाळ/दुपार/रात्री०३ सुरक्षारक्षक प्रत्येकी शिप्टकामी मिळावे. | ५,०००/- |
| १२ | मध्यवर्ती औषध भांडार | शिबीराकामी मागणीप्रमाणे लागणारे Consumable साहित्य,औषध, गोळ्या , ५०० ते ७०० नग श्रवणयंत्रे व इतर अनुषंगीक साहित्याची उपलब्धता करणे. | ६,००,०००/- |
| १३ | *बगीचा* विभाग | दि.०२/०६/२०१८ रोजी शिबीर स्थळी उभारणी करण्यात आलेल्या मंडप तथा स्टेज जवळ २०-२५ कुंडयांची व्यवस्था करणे. | ५,०००/- |
| १४ | प्रकाशने विभाग | शिबीरकामी येणा-या डॉक्टर्स व टेक्नीशियन यांचे सत्कारासाठी साईबाबांचे ३ डी फोटो - १५ नग (प्रति नग ४०० रु.)मोफत मिळणेस विनंती. | १०,०००/- |
| १५ | मंदीर विभाग | दि.०२/०६/२०१८ रोजी शिबीर उद्घाटन कामी पुजेच्या साहित्यासह पुजा-याची व्यवस्था करणे. | ५०००/- |
| १६ | उदीप्रसाद विभाग, प्रशासन शाखा | शिबीरस्थळी डॉक्टर्स व मान्यवर यांना प्रसाद म्हणुन उदीप्रसाद पाकिट साधारण १०० पॅकेटची व्यवस्था करणेत यावी. | - |
| १७ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी ऐनवेळी लागणा-या अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळावी.(प्लेक्स बोर्ड प्रिंटींग , रांगोळी,सोफासेट,पेपर प्लेट,ग्लास, पाणी जार ,बाहेरील हॉटेलचे दोन्ही वेळचे जेवण व नाष्टा बील ) | २,००,०००/- |
| १८ | वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीरासाठी बाहेरुन येणा-या ॲडीओमेट्री डॉक्टर्स व रुग्णांना भुल देणे कामी बाहेरुन येणारे ऑन कॉल बेसेसवर (भुलतज्ञ) डॉक्टर्स यांना अनुकमे भत्ते व वेतन देण्यात यावे. | १,००,०००/- |
| १९ | लाडु प्रसाद निर्मिती विभाग | शिबीरासाठी येणा-या डॉक्टर्स व इतर स्टाफ यांना प्रसाद देणेकामी ५० नग प्रसाद लाडु पाकिटे मोफत व्यवस्था करणेत यावी. | ५०००/- |
| | | **एकुण खर्च** | **१२,५०,०००/-** |

उद्घाटन कार्यक्रम दि. ०२/०६/२०१८ तारखेस दुपारी ४.०० वाजता आयोजित करणेत आलेले आहे. तसेच संस्थानच्या इतर विभागांकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगिक बाबींची पुर्तता होणेस व त्या अनुषंगाने रु. १२ लाख ५० हजार रुपये खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३७ वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत आजारांचे यादीत फेरबदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनिय २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- :- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविक:-मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/१२/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.१४ निर्णय क्र.१०६४, यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आर्थिक अनुदानाअभावी गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता उपरोक्त विभागाच्या अभिप्रायामधील तक्त्यात नमुद केलेल्या रुग्णालयांपैकी अ.नं.१, २ व ५ रुग्णालये वगळता उर्वरित रुग्णालयांमधील प्रस्तावित प्रलंबीत प्रकरणांपैकी पात्र प्रकरणांचे वैद्यकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे.

याचवेळी अशीही चर्चा झाली की, बऱ्याचशा आजारांसाठी राजीवगांधी जीवनदायी योजनेमार्फत रुग्णांना वैद्यकिय आर्थिक अनुदान मिळत असते. त्यामुळे ज्या आजारांचा राजीवगांधी जीवनदायी योजनेमध्ये समावेश नाही, फक्त अशा आजारांसाठी संस्थानमार्फत वैद्यकिय आर्थिक अनुदान दिले जावे, असे समितीचे मत झाले व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयान्वये, व दि.०५/०१/२०१८ रोजीचे टिपणीस अनुसरुन, जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/४३५/२०१८, दि.२६/०१/२०१८ चे आदेशान्वये,

१) उप जिल्हाधिकारी, २) उपकार्यकारी अधिकारी,
३) मुख्य लेखाधिकारी, ४) वैद्यकीय संचालक,
५) उपवैद्यकीय संचालक, ६) वैद्यकीय अधिक्षिका व दोन डॉक्टर यांची कमिटी स्थापन करणेत आली.

याबाबत दि.१५/०२/२०१८ रोजी मा.उप जिल्हाधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली, उपरोक्त विषयांस अनुसरुण मिटिंग आयोजित करणेत आली होती. मिटिंगसाठी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब, मुख्य लेखाधिकारी साहेब, वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षिका उपस्थित होते.त्यामध्ये पुढिल प्रमाणे चर्चा करणेत आली.

शासन निर्णय क्र.रागांयो २०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६, दि.३१मे,२०११ अन्वये, राजीवगांधी जीवनदायी योजनेत, (सध्याची महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना), ९७१ आजाराचा समावेश करणेत आला होता. आता शासन निर्णय क्र.रागांयो २०१६/प्र.क्र.६४/आरोग्य-६, दि.०८जुलै२०१६ अन्वये, पुर्वीच्या ९७१ प्रोसिजर्सपैकी अत्यंत कमी वापर असलेल्या प्रोसिजर्स वगळण्यात आलेल्या असुन काही नविन प्रोसिजर्सचा समावेश करणेत आलेला आहे. तसेच कर्करोग, बालकावरील उपचार, वृध्दावरील उपचार **Hip & Knee Replacement**, सिकलसेल, ॲनिमिया, डयेंगू, स्वाईन फ्ल्यू इ.साठी नविन उपचारांचा समावेश करुन रक्तविकार शास्त्र **(Hematology)** विशेषज्ञ सेवेसह ३१ विशेषज्ञ सेवांतर्गत एकून ११०० प्रोसिजर्सचा (परिशिष्ट अ) समावेश योजनेत करणेत आलेला असुन त्यामध्ये १२७ पाठपुरावा सेवांचा समावेश असेल. तसेच १११ प्रोसिजर्स शासकीय रुग्णांलयासाठी तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्याकरीता राखीव ठेवण्यात येतील. मात्र डोंगराळ/आदिवासी/शासन निर्णयात नमुद केलेल्या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी शासकीय रुग्णालयासाठी राखीव असलेले उपचार पध्दतींसाठी पुरेशी पर्यायी आरोग्य व्यवस्था उपलब्ध नसल्याने जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रमाणित केल्यानंतर खाजगी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत उपलब्ध करुन देणेत येतील तथापी सदर उपचारपध्दतीच्या वापराचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यामध्ये नविन प्रोसिजर्स वाढविणे किंवा कमी करणेचे अधिकार नियामक परिषदेस असतील. मा.व्यवस्थापन समितीने सुचविलेले डेंग्यु, स्वाईन फ्लु इत्यादी आजारांचा समावेश राजीव गांधी जीवनदायी (सध्याची महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना), योजनेत करणेत आलेला आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देत असलेल्या,

१) हृदय शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.
२) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार.
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.
४) कर्करोगासंबंधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.
५) रक्तासंबंधी आजार ( उदा.हिमोफेलिया ).
६) जी.बी.एस. ( Gullain Barre Syndrome ).
७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.
८) कॉक्लीअर इम्प्लांट.

यातील **अ.क्र.** १) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,
२) किडनी डायलेसिस व नंतरचे उपचार,

३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,

७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजांवरील शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, हे श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात होत असल्याने, हे आजार वगळुन. **अ.क्र.**

४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,

५) रक्तासंबंधी आजार, ( उदा.हिमोफेलिया )

६) जी.बी.एस ( **Gullian Barre Sundrome**),

८) कॉक्लीअर इम्प्लांट,या आजारांना व **सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट** (Transplant), **शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,** या आजारांचा समावेश करुन, त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी, असे ठरले.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान:- श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, त्यास शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चापोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पर्यंत जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८५ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- कमिटीने शिफारस केलेल्या, नियमावलीतील आठ आजारांपैकी, **अ.क्र.**१,२,३,७ आजांवरील शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,हे आजार वगळुन, नियमावलीतील **अ.क्र.**४,५,६,८ हे आजार व सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजारांचा समावेश वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत करावा, असे मत आहे. याकरिता शासनाची मान्यता घ्यावी लागेल. सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार ही खर्चीक बाब आहे. यापुर्वी दि.५ मे २००६ रोजीचे सासावि-२००५/३७६/(७६-का.सोळा) विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२ यांची नियमावलीत बदलाबाबत मंजुरी घेतलेली होती. त्यानंतर जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२८३७/२०११ डिस्पॅच दि. १०/०९/२०११, मा.कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत नियमावलीत बदलाबाबत कळविलेले आहे. सोबत संस्थानतर्फे देण्यात येणारे वैद्यकीय आर्थिक अनुदानाची नियमावली प्रत जोडत आहोत.

तरी सदरचा, प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे १) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, २) रक्तासंबंधी आजार, ( उदा.हिमोफेलिया ) ३) जी.बी.एस ( Gullian Barre Sundrome), ४) कॉक्लीअर इम्प्लांट ५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार या आजारांचा समावेश करणेत यावा. तसेच सध्या देण्यात येत असलेल्या रु.२५,०००/- मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेत वाढ करुन अनुदानाची रक्कम रु.५०,०००/- मात्र करण्यात यावी. तसेच याबाबत सुधारित नियमावली तयार करुन ती मान्यतेसाठी सभेसमोर सादर करावी, असे ठरले.** **(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३८** **संस्थान कर्मचारी किंवा त्यांचेवर अवलंबीत नातेवाईकांवर वैद्यकीय उपचारासाठी करण्यात आलेल्या जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –** पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ प्र. संस्था<br>हुद्दा- निर्देशक | स्वतः | HTN | डॉ. बागडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३१५०१.०० | २१८१५.०० | |
| २ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | आई | Diabetes | डॉ. गिळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३०७६.०० | ३०७६.०० | |
| ३ | श्री. अशोक नामदेव झुरंगे<br>विभाग- भांडार<br>हुद्दा- अधिक्षक | स्वतः | Diabetes/blood pressure | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५७५७.०० | ५१५७.०० | |
| ४ | श्री. रविंद्र बापू गावडे<br>विभाग- पाणी पुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडिल | UTI | डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २६८९४.०० | २६६५८.०० | |
| ५ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभूवन<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः / पत्नी | Diabetes/blood pressure | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ४६३२.०० | ४६३२.०० | |
| ६ | श्री. कुदळे आण्णासाहेब गोवर्धन<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Diabetes | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ५३००.०० | ५३००.०० | |
| ७ | श्री. दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग- लेखाशाखा<br>हुद्दा- लिपिक | आई | Diabetes | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७४७३.०० | ७३०३.०० | |
| ८ | मंदाकिनी सिताराम कडू<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | स्वतः | Eye Treatment | डॉ. अग्रवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | १५३०.०० | १५३०.०० | |
| ९ | संगिता संजय थोरात<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | स्वतः<br>सासू<br>मुलगी | Diabetes/skin treatment/Asthama | डॉ. गिळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २०६०६.०० | २०३०१.०० | |
| १० | श्री.सचिन अंबादास डावरे<br>विभाग- सी.सी.टि.व्ही.<br>हुद्दा – मदतनीस | वडील | Ca | डॉ. आव्हाड<br>डॉ. गिळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | १३५११.०० | १३५११.०० | |
| | | | | **अ - एकूण रक्कम** | | **१२०३८०.००** | **१०९२८३.००** | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ब. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| ११ | श्री.अशोक हरीभाऊ शेळके<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Artenal embolisation skull ban surgery | डॉ. ओगले/ डॉ. जोशी | रुबीहॉल क्लिनिक, पुणे | ३३२६७१.०० | ३१९७४५.०० | |
| १२ | निर्मला प्रभाकर घुले<br>विभाग- प्रसादालय<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Ca | डॉ. प्रशांत काळे | सेठ नंदलाल घूत हॉस्पिटल | ८३७८६.०० | ८१४४६.०० | |
| १३ | शकुंतला शंकर माहिते<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | आई | Ca | डॉ. बो-हाडे | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई | ७०९३.०० | ६५९६.०० | |
| १४ | योगेश त्रंबक साळवी<br>विभाग- लेखाशाखा<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Ca | डॉ. किरण खांदे | HCG मानवता क्यूरी कॅन्सर सेंटर, नाशिक | २२९०५.०० | २२३४०.०० | |
| १५ | श्री सुर्यकांत नामदेव वाणी<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Abd fullness ALD With Oesophagealvericos | डॉ. कांदाळकर | सेठ नंदलाल घूत हॉस्पिटल | २८१८३.०० | २८१३३.०० | |
| १६ | श्री कैलास उध्दवराव तुपे<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- लिपिक | वडील | Rtlung pneumonitis/ COPD/ IHD | डॉ. जाधवर | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | २२२२४५.०० | १९०६०७.०० | |
| | | | | | **ब - एकूण रक्कम** | **६९६८८३.००** | **६४८८६७.००** | |
| | | | | | **अ+ब - एकूण रक्कम** | **८१७२६३.००** | **७५८१५०.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.७,५८,१५०/- इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहे. त्यामुळे संबंधीतांना देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं.३९ श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेकामी आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ तदतुद-** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शती क्र ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्तअ नं ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र- १) दि. ०३/०६/२००६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३२८(२) कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | Doctors Charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note:1. Anaesthist's share-30% of the Surgeon's Charges 2. Assistant Surgeon 10% of the Surgeon's Charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५० % हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५ % हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

२) दि. २२/०९/२००७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ७७०.

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अँन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, न्नेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

3) दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र २७५.

मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने देण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणूकास मान्यता देण्यात आली.

तसेच, कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि.०१/०४/२०१४ पासून प्रति एन्जीओग्राफीसाठी रू.३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रू.३०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको साठी सध्या लागू असलेला इंसेंटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७५(५).

संस्थान रूग्णालयामध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान करण्यात आले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४९३.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी याचा विचार करून तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपुर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनयांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन / प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावा.

याचबरोबर संस्थान रूग्णालये चालविणेसाठी कन्सल्टंन्सी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रस्ताविक- श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने नोकरी मिळणेसाठी खालीलप्रमाणे अर्ज वेळोवेळी प्राप्त झालेले आहे.

| अ नं | अर्जदाराचे नाव | मागणी केलेल्या पदाचे नाव | अर्जदारांची शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | डॉ संभाजी शिवाजी डांगे | जनरल सर्जन | एमबीबीएस, एमएस (सर्जरी) |
| २ | डॉ शितल ओमप्रकाश बगडिया | स्त्रिरोग तज्ञ | एमबीबीएस, डीजीओ |
| ३ | डॉ रूपेन सुमनचंद्र मकवाना | सिनीअर अॅनेस्थेसियालॉजीस्ट | एमबीबीएस, डीए |
| ४ | डॉ अमित राऊत | पेडीयाट्रीक सर्जन | एमबीबीएस, एमडी पेडीयाट्रीक |
| ५ | डॉ चैतन्य गोपाल शेटे | कार्डीयाक सर्जन | एमबीबीएस, एमसीएच सीव्हीटीएस |
| ६ | डॉ तुषार फकीरचंद अग्रवाल | पेडीयाट्रीक आर्थोपेडीक सर्जन | एमबीबीएस, एमएस, डी आर्थो |
| ७ | डॉ सोहम सुनिलकुमार दोषी | गॅस्ट्रोएन्टरोलॉजी | एमबीबीएस, एमडी, डीएनबी गॅस्ट्रो |
| ८ | डॉ हेमंतकुमार हरी देवरे | जनरल सर्जन | एमबीबीएस, एमएस सर्जरी |
| ९ | डॉ गौरव रॉय | ईएनटी सर्जन | एमबीबीएस, एमएस ईएनटी |
| १० | डॉ अमोल सारंगधर शिंदे | गॅस्ट्रोएन्टरोलॉजीस्ट | एमबीबीएस, डीएनबी गॅस्ट्रो, जनरल मेडीसीन. |
| ११ | डॉ निलेश निवृत्ती तुपलोंढे | फिजिशियन | एमबीबीएस, एमडी जनरल मेडीसिन |
| १२ | डॉ प्रदीप पिराजी केंद्र | ऑन्कोलॉजीस्ट/ हिमॅटोलॉजीस्ट | एमबीबीएस, एमडी, डीएम ऑन्कोलॉजी |
| १३ | डॉ तनय पाडगावकर | कार्डीओलॉजीस्ट | एमबीबीएस, एमडी, डीएम कार्डीओ |
| १४ | डॉ विराज विजय बोरगावकर | ऑन्कोसर्जन | एमएस, एमसीएच (ऑन्को) |

आकृतीबंधानुसार **श्री साईनाथ रूग्णालयातील** सद्यस्थिती व मा डीन बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | डीन बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता | आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | अस्थायी | व्हिजीटींग | |
| जनरल सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** MS/DNB General surgery with minimum experience of **2** years OR **3)** FCPS Surgery with minimum experence of **3** years in Gen Surgery **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory | | | | | |
| स्त्रिरोग | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS. **3)** MD/MS/DNB OBGY with minimum experience of **2** years in OBGY. OR **3)** FCPS OBGY with minimum experience of **3** year in OBGY. OR **3)** University diploma / CPS diploma in OBGY with minimum experience of **5** years in OBGY. **4)**MS-CIT. **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० |
| आर्थोपेडीक सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS. **3)** MS/DNB Orthpaedic surgery with minimum experience of **2** years in Orthopaedic Surgery. OR **3)** Univ/CPS Diploma in Ortho with minimum exp of **5** yrs in Orthopaedics. OR **3)** FCPS Surgery with minimum experience of **3** years in Orthopaedic Surgery. **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० |
| मेडीकल ऑफीसर फिजिशियन | 1) Age not more than 45 yrs. Age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS. 3) MD/DNB General Medicine with minimum experience of 2 years in Medicine. OR 3) FCPS Medicine with minimum experience of 3 years in Medicine 4)MS-CIT. 5) MMC/ MCI Registration with renewal is mandatory for MBBS/ MD. | ०२ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ईएनटी सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. If, the no. of applications are less and experience is not as per advt. then the criteria & experience may be relaxed for the available candidates. **2)** MBBS & **3)** MS/DNB ENT with minimum experience of **2** years in ENT Surgery OR **3)** FCPS Otorhinolayngiology with minimum experience of **3** years in ENT Surgery OR **3)** University diploma / CPS diploma in ENT with minimum experience of **5** yrs in ENT Surgery **4)**MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal are mandatory. | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० |

डॉ.डांगे एस.एस. यांची साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग सर्जन म्हणून नेमणूक करणेकामी मा.विश्वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी दि.०३/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिफारस केलेली आहे.

आकृतीबंधानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सद्यस्थिती व मा डीन बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | डीन बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता | आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | अस्थायी | व्हिजीटींग | |
| जनरल सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of | ०४ | ०१ | ०२ | ०० | ०१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** MS/DNB General surgery with minimum experience of **2** years OR **3)** FCPS Surgery with minimum expeence of **3** years in Gen Surgery **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | | | | | |
| सिनीअर अॅनेस्थेसिया लॉजीस्ट | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS. **3)** MD/DNB Anaesthesiology with minimum experience of **2** years in Anaesthesiology. OR **3)** FCPS Anaesthesiology with minimum experience of **3** years in Anaesthesiology. **3)** University diploma / CPS diploma in Anaesthesiology with minimum experience of **5** years in Anaesthesiology. **4)** MS-CIT. **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०६ | ०१ | ०० | ०१ | ०५ |
| पेडीयाट्रीक सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS. **3)** MCH/DNB Paediatric surgery. **4)**MS-CIT. **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| फिजिशियन | 1) Age not more than 45 yrs. Age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS. 3) MD/DNB General Medicine with minimum experience of 2 years in Medicine OR 3) FCPS Medicine with minimum experience of 3 years in Medicine. 4)MS-CIT. 5) MMC/ MCI Registration with renewal is mandatory for MBBS/ MD. | ०४ | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| कार्डीयाक सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** MCH/DNB Cardiothoracic surgery **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०३ | ०० | ०१ | ०३ | ०२ |
| गॅस्ट्रोएन्टरो लॉजी | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** DM/DNB Gastroenterology **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| आर्थोपेडीक सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS. **3)** MS/DNB Orthpaedic surgery with minimum experience of **2** years in Orthopaedic Surgery. OR **3)** Univ/CPS | ०३ | ०१ | ०२ | ०५ | ०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Diploma in Ortho with minimum exp of **5** yrs in Orthopaedics**.** OR **3)** FCPS Surgery with minimum experience of **3** years in Orthopaedic Surgery. **4)** MS-CIT**. 5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory**.** | | | | | |
| कार्डीओलॉजीस्ट | '**1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** DM/DNB Cardiology **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory. | ०२ | ०२ | ०२ | ०४ | ०० |
| ईएनटी सर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. If, the no. of applications are less and experience is not as per advt. then the criteria & experience may be relaxed for the available candidates. **2)** MBBS & **3)** MS/DNB ENT with minimum experience of **2** years in ENT Surgery OR **3)** FCPS Otorhinolayngiology with minimum experience of **3** years in ENT Surgery OR **3)** University diploma / CPS diploma in ENT with minimum experience of **5** yrs in ENT Surgery **4)**MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal are mandatory. | ०२ | ०० | ०० | ०० | ०२ |
| ऑन्कोसर्जन | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** MCH/DNB Oncosurgery **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| मेडीकल ऑन्कोलॉजीस्ट | **1)** Age not more than **45** yrs. Age relaxation of **5**yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. **2)** MBBS **3)** DM/DNB Medical Oncology. **4)** MS-CIT **5)** MMC/ MCI Registration with renewal is mandatory**.** | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |

**A)** उपरोक्त प्रस्तावातील अर्जदार यांचा संस्थानमधील पुर्वईतिहास खालीलप्रमाणे आहे.

१. डॉ संभाजी शिवाजी डांगे यांची दि. ०६/०७/१९९८ रोजी श्री साईनाथ रूग्णालयात सिनीअर मेडीकल ऑफीसर (जनरल सर्जरी) या पदावर नेमणूक करणेत आली होती. तदनंतर त्यांना दि. १३/०७/१९९९ पासून संस्थान सेवेत कायम करणेत आले होते. तदनंतर सौ तांबटकर, तत्कालीन सिस्टर इन्चार्ज यांनी दि. ११/०४/२००१ रोजीचे अर्जान्वये डॉ डांगे यांनी माझा व इतर नर्सेसचा अपमान व विनयभंग केल्याने त्यांचेवर कडक कारवाई करणेबाबत कळविले होते. सदर प्रकरणामुळे डॉ डांगे यांना दि. १५/१०/२००१ रोजी कार्यालयीन वेळेनंतर संस्थान रूग्णालयाचे सेवेतून मुक्त करण्यात आले होते. संस्थानमध्ये व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ संभाजी शिवाजी डांगे, एम एस जनरल सर्जन, रा. राहाता परवानगी देणेबाबत मा विश्वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी जा.नं.४९२०२०१७ दि. ०३/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिफारस केली असुन डॉ डांगे यांना व्हिजीटींग सर्जन म्हणून श्री साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये २ दिवस आणि साईनाथ रूग्णालात २ दिवस असे आठवड्यातून ४

दिवस, परवानगी संबंधी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय ठेवून नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी असे सदर पत्रान्वये कळविले आहे.

२. डॉ शितल ओमप्रकाश बगडीया ह्या आरएमओ पदावर कार्यरत होत्या त्यांचा राजीनामा मंजुर झाल्याने सध्या त्या संस्थान रूग्णालयात कार्यरत नाही.

३. डॉ रूपेन सुमनचंद्र मकवाना यांना भुलतज्ञ या पदावर व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक दिली होती तथापि ते रूग्ण तपासणीसाठी येत नसल्याने त्यांचे नेमणूक संपुष्टात आणणेत आली आहे.

४. डॉ अमित राऊत यांना पेडीयाट्रीक सर्जन पदावर व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक दिली होती तथापि ते रूग्ण तपासणीसाठी येत नसल्याने त्यांची नेमणूक संपुष्टात आणणेत आली आहे.

५. डॉ चैतन्य गोपाल शेटे हे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयाक सर्जन पदावर कार्यरत होते त्यांचा राजीनामा मंजुर करणेत आलेला आहे.

६. डॉ हेमंतकुमार हरी देवरे हे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जनरल सर्जन पदावर कार्यरत होते त्यांचा राजीनामा मंजुर करणेत आलेला आहे.

७. मा मुं उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे सिव्हील ॲप्लीकेशन नं १६५२१/२०१५ दि. १८/१२/२०१५ रोजीचे आदेशानुसार तीन व्हिजीटींग व दोन कॉन्ट्रक्ट बेसिस पध्दतीने कार्डीओलॉजीस्ट घेणेबाबत परवानगी मिळालेली असुन सद्यस्थिती उपरोक्त नमुद वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सध्या ह्रदयविकार तज्ञ या संवर्गात मंजूर असलेल्या २ पदांवर नियुक्त डॉक्टर निलंबित असल्याने या २ पदांवर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने तात्पुरत्या स्वरूपात (११ महिन्यांच्या करार पध्दतीने वा सध्या संस्थानात प्रचलित असलेल्या पध्दतीनेप्रमाणे) तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणेत आलेली असुन त्याव्यतिरीक्त तात्पुरत्या स्वरूपात किंवा नियमित स्वरूपात यापैकी शासन मान्य करेल त्याप्रमाणे अन्य २ ह्दयविकार तज्ञ नियुक्त करण्यासाठी सदर संवर्गातील २ काल्पनिक पदे / नियमित पदे मंजूर निर्माण करणेस व त्यांना नियमित ह्दयविकार तज्ञानुसार वेतन देणेस मान्यता मिळणेकामी मा प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांना दि. १७/११/२०१७ रोजी प्रस्ताव पाठविलेला असुन यासंदर्भात अद्यापपावेतो अभिप्राय / आदेश आलेले नाहीत.

**B)** प्रस्तावातील नमुद अर्जदार यांचे अर्जाबाबत विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | अर्जदाराचे नाव | मागणी केलेल्या पदाचे नाव | विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत |
|---|---|---|---|
| १ | डॉ संभाजी शिवाजी डांगे<br>मु. पो. साकुरी, ता. राहाता. | जनरल सर्जन | सध्या जनरल सर्जन या पदाची आवश्यकता नसल्याने तसेच सदर अर्जदार यांचे वय प्रस्तावीत पात्रतेपेक्षा जास्त असल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| २ | डॉ शितल ओमप्रकाश बगडिया<br>औरंगाबाद. | स्त्रिरोग तज्ञ | सध्या स्त्रिरोग तज्ञाची आवश्यकता नसल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| ३ | डॉ रूपेन सुमनचंद्र मकवाना<br>मु पो. रणदीप, अहमदाबाद, गुजरात | सिनीअर ॲनेस्थेसिया-लॉजीस्ट | यापुर्वी श्री साईबाबा रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक दिली होती मात्र एकदाही रूग्णतपासणीसाठी न आल्याने नेमणूक संपुष्टात आणलेली आहे. पुन्हा नेमणूक न देता सदरचा अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| ४ | डॉ अमित मोहन राऊत<br>मु पो मारकंडीया नगर, कुमठा नाका, सोलापूर. | पेडीयाट्रीक सर्जन | यापुर्वी श्री साईबाबा रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक दिली होती मात्र एकदाही रूग्णतपासणीसाठी न आल्याने नेमणूक संपुष्टात आणलेली आहे. पुन्हा नेमणूक न देता सदरचा अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| ५ | डॉ चैतन्य गोपाल शेटे<br>मु पो. अंधेरी वेस्ट, मुंबई | कार्डीयाक सर्जन | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात आवश्यकता नसल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| ६ | डॉ तुषार फकीरचंद अग्रवाल<br>आस्था हॉस्पिटल, मेन एस | पेडीयाट्रीक आर्थोपेडीक सर्जन | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात आवश्यकता नसल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | व्ही रोड, कांदीवली वेस्ट, मुंबई. | | |
| ७ | डॉ सोहम सुनिलकुमार दोषी<br>मु पो. समता नगर, नाशिक | गॅस्ट्रोएन्टरोलॉजी | सध्या साईबाबा रूग्णालयात गॅस्ट्रोएन्टरोलॉजीस्ट नसल्याने व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |
| ८ | डॉ हेमंतकुमार हरी देवरे<br>नाशिक | जनरल सर्जन | सध्या जनरल सर्जन या पदाची आवश्यकता नसल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| ९ | डॉ गौरव सुभाशिष रॉय<br>मु पो सावरकर नगर, गंगापुर रोड, नाशिक | ईएनटी सर्जन | साईनाथ रूग्णालयाचे आकृतीबंधात १ पद मंजुर आहे तसेच श्री साईबाबा रूग्णालयाचे आकृतीबंधात २ पदे मंजुर आहेत. माञ ईएनटी हा विभाग फक्त श्री साईनाथ रूग्णालयात असल्याने सध्या तेथे एक ईएनटी सर्जन ११ महिने कालावधीसाठी पुर्ण वेळ व एक ईएनटी सर्जन व्हिजीटींग पध्दतीने कार्यरत आहे. ईएनटी सर्जनची श्री साईनाथ रूग्णालयात आवश्यकता असल्याने डॉ रॉय यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |
| १० | डॉ अमोल सारंगधर शिंदे<br>मु पो प्रवरानगर, ता. राहाता. | गॅस्ट्रोएन्टरोलॉजीस्ट | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात गॅस्ट्रोएन्टरोलॉजीस्ट नसल्याने व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |
| ११ | डॉ निलेश निवृत्ती तुपलोंढे<br>मु पो. सातपुर कॉलनी, नाशिक | फिजिशियन | सध्या श्री साईनाथ रूग्णालयात फिजिशियनची आवश्यकता असल्याने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |
| १२ | डॉ प्रदीप पिराजी केंद्रे<br>मु पो. वृंदावन सोसायटी, बोरीवली वेस्ट, मुंबई. | ऑन्कोलॉजीस्ट / हिमॅटोलॉजीस्ट | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात ऑन्कोलॉजीस्ट नसल्याने व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |
| १३ | डॉ तनय पाडगावकर<br>मुंबई. | कार्डीओलॉजीस्ट | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात आवश्यकता नसल्याने अर्ज नस्तिबंद करता येईल. |
| १४ | डॉ विराज विजय बोरगावकर<br>मु पो अक्षय, युथ हॉस्पिटल समोर, स्टेशन रोड औरंगाबाद. | ऑन्कोसर्जन | सध्या श्री साईबाबा रूग्णालयात ऑन्कोसर्जन नसल्याने व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती. |

तरी व्हिजीटींग पध्दतीने नोकरी मिळणेकामी आलेल्या उपरोक्त अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. सोहम सुनिलकुमार दोषी, गॅस्ट्रोएन्टरोलॉजी, डॉ.गौरव सुभाशिष रॉय, ईएनटी सर्जन, डॉ निलेश निवृत्ती तुपलोंढे, फिजिशियन यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०१८-१९ करीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेसाठी रु.१,०५,६८,६७८/- चे खर्चास व निविदा काढण्यास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२७.०७.२०१५ निर्णय क्रं २३३ अन्वये रु.६५,३२,७६५/- मात्रचे खर्चासस‍ंस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाने औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी , असे ठरले

होते. त्यानुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६५२४/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश देण्यात आलेला होता व त्यास अनुसरुन माल देखील प्राप्त झालेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सर्ववार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे छपाई व कार्यालयीन स्टेशनरी दरवर्षी सर्व विभागांची वार्षिक मागणी घेऊन ती एकत्रित करुन मा.व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेने विहीत पध्दतीने ई निविदा मागवुन खरेदी करणेत येत असते. त्यानुसार सन २०१८-१९ या वर्षाकरीता लागणारे छपाईकरीता दि.१४/१२/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांनादि. ३०/१२/२०१७ पर्यंत मागणी देण्याचे कळविण्यात आले होते.परंतु दि.३०/१२/२०१७ अखेर दोन ते तीन वॉर्डची मागणी आलेली होती,त्यामुळे उर्वरीत वार्ड व विभागांना वेळोवेळी दुरध्वनी वरुन तगादा करण्यात आलेला होता त्यानुसार त्यांची मागणी व नमुने दि.१०/०२/२०१८ अखेर प्राप्त झालेले आहेत.

दि.१/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालय पुर्णपणे मोफत झालेले आहे त्यामुळे रुग्णांच्या संख्येत देखील वाढ झालेली आहे.त्यामुळे छपाई व स्टेशनरीच्या संख्येत फार मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच दि. ०१/०७/२०१७ पासून GST लागू झाल्याने दरात वाढ झालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागांकडून वार्षिक छपाई व कार्यालयीन स्टेशनरीची मागणी प्राप्त झालेली असून श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील अंर्तरुग्ण व बाहयरुग्ण व शस्त्रक्रीया यांचे तुलनेत मागील वर्षापेक्षा १५ ते २० टक्के रुग्णांत वाढ झालेली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मोफत उपचार केले जात असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तसेच महात्मा फुले जीवनदायी योजना नव्याने चालू झाल्याने त्या विभागाची वाढलेली मागणी देखील विचारात घेतलेली आहे. तसेच गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या दरात वाढत्या महागाईमुळे पेट्रोल,डिझेल व कच्च्या मटेरीयलच्या किंमती वाढलेल्या आहे. त्यामुळे दरात वाढ झालेली आहे.

सदरची मागणी अंदाजे १ वर्षाकरीता असुन त्यात कमी किंवा जास्त खप होऊ शकतो. दोन्ही रुग्णालयात दैनंदिन लागणारी छपाई व स्टेशनरी नसल्यास कामाची गैरसोय होऊ शकते.

सदरची प्राप्त मागणी एकत्रित करुन त्याची होणारी एकुण मागणी व सध्या स्टोअरमध्ये असलेली शिल्लक व वापर / खप बघुन निव्वळ मागणी तयार करण्यात आली असून त्याचा तक्ता सोबत परिशिष्ट अ व ब म्हणून सादर केला आहे.

सदर वार्षिक सन २०१८-१९ या वर्षाकरीता लागणा-या छपाई व स्टेशनरी खरेदीकामीच्या अंदाजे खर्चाकरीता मे. महाराजा मुद्रणालय, देवळाली प्रवरा यांचेकडे अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, वार्षिक छपाई मागणीचे आयटम जास्त असल्याकारणाने त्यांना दरपत्रक देण्यास विलंब झाला असून त्यांनी दि. ७/०३/२०१८ रोजी त्यांचे दरपत्रक दिलेले आहे.त्यांचे दरपत्रकानुसार सदर खरेदीकामी रु. १,०५,६८,६७८/- अक्षरी पुर्णांकित एकूण रक्कम एक कोटी पाच लाख अडुसष्ट हजार सहाशे अठयाहत्तर रुपये) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| नं. | विभागाचे नाव | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|
| अ | छपाई | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४२,१२,५८८ |
| | श्री साईनाथ रुग्णालय | ५१,१३,५१५ |
| | **अ- एकुण रक्कम सर्व करांसहित रु.-** | **९३,२६,१०३** |
| ब | कार्यालयीन स्टेशनरी | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय सारखेच आयटम असल्याने एकत्रित मागणी | १२,४२,५७५ |
| | **ब - एकुण रक्कम सर्व करांसहित रु.-** | **१२,४२,५७५** |
| | **एकुण रक्कम रु.- (अ + ब)** | **१,०५,६८,६७८ रु.** |

तरी उपरोक्त छपाई व कार्यालयीन स्टेशनरी विहीत पध्दतीने ई – निविदा मागवुन करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. १,०५,६८,६७८/- (अक्षरी पुर्णांकित एकूण रक्कम एक कोटी पाच लाख अडुसष्ट हजार

सहाशे अठयाहत्तर रुपये)मात्रचे खर्चास, मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०१८-१९ करीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. १,०५,६८,६७८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वद्यकिय संचालक)**

---

**विषय नं.४१** **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात Urology Surgery करिता Telecom, Telescope 30° व sheath खरेदीसाठी रु.१५,५८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक**:- श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने (Urology) मागणीपत्रान्वये Telecom, Telescope $30^0$ व Sheath – ०१ सेटची मागणी केलेली आहे. किडनीच्या संबंधित शस्त्रक्रिया करताना हया सेटचा वापर होतो (उदा.TURP, URS, Kidney Stone). सध्या त्यांचेकडे Telecom, Telescope $30^0$ व Sheath एक सेट आहे, परंतु सदरहू सेट हा जुना झाल्यामुळे व्यवस्थित काम देत नाही, त्यामुळे Urology शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांनी नविन सेटची मागणी केलेली आहे. त्यामुळे नविन Telecom, Telescope $30^0$ व Sheath खरेदीकामी M/s.Apple Life Sciences, New Delhi यांचेकडून अंदाजे खर्चाकरीता दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांनी दि.१४/०३/२०१८ रोजीचे मेल व्दारे खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate Per In Rs. | Total Amt. In Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | HD Telescope Forward Oblique 30°, wide angle, Ø 4 MM, 303 MM long, Autoclavable, colour code: Red | 01 | 225000.00 | 225000.00 |
| 02 | Cysto-Urethroscope sheath 19 Fr. with atraumatic tip and obturator (10-112-119) with two lateral stop cocks, colour code: Green | 01 | 65000.00 | 65000.00 |
| 03 | Telescope bridge with one instrument channel, capacity: 1 x 12 Fr. | 01 | 22500.00 | 22500.00 |
| 04 | IMAGING SYSTEM - 1-Chip Full HD Endoscopy Camera, 1/3" CMOS, | 01 | 650000.00 | 650000.00 |
| 05 | Colour LCD Wide monitor high definiation 21" (1920 X 1080) 1xHD-SDI(BNC), DVI, Vedio input(SDTV), 1xSDI(BNC), 1x VBS(BNC), DC-15 | 01 | 275000.00 | 275000.00 |
| 06 | High Performance LED Light Source, | 01 | 225000.00 | 225000.00 |
| 07 | Fiber optic light cable, Ø 3.5 mm, 2300 mm long | 01 | 30500.00 | 30500.00 |
| 08 | Endoscopic mobile trolley mounted on 5 inches Dia. Castors having brakes on the two wheels. The trolley is fitted with four shelves and one drawer. It is fitted with two handles for easy movement of the trolley. It also have an electric switch and socket for medical equipment's. The trolley is supplied with one stainless steel I V rod and a cylinder holder. The trolley is Epoxy powder coated. Size 800 mm x 800 mm x 1400 mm, India Make | 01 | 65000.00 | 65000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **1558000.00** |

वरीलप्रमाणे दरानुसार Telecom, Telescope 300 व Sheath प्रत्येकी ०१ नग खरेदीकामी रु.१५,५८,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंधरा लाख अठ्ठावन्न हजार मात्र) तिका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०६/०१/२०१८ रोजीचे मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय □ छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस–२०१४/प्र.क्र.८२/भाग–३/उद्योग–४, दि.०१डिसेंबर२०१६ अन्वये परिच्छेद ३.२.–नियम पुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे, अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकडे Urology शस्त्रक्रिया करणेकरीता सध्या त्यांचेकडे एक सेट Telecom, Telescope 300 व Sheath असुन जुना झाल्यामुळे व्यवस्थित काम देत नसल्यामुळे त्यांनी नविन Telecom, Telescope 300 व Sheath प्रत्येकी एका नगाची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांना नविन खरेदी करुन देण्यास हरकत नाही.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (Urology) विभागाकरीता Telecom, Telescope $30^0$ व Sheath प्रत्येकी एक नग विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१५,५८,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंधरा लाख अठ्ठावन्न हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात Urology Surgery करिता Telecom, Telescope 30° व sheath खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. १६,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वद्यिकीय संचालक)**

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. O.T.1 या विभागाकरीता Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.Iया विभागाने मागणीपत्रकान्वये नविन ०१ नग Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce ची मागणी केलेली आहे. रूग्णाच्या अत्यवस्थ स्थितीमध्ये कृत्रिम श्वासोच्छवास देण्यासाठी श्वास नलीकेत टयुब टाकावी लागते त्यावेळी सदर Flexible Fiberoptic Branchoscopeमुळे ती टयुब सहजतेने टाकता येते.

दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील एकुण १२४ नग मशिन्स बदलणेसाठी मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce चीदेखील खरेदी करण्यात येत असून त्यासाठी अंदाजे खर्च रू.११,००,०००/- तिका प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. तेंव्हा CVTS O.T. I या विभागाकरीता Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce खरेदीकामी अंदाजे रक्कम रू.११,००,०००/- तिका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.I या विभागाने Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय □ छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.I या विभागाने मागणीपत्रकान्वये नविन ०१ नग Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce ची मागणी केलेली आहे. रूग्णाच्या अत्यवस्थ स्थितीमध्ये कृत्रिम श्वासोच्छवास देण्यासाठी श्वास नलीकेत टयुब टाकावी लागते त्यावेळी सदर Flexible Fiberoptic Branchoscope मुळे ती टयुब सहजतेने टाकता येते.दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील एकुण १२४ नग मशिन्स बदलणेसाठी मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce चीदेखील खरेदी करण्यात येत असून त्यासाठी अंदाजे खर्च रू.११,००,०००/- तिका प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.. तरी त्यांच्या मागणीनुसार ०१ नग Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील CVTS O.T.I या विभागासाठी ०१ नग Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.११,००,०००/- (अक्षरीरू.अकरा लाख मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. O.T.1 या विभागाकरीता Flexible Fiberoptic Branchoscope with Light Sorce विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या** रु.११,००,०००/- मात्रचे **खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं.४३** **सन २०१५-१६ मधील (Annual Rate Countract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य खरेदीस (रु.१६,४४,१३७/-) कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र .:-

(०१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

(०२) दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.७५६(५) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या आहेत.

बऱ्याचशा नामांकित रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.

औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळा बेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/ भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तथा

प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय व वद्यिकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधांअभावी रुग्णांची गरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दर्दिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजुर दराने दि.२८/०७/२०१५ रोजी एकुण रक्कम रु.१६,७५,७२,९४७.४४ तेक्या रक्कमेचे आणि दि.१३/११/२०१५ रोजी रु.१६,३६,५५,५०८.२७ तेक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तसेच Re-Tender मधील ७३ आयटमकरीता तातडीची गरज पाहता ३ लाखापेक्षा कमी रक्कमेच्या खरेदीकामी कोटेशन मागणी करुन दि.१०/११/२०१६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे, तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य त्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दर्दिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहेत, तसेच काही औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत. सदर औषधे / सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ब-याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त  जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.०१/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयात मोफत सेवा देण्यात येत असल्यामुळे सध्या रुग्णांची संख्या  दिवसेंदिवस वाढत असून त्यासाठी लागणारे औषधे / सर्जिकल साहित्य सुध्दा जास्त प्रमाणात लागत आहेत.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य त्यादी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६/- तेक्या रक्कमेचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, सदर प्रस्तावास दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळालेली असून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन औषधे प्राप्त होण्यास बराच कालावधी लागणार होता, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देण्यात आलेली आहेत व याकामी मंजुर दराने पुर्णांकित रक्कम रु.१६,४४,१३७/-(अक्षरी रु.सोळा लाख चौरेचाळीस हजार एकशे सदोतीस मात्र) तेका खर्च आलेला आहे.

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२६ अन्वये वार्षिक औषधे खरेदीमधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८/०७/२०१५ व दि.१३/११/२०१५ अन्वये PART “A” करीता एकुण रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ तेक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून PART “B” करीता On Consignment Basis वर दर्दिन वापरात येणा-या Drug Eluting Stent, Valve, Pacemaker, PTCA Balloon, BMV Balloon साठी पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यान्वये आजपर्यंत दोन्ही मिळून (PART “A”व“B”[On Consignment Basis]) रु.४५,८९,५८,८६०.६६ तेक्या रक्कमेचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत, म्हणजेच मंजुर रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- पकी रु.९,८३,७७,५३१.३४ तेकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे. तसेच रु.५५,७३,३६,३९२/- ही रक्कम सन २०१५-१६ या वर्षाचे औषधे खरेदीसाठी मंजुर करण्यात आली होती, पण प्रत्यक्षात पाहता सदर रक्कमेतून दोन वर्षापासून मटेरीयल खरेदी करण्यात येऊन शिल्लक रक्कमेतून खरेदीचा प्रस्ताव आहे.

मागणी – सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय □ छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या

कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

तसेच सन २०१७-१८ या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी कालावधी लागणार होता, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये तसेच डेंग्यु सारखे संसर्गजन्य आजार व संस्थान रुग्णालयामार्फत आयोजित कॅम्पव्दारे लागणा-या औषधे खरेदीकामी सोबतच्या यादीतील काही औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देण्यात आलेली आहेत. तसेच रुग्णालयात काही औषधांची तातडीने आवश्यकता असल्यामुळे मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येत आहेत.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुद ही औषधे / सर्जिकल साहित्य व On Cosignment Basis Item करिता एकुण रक्कम रु.५५,००,००,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न कोटी मात्र) असून त्यापैकी रक्कम रु.३५,००,००,०००/- (अक्षरी रु.पस्तीस कोटी मात्र) औषधे / सर्जिकल साहित्यांकरिता असून दि.३१/०३/२०१८ अखेर रक्कम रु.४१,९०,९३,४७६/- (अक्षरी रु. चौरैचाळीस कोटी बावन्न लाख अठ्ठयाहत्तर हजार दोनशे एक मात्र) इतकी औषधांची अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक आहे. तसेच उपरोक्त खरेदीतील औषधांच्या किंमती हया बाजारभावापेक्षा कमी आहे याची खात्री करुनच खरेदी करण्यात येत आहे.

तसेच सोबतच्या तक्त्यात नमुद केलेल्या औषधांची तातडीने आवश्यकता होती, कारण श्री साईनाथ रुग्णालयात मोफत सेवा देण्यात येत असल्यामुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस खुपच वाढत आहे, तसेच राजीव गांधी रुग्णांना मोफत औषधे देणेकामी औषधे अपुरे पडत आहे.

तरी सोबतच्या तक्त्यातील औषधे / सर्जिकल / लॅबोरेटरी साहित्य मंजुर दराने कार्योत्तर खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.१६,४४,१३७/-(अक्षरी रु.सोळा लाख चौरैचाळीस हजार एकशे सदोतीस मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचा प्रस्ताव नोंद घेणेकामी सादर.

**निर्णय क्र.३२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र जा.क्र.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.०९/०४/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी संस्थान मालकीच्या वापरास दिलेल्या जागेच्या मुदतवाढी संदर्भात प्रदर्शनातील ऐतिहासिक वस्तुंचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येईल याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे मत शासनास सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**– शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/ का.१६ दि.०९/०४/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी संस्थान मालकीच्या वापरास दिलेल्या जागेच्या मुदतवाढी संदर्भात प्रदर्शनातील ऐतिहासिक वस्तूंचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येईल याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे मत शासनास सादर करणेबाबत..

**प्रस्तावना**– श्री.अभिजित देविदास शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी संस्थान मालकीची मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील वापरास दिलेली गट नं.८० व ८५ यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फूट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फूट याचे साधारण क्षेत्रफळ ७२०० चौ.फूट या वापरास दिलेल्या मिळकतीची वापराची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यापुढील ११ वर्षासाठीच मुदत वाढवून मिळणेकामी श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी मा.व्यवस्थापन समितीपूढे विनंती केलेली आहे. ती मा.व्यवस्थापन समितीने मान्य केली असून त्यांचे मागणीनुसार पुढील ११ वर्षे मुदतवाढ देणेसाठी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा वगैरेबाबत निर्णय क्रं.१०७८ प्रमाणे निर्णय झालेला आहे.

तद्रुषंगाने सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५९९०/२०१८ दि.०७/०२/२०१८ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६दि.०९/०४/२०१८ अन्वये खालील मुद्यांची माहीती तात्काळ शासनास उपलब्ध करुन देणेबाबत इकडेस कळविलेले आहे.

१) श्री.अभिजित शिंदे यांनी त्यांच्या प्रदर्शनात मांडलेल्या वस्तू शिवाजी महाराजांच्या स्पर्शाने पावन झाल्याचे म्हटले आहे. सबब या सर्व वस्तू व शस्त्रे शिवकालीन आहेत किंवा त्यांचा वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला आहे यासंदर्भात त्यांनी संस्थानकडे पुरातत्व विभागाचा वा अन्य कोणत्याही प्राधिकृत शासकीय संस्थेचा पुरावा सादर केला आहे का?

२) सदर प्रदर्शन संस्थानच्या जागेत असल्याने सर्वसामान्य भक्तांना हे प्रदर्शन संस्थानचे आहे असे प्रथमदर्शनी वाटणे क्रमप्राप्त आहे. सबब या प्रदर्शनात मांडलेली शस्त्रास्त्रे आणि वस्तू या शिवकालीन आहेत किंवा कसे याबाबत संस्थानने पडताळणी केली आहे का?

३) प्रसादालयात येणा-या भक्तांच्या संरक्षणाची प्राथमिक जबाबदारी ही संस्थानची आहे. सदर जागा ११ वर्षांसाठी देण्याचा निर्णय घेण्यापूर्वी प्रसादालयात होणारी गर्दी व त्या अनुषंगाने प्रदर्शन पाहण्यासाठी होणारी गर्दी यांचा एकत्रित विचार करुन संस्थान आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिने काय उपाययोजना केली आहे?

४) सदर प्रदर्शन हे प्रसादालयाच्या पहिल्या मजल्यावर आहे. भविष्यात प्रसादालयात काही दुर्घटना घडून प्रदर्शनातील ऐतिहासिक वस्तूंचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येईल.याबाबत व्यवस्थापन समितीचे मत शासनाला कळविण्यात यावे.

५) श्री.शिंदे यांनी व्यवस्थापन समितीच्या सभेत आपण करत असलेल्या कामामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरात पोहचणार असल्याचे नमूद केले आहे. ही बाब विचारात घेता सदर प्रदर्शन पाहण्यासाठी भक्तांकडून कोणतेही मुल्य न आकारता विनामुल्य प्रदर्शन दाखविण्यास त्यांची सहमती आहे वा कसे?

६) श्री साईबाबा संस्थानसाठी भविष्यात राबवावयाच्या अन्य कोणत्याही प्रकल्पाकरीता या जागेची आवश्यकता लागू शकते याबाबत पडताळणी करण्यात आली आहे का?

उपरोक्त **मुद्दा क्रं.४** सदर प्रदर्शन हे प्रसादालयाच्या पहिल्या मजल्यावर आहे. भविष्यात प्रसादालयात काही दुर्घटना घडून प्रदर्शनातील ऐतिहासिक वस्तूंचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येईल याबाबत व्यवस्थापन समितीचे मत शासनास कळविणेत यावे असेबाबत शासनाचे उपरोक्त पत्रात नमूद केलेले आहे.

यास्तव मा.व्यवस्थापन समितीचे अभिप्राय मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.३३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने उपस्थित केलेल्या मुद्दा क्र.४ बाबत समितीचे पुढील प्रमाणे अभिप्राय शासनास सादर करावे, असे ठरले.**

**शासनाच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे काही दुर्घटना घडून प्रदर्शनातील ऐतीहासीक वस्तुंचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी श्री.अभिजित शिंदे यांची राहील.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ (दिनांक २६.०७.२०१८ ते दिनांक २८.०७.२०१८) साजरा करणेस व याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

प्रस्तावना:- सालाबादप्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव गुरुवार, दिनांक २६/०७/२०१८ ते शनिवार, दिनांक २८/०७/२०१८असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस शुक्रवार दिनांक २७/०७/२०१८ आहे. या उत्सवासाठी खालीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **उत्सवात करावयाची कामे** |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी निमंत्रण (सभासदांची संख्या १,८०,००० पाकीटांसह) पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ ) कलाकार कार्यक्रम** |
| | गुरुवार दि.२६/०७/२०१८ (प्रारंभ दिवस ) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम होईल. |
| | शुक्रवार दि.२७/०७/२०१८ (मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम होईल.<br>२) प्रथेप्रमाणे मुख्य दिवशी रात्रौ ११.०० ते पहाटे ४.०० पर्यंत श्रींचे समोर इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. परंतु मुख्य दिवशी ११.१५ ते पहाटे ३.४९ पर्यंत खग्रास चंद्रग्रहण असल्याने, मंदिरात मंत्रोच्चाराचे पठण होणार असल्याने श्रींचे समोर इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम ठेवता येणार नाही.<br>मंदिर परिसरात साऊंड सिस्टीम चा वापर न करता इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम ठेवणेस हरकत नाही असे मत आहे. मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | शनिवार दि. २८/०७/२०१८. ( सांगता दिवस ) | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम होईल. |
| | गुरुवार दि.२६/०७/२०१८<br>शुक्रवार दि.२७.०७.२०१८<br>शनिवार दि.२८/०७/२०१८ | **ब) कीर्तन कार्यक्रम**<br>मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७.०३.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१५५ नुसार आंतरराष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे यांचे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये कीर्तन ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तीन दिवस ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे यांचे कीर्तन कार्यक्रम ठेवता येईल. कीर्तनकारांची व साथीदारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत |

| | | |
|---|---|---|
| | | मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ३ | **श्री साईसत्यव्रत** (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सव काळात दि.२६/०७/२०१८ ते दि.२८/०७/२०१८ अखेर मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पुजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल. |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स, मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे -येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना कळविण्यात येईल. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक २६/०७/२०१८ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.२७/०७/२०१८ रोजी सकाळी ०५.०० वाजता समाप्ती होईल. मा. व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दि.२५/०७/२०१८. रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य हजर राहातील. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दिनांक २६/०७/२०१८ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, शुक्रवार दिनांक २७/०७/२०१८ रोजी रात्रौ ९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करण्यात येईल.<br>मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन सन २०१८ चे गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ निश्चित करण्यात येतील. त्याप्रमाणे उत्सवात मिष्टान्न देता येईल. |
| ०९ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| १० | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे आदेशानुसार ज्या-त्या खात्यास जादा खंत्राटी कर्मचारीवर्ग देण्यात येईल. |
| ११ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत नेहमीप्रमाणे चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | | सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय परिसर या ठिकाणी ठेवण्यात येईल. |
| १२ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान नं. १ व साई धर्मशाळा, द्वारावती, निवासस्थान, □िमरती मधुन पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच ितर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या व सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था साईआश्रम (धर्मशाळा) परिसरात करण्यात येते. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे,गुहापाट,पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १५ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १६ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु.२७,३०,३०६/- (अक्षरी रुपये सत्ताविस लाख तीस हजार तीनशे सहा ) मात्र ितका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०१८ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे अंदाजे रु. ४८,९८,०००/- (रु.आठ्ठेचाळीस लाख,आठ्ठयण्णव हजार ) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

**<u>श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१८ अंदाजपत्रक</u>**

| **अ.क्र** | **खर्च तपशिल** | **श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०१७** | | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ अंदाजे खर्च** |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज, व ितर | ४,१९,१०९.०० | ४२०३५४.०० | ४,६२,०००.०० |
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रमासह ) | ५,००,०००.०० | ३८,९३९.०० | २,९२,०००.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह) | ८,३७,३५४.०० | ६०७३४०.०० | ८,६९,०००.०० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, िंधन खर्च ) | १,००,०००.०० | ७३१४८.०० | १,१०,०००.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज,लेबल स्टीकर (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | १३,००,०००.०० | १२,६०,९१७.०० | २५,४०,०००.०० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन | ४,००,०००.०० | २९७३७९.०० | ४,००,०००.०० |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टँकर डिझेलसह) | ३,००,०००.०० | २०१४९.०० | २५,०००.०० |
| ८ | साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर घेणेकामी | - | - | १,५०,०००.०० |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २,००,०००.०० | - | - |
| १० | भाडोत्री क्रेन, मालवाहतुक व ितर खर्च | १,००,०००.०० | १२०८०.०० | ५०,०००.०० |
| | **एकुण रुपये -** | **४१,५६,४६३.००** | **२७,३०,३०६.००** | **४८,९८,०००.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१८ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.**४८,९८,०००/-** (रु. आठ्ठेचाळीस लाख,आठ्ठयाण्णव हजार ) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ साजरा करणेस व याकामी येणाऱ्या** अंदाजे रु.४८,९८,०००/- **मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) तंत्रज्ञानावर आधारीत 10TPD क्षमतेचे दोन प्रकल्प उभारणेकामी कार्यकारी अभियंता, मजिप्रा, संगमनेर यांचेकडे तांत्रिक मंजुरीसाठी छाननी शुल्क रक्कम रु.७.१८ लक्ष जमा करणेचे कार्यवाहीस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे करीता मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली. दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९ अन्वये मान्यता देण्यात आली असून खालीलप्रमाणे निर्णय संमत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा प्रत्येकी 10 TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. याकामी संस्थानचे गट नं.१८२ मधिल जागेमध्ये प्रथमतः संस्थानसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे व हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शिर्डी नगरपंचायतीचे मालकीच्या जागेमध्ये, त्यांचेसाठी संस्थानमार्फत १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावेत. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी सदरहू प्रकल्प उभारणी करतेवेळी त्यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५६ अन्वये सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९२ अन्वये मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, त्याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवगत करण्यात यावे, असे ठरले."

सदरहू प्रकल्पाकरीता वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे विहीत पध्दतीने ई-निवीदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी पात्र ठेकेदार Organic Recycling System Pvt.Ltd., Navi Mumbai यांनी सादर केलेल्या निवीदेतील दरानूसार १० TPD क्षमतेचे ०२ Biomethanation Plant, ५ TPD क्षमतेचे Bailing Machine तसेच मौजे निमगाव-को-हाळे गट नं. १८२ मधील नियोजीत बायोगॅस प्लांट ते श्री साईप्रसादालय किचन पर्यंत जी. आय. पाईप लाईन टाकणे व या प्रकल्पाचे एक वर्षाचे कालावधीसाठी देखभाल दुरुस्ती करणे या कामाकरीता निविदेमध्ये रक्कम रु.४,४१,२१,०००/- इतकी नमूद केली आहे. तसेच त्यापुढील चार वर्षांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.२,७६,००,०००/- इतकी रक्कम निविदेमध्ये नमूद केली होती.

त्यानुसार ठेकेदार Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता, सदरहू सभेतील निर्णय क्र. १०५१(८) अन्वये ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

. "यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव जादा खर्चाचा असल्यामुळे, तो अंतीम निर्णयार्थ व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

त्यानुसार सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचे प्रतिनिधी सभेसमोर उपस्थित होते.त्यांनी समिती सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली व सभेसमोर सांगितले की, या घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायतीस शासनाकडून सवलत Gap Funding मिळू शकेल. तसेच या प्रकल्पामधून तयार होणारा गॅस प्रसादालयाचे उपयोगात येईल व निविदेमधील अटी/शर्तीनुसार प्रकल्पामधून तयार होणारे खत त्यांना राहील.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी Organic Recycling System Pvt. Ltd., Navi Mumbai यांचे एकत्रित रु.७,१७,२१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच या प्रकल्पास शासनाकडून शिर्डी नगरपंचायतीस Gap Funding मिळणेकामी ठेकेदाराने आवश्यक ते सहकार्य करावे व सदरहू Gap Funding संस्थानला वर्ग करणेबाबत शिर्डी नगरपंचायती सोबत MOU करणेत यावा, असे ठरले."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे करीता विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची प्रशासकीय मान्यता घेणेसाठी जा.क्र.५१३१ दि.२६/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता.त्यावर विधी व न्याय विभागाने त्यांचेकडील दि.०८/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्तावीत प्रकल्पाच्या अंदाजपत्रकातील दर व इतर तांत्रिक बाबींची छाननी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विहीत शुल्क अदा करुन करुन घेण्यात यावी असे कळविले होते.

संस्थानचे दि.११/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये मुख्य अभियंता, मजिप्रा, नाशिक यांचेकडे तांत्रिक बाबींची छाननी करणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. यावर मुख्य अभियंता यांनी दि.१२/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रस्तावाची छाननी सुरु असल्याचे कळविले असून खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. प्रस्तावास तांत्रिक मंजूरी देणेकामी आवश्यक शुल्क रु.७.१८ लक्ष चा भरणा तात्काळ कार्यकारी अभियंता, मजिप्रा, संगमनेर कार्यालयास करण्यात यावा .

२. प्रस्ताव अंत्यत त्रोटक स्वरुपात प्राप्त झाला आहे .त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असणे गरजेचे आहे.

    a. City Profile
    b. Physical Infrastructure, Population forecast
    c. Waste Generation
    d. Existing MSW collection system
    e. Existing processing system
    f. Gap assessment analysis
    g. Various process of MSW management
    h. O & M aspect
    i. Total capital expenditure
    j. Drawings
    k. Design calculation (Capacity Calculations)

३. प्रस्तावीत केले Biomithanition process साठी प्रथम Biomithanition, Landfill, Gasification/ pyrolysis, increasion या प्रकारच्या प्रक्रिया बाबत माहिती देवून Biomithanition process चीच कशी निवड केली याबाबत स्पष्टीकरण द्यावे .

४. प्रस्तावात सदर प्रकियेची देखभाल दुरुस्ती तसेच त्यातून मिळणारे उत्पन्न याबाबतचे प्रपत्र जोडण्यात यावे .

५. प्रस्तावात जोडण्यात आलेले Drawing अत्यांत अस्पष्ट स्वरुपाचे आहेत .सदरचे drawings A-3 Sheet paper वर जोडण्यात यावे.

६. प्रस्तावाबरोबर एक ठराविक कंत्राटदाराचे काम केल्याचे प्रमाणपत्र तसेच शिर्डी संस्थानने तयार केलेला RFP (Request of Proposal) जोडण्यात आलेला आहे .या कागदपत्रांची आवश्यकता नाही .

७. अंदाजपत्रके व आराखडे उपअभियंता, कार्यकारी अभियंता तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी सादर करावेत .

सदरहू प्रस्तावास तांत्रिक मंजूरी घेणेचे काम संस्थानमार्फत निविदा प्रक्रिया करणेपूर्वी पूर्ण करणे आवश्यक होते. तथापी, याबाबत संस्थानकडे संबधीत क्षेत्रातील तज्ञ मनुष्यबळ अथवा याबाबतचा पूर्वानुभव नसल्याने सदर प्रकल्पासाठी Design, supply installation, testing & commissioning या तत्वावर निविदा मागविणेत आल्या. सदरहू कामाच्या ई-निवीदे मधील Special conditions मधील क्लॉज १.१ मध्ये

"All statutory approval should be obtained by the Contractor. Sansthan will assist it by provideing necessary documents." अशी तरतूद आहे. तथापी, ठेकेदार यांची जबाबदारी निविदापूर्व कामांसाठी घ्यावयाच्या मंजूरी संबधीत नाही, असे या कार्यालयाचे मत आहे. तसेच आज दि.२१/०४/२०१८ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरहू तांत्रिक छाननी शुल्क रु.७.१८ लक्ष हे संस्थानमार्फत तातडीने भरुन त्यास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेची सूचना दिलेली आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) तंत्रज्ञानावर आधारित 10 TPD क्षमतेचे दोन प्रकल्प उभारणे कामी कार्यकारी अभियंता, मजिप्रा, संगमनेर यांचेकडे तांत्रीक मंजूरीसाठी छाननी शुल्क रक्कम रु.७.१८ लक्ष जमा करणेचे कार्यवाहीस तसेच सदरहू खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**प्रस्तुत कामाचा प्रकल्प अहवाल (DPR) सादर झाला त्यावेळी खर्चाबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापन समितीला होते. त्यामुळे प्रकलप अहवालाच्या आधारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. तथापी त्यानंतर शासनाकडील अधिसुचना क्रमांक १०० दि.१३ जुलै २०१७ अन्वये संस्थानच्या अधिनियमात सुधारणा करण्यात आली असुन त्यामधील कलम १४ क(ग) मधील तरतुदीनुसार १ कोटी रुपयापेक्षा अधिक खर्च अतंर्भुत असलेल्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे अधिकार शासनाला आहेत, त्यानुसार प्रस्तुत प्रकल्पाला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेता प्रशासकीय मान्यता मिळण्यापुर्वी पुर्ण झालेली निविदा प्रक्रिया रद्द करुन प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर नविन निविदा प्रक्रिया करावी, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मांडले.**

**निर्णय क्र.३३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) तंत्रज्ञानावर आधारीत 10TPD क्षमतेचे दोन प्रकल्प उभारणेकामी कार्यकारी अभियंता, मजिप्रा, संगमनेर यांचेकडे तांत्रिक मंजुरीसाठी छाननी शुल्क रक्कम रु.७.१८ लक्ष जमा करणेस मान्यता देण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच शुल्क जमा केल्यानंतर तातडीने तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन संबधीत ठेकेदारास कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **संस्थानचे संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या अंतर्गत लेखापरिक्षण संस्थांचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व सक्षम अंतर्गत नियंत्रण राहण्यासाठी अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन बाहेरील सक्षम लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करण्यास अनुसरुन मा.विधी व न्याय विभागाचे जा.क्र.सासंवि-२०१७/२१९४/प्र.क्र.१३४/का.१६/दि.०८.११.२०१७ चे पत्रान्वये वैधानिक लेखापरिक्षकांचे नियुक्तीप्रताणेच अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेने करणे आवश्यक आहे. सबब याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी असे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन, दि.०७.०३.२०१८ रोजीचे मा.व्य.स.चे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. निर्णय क्र.१७३/ दि.०७.०३.२०१८ अन्वये संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येऊन, बदं पाकिटांमध्ये त्यांचे फी सह अर्ज मागविण्यात येऊन मुदतीत आलेल्या अर्जांची खरेदी समितीसमोर छानणी करण्यात आली. त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता मिळाली आहे.

त्यास अनुसरुन, दि.२१.०३.२०१८ रोजी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येऊन दि.०७.०४.२०१८ अंतिम तारिख नमुद करण्यात आली होती. विहीत मुदतीत एकुण २९ लेखापरिक्षण संस्थांचे तांत्रिक व वाणिज्यिक लिफाफे प्राप्त झाले आहे. मा.व्य.स. निर्णय क्र. १७३/दि.०७.०३.२०१८ अन्वये दि.०९.०४.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर तांत्रिक लिफाफे उघडण्यात येऊन, पात्र लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.१९.०४.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले आहेत. त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फी चा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेः-

| S.No | Name of the firm | Expected Annual Fees with GST |
|---|---|---|
| 1 | Bagchi& Gupta C.A. Mumbai | 1,12,100.00 |
| 2 | Pavan Jain & Co C.A. Mumbai | 3,18,600.00 |
| 3 | SSSAM & Co. C.A. Pune | 3,54,000.00 |
| 4 | RSD & Associates C.A. Mumbai | 5,23,920.00 |
| 5 | R.P.D.&Asso. C.A. Nashik | 6,37,200.00 |
| 6 | UlhasBorse& Co. C.A. Nashik | 6,49,000.00 |
| 7 | A.S.Bedmutha& Co .C.A. Aurangabad | 6,79,680.00 |
| 8 | Batliboi&Purohit C.A. Mumbai | 6,90,300.00 |
| 9 | Suresh D Daule& Co C.A. rahuri | 8,26,000.00 |
| 10 | MAPSV & Associates C.A. Nashik | 8,38,979.00 |
| 11 | K.K.Chanani&Asso. C.A. Mumbai | 8,44,172.00 |
| 12 | T R Chaddha& Co. Lpp Mumbai | 9,32,200.00 |
| 13 | Sunil Abhyankar&Asso.C.A. Pune | 9,44,000.00 (Travelling & Accommodation exp. As actual) |
| 14 | S.G.Andani& Co. C.A. A.Nagar | 10,62,000.00 |
| 15 | TusharPagar&Co.C.A. Nashik | 10,62,000.00 |
| 16 | SPMR &Asso. C.A. New Delhi | 15,34,000.00 |
| 17 | Vijay Panchappa& Co C.A. Mumbai | 15,57,600.00 |
| 18 | EkboteDeshmukh& co. C.A. Nagpur | 17,13,020.00 |
| 19 | MCK & Co. C.A. Pune | 20,07,180.00 |
| 20 | R Kabra& Co. C.A. Mumbai | 21,24,000.00 (Travelling & Accommodation exp. As actual) |
| 21 | AYG&Asso. C.A. Nashik | 42,48,000.00 |
| 22 | C.B.ChhajedC.A.Mumbai | 47,20,000.00 |

तरी आर्थिक वर्ष २०१८-१९ (दि.०१.०४.२०१८ ते दि.३१.०३.२०१९ अखेर) अंतर्गत लेखापरिक्षक **(Internal Auditor)**कामकाजासाठी लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन, मा. विधी व न्याय विभागास पाठविणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खरेदी समितीमध्ये उघडण्यात आलेल्या एकुण २९ प्रस्तावांपैकी एकूण २२ प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे. पैकी मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो., सीए, पुणे यांनी सन २०१६-१७ या वर्षात संस्थानचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून काम केले आहे. त्यांना संस्थानच्या आर्थिक व्यवहारांची माहिती आहे. विशेष अंतर्गत लेखापरिक्षणाचे त्यांचे काम समाधानकारक आहे. संस्थानच्या एकुण आर्थिक व्यवहारांची व्याप्ती पाहता त्यांनी सर्व करासह सादर केलेल्या रु.९,४४,०००/-+ प्रत्यक्ष अनुषंगीक खर्च या दराऐवजी सन २०१६-१७ वर्षात केलेल्या संस्थानच्या विशेष अंतर्गत लेखापरिक्षणासाठी मंजुर असलेल्या रु.६,००,०००/-+कर या दरात ते काम करण्यास तयार असल्यास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण गुणवत्तापुर्ण व कार्यक्षम होण्यासाठी फक्त निम्नतम दर हा एकच निकष गृहीत न धरता मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो., सीए, पुणे यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नेमणूकीसाठी शिफारस करुन प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण कामकाजासाठी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन आलेले प्रस्तावाचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ शासनास पाठविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद कलम १७(२) ग व कलम २९(१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल कलम १७(०२)(ग)

अन्वये, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. अशी तरतुद आहे.

तसेच कलम २९(०१) मध्ये अन्वये. “समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीयवर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपूर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील.” अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन दि.२६ मार्च,२०१८ रोजीचे मंजुर टिप्पणी अन्वये संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येऊन, बंद पाकिटामध्ये त्यांचे फी सह अर्ज मागविण्यास मान्यता मिळाली आहे. दि.२८.०३.२०१८ रोजी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. दि.११.०४.२०१८ अंतिम तारिख नमुद करण्यात आली होती. दि.११.०४.२०१८ अखेर एकुण २४ व नमुद केलेल्या मुदतीनंतर दि.१२.०४.२०१८ रोजी ०३ असे एकुण २७ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकीसाठी निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने दि.१९.०४.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत मुदतीत व मुदतीनंतर आलेले सर्व तांत्रिक लिफाफे सादर करण्यात आले होते ते उघडण्यात आले आहेत. पैकी २४पात्र लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२६.०४.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले आहेत. त्यांच्या फी चा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन, तो खालील प्रमाणेः-

| S.No | Name of the firm | Expected Annual Fees with GST | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Sabadra&Sabadra C.A. Nashik | As decided by Government of Maharashtra Law & Judiciary department. | Submitted two tenders |
| 2 | Sabadra&Sabadra C.A. Nashik | 17,70,000/- | |
| 3 | Batliboi&Purohit C.A. Mumbai | As decided by Government of Maharashtra Law & Judiciary department. | |
| 4 | Bagchi& Gupta C.A.Mubai | 60,180/- | |
| 5 | R.P.D. &Asso. C.A. Nashik | 1,06,200/- | |
| 6 | P.H.Shah& Co C.A. Ahmedabad | 1,17,988/- | |
| 7 | Agarawal&Dhandhania C.A. Surat | 1,18,000/- | |
| 8 | ShindeChavan Gandhi & Co. C.A. Latur | 1,18,000/- | |
| 9 | A.S.Bedmutha& Co. C.A. Nashik | 1,27,440/- | |
| 12 | RSD & Associates C.A. Mumbai | 1,52,220/- | |
| 13 | Sunil Singhal&Asso. C.A. Delhi | 2,35,934/- | |
| 14 | A.D.Anjikar& Co. C.A. Mumbai | 3,18,600/- | |
| 15 | NimitKalsi& Co. C.A. Mumbai | 5,86,460/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | Jodh Josh &Co.C.A. Nagpur | 590000+ travelling and accommodation | |
| 17 | Bhuta Shah & Co LPP | 590000+out of pocket expences as actual. | |
| 18 | JayeshDesale& Co. C.A. Nashik | 7,02,100/- | |
| 19 | M.S.Jadhav& Co. C.A. Pune | 8,85,000/- | |
| 20 | SPAY &Co.C.A. Pune | 11,79,999/- | |
| 21 | J.Singh&Asso. C.A. Mumbai | 17,69,410/- | |
| 22 | EkboteDeshmukh& Co. C.A. Nashik | 7,67,000/- | |
| 23 | Mukund M Chitale& Co. C.A. Mumbai | 1,77,000+ out of pocket expences as actual | Submitted two tenders after due date on Dt. 12.04.2018 |
| 24 | Mukund M Chitale& Co. C.A. Mumbai | 1,77,000+ out of pocket expences as actual | |

अशा प्रकारे उपरोक्त अ.क्र.१ ते २४ सर्व प्राप्त झालेले प्रस्ताव संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकीकरिता मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय यांचेकडे निर्णयास्तव पाठविण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खरेदी समितीमध्ये उघडण्यात आलेल्या एकुण २७ प्रस्तावांपैकी एकूण २४ प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे. पैकी मे.मुकुंद एम.चितळे ॲण्ड कंपनी, सीए, मुंबई यांनी मागील आर्थिक वर्षात संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून काम केले आहे. त्यांना संस्थानच्या आर्थिक व्यवहारांची माहिती आहे. मागील वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षणाचे त्यांचे काम समाधानकारक आहे. संस्थानच्या एकुण आर्थिक व्यवहाराची व्याप्ती पाहता त्यांनी सर्व करासह सादर केलेले दर रु.१,७७,०००/- अधिक प्रत्यक्ष अनुषंगीक खर्च हे वाजवी आहेत. त्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षण गुणवत्तापुर्ण व कार्यक्षम होण्यासाठी निम्नतम दर हा एकच निकष गृहीत न धरता मे.मुकुंद एम.चितळे ॲण्ड कंपनी, सीए, मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षण म्हणून नेमणूकीसाठी शिफारस करुन प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधनी (SSIAC) सुरु करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ इमारत बी व डी विनामोबदला संस्थानला देणगी स्वरुपात हस्तांतरण करणेस मान्यता देण्या त आलेली आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेतील निर्णयास अनुसरून आय.ए.एस. अकॅडमी सुरू करणेसाठी करावयाचे कामांचा प्रस्ताव तसेच शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.५११ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"मौजे निघोज, ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या "बी" व "डी" इमारतींमध्ये आय.ए.एस.अकॅडमी सुरू करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या अकॅडमीच्या गर्व्हनर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या आय.ए.एस.अॅकेडमी सुरु करणेकामी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल असे प्रस्तावीत करणेत आले होते, त्यास समितीने दि.१५/०६/२०१७ रोजी निर्णय क्र.५११ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सेवानिवृत्ती सनदी अधिकारी श्री.सुधीर ठाकरे यांनी विनामोबदला या अकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सीलचे अध्यक्षपद स्विकारणेस संमती दिलेली असलेबाबतची माहिती मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेत दिलेली आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.६८५ नुसार "श्री साईबाबा संस्थानमार्फत सुरु करावयाच्या I.A.S. अकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये मा.श्री.सुधीर ठाकरे, मा.श्री.सुरेश हावरे, मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.अॅड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.प्रताप भोसले व मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करणेत यावा. तसेच या गव्हर्निंग कौन्सिलने I.A.S. अॅकेडमी सुरु करणेकामी उपरोक्त प्रस्तावत नमुद केलेल्या विषयांवर मार्गदर्शन करावे, असे ठरले.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी-२, उप कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे कार्यकारी मंडळ (Executive Council) तयार करणेस मान्यता देण्यात आली.

मा.श्री.सुधीर ठाकरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव, यांची संस्थानच्या प्रस्तावीत आयएएस अॅकेडमीच्या गर्व्हनिंग कौनिसलच्या अध्यक्षपदी निवड करणेत आलेली आहे. आयएएस अॅकेडमीच्या कामकाजासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना शिर्डी येथे येणे जाणेसाठी व शिर्डी येथे वाहनव्यवस्था, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी. तसेच शिर्डी येथे वास्तव्याच्या कालावधीत एक सुरक्षा कर्मचारी पुर्णवेळ त्यांचे बरोबर देणेत यावा" असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.५११ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांना कडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ ४३२८/२०१७ दि.१८.११.२०१७ चे पत्रान्वये मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ मिरत 'बी' व 'डी' मध्ये राज्यातील गोर-गरीब, आदीवासी, वंचित, दुर्बल विद्यार्थ्यांसाठी आय.ए.ए.अकॅडमी सुरु करणेस तसेच त्या अनुषंगिक येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुषंगाने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१७/ १९९२/प्र.क्र.२२५/ का.१६ दि.१५.०२.२०१८ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त अकॅडमीबाबत खालील मुद्यांबाबत अहवाल/अभिप्राय शासनास सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत, त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | शासन पत्रान्वये उपस्थित मुद्दा | कडील कार्यालयाकडील अहवाल/अभिप्राय |
|---|---|---|
| ०१. | प्रशिक्षणार्थी निवडीसाठी कोणती कार्यपद्धती अवलंबिण्यात येणार आहे. तसेच त्यासाठी कोणते निकष लावण्यात येणार आहेत. | प्रशिक्षाणार्थी निवडीसाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षणसंस्था (SIAC) यांचेशी संलग्नता प्राप्त करुन घेणेत येणार असून, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांचेमार्फत दरवर्षी जी निवड चाचणी घेणेत येते, त्याच निवड चाचणीमधून प्रशिक्षणार्थींची निवड करणेचे प्रस्तावित आहे. सदर प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असवा, तसेच त्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी. वकिय शाखेच्या उमेदवारांनी त्यांचा आंतरवासिता प्रशिक्षण कालावधी पुर्ण केलेला असावा. तसेच वयोमर्यादा - सर्वसाधरण प्रवर्ग – २१ ते ३५ वर्ष, अनुसुचित जाती/जमाती – २१ ते ३७ वर्ष, व नागरिकांचा मागास प्रवर्ग – २१ ते ३५ वर्ष या प्रमाणे राहील. |
| ०२. | प्रशिक्षणार्थींना काही शुल्क आकारण्यात येणार आहे | सदर प्रशिक्षण संस्था सुरु करण्याचा मुख्य उद्देश हा |

<table>
<tr><td></td><td>किंवा कसे.</td><td>राज्यातील ग्रामीण भागातील आर्थिक दृष्टया मागसलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांसाठी उत्तम दर्जाचे प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे हा आहे. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे दानशुर साईभक्तांच्या माध्यमातून देणगी प्राप्त होत असते. त्यामुळे सदर प्रशिक्षाणार्थी यांचेकडून कोणतेही शुल्क आकरण्यात येणार नाही.</td></tr>
<tr><td>०३.</td><td>या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक कशाप्रकारे उपलब्ध केले जातील व त्यांना कशाप्रकारे मानधन देण्यात येईल.</td><td>सदर प्रशिक्षण संस्थेची राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांचेशी संलग्नता मिळविणेची बाब प्रस्तावित आहे. तसेच भारतातील नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थांशी करार करणेचे प्रस्तावित असून, त्यांचेमार्फत तज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणेत येणार असून, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांचेकडून प्रशिक्षकांना ज्या दराने मानधन अदा केले जाते, त्या दराने मानधन अदा करणेचे प्रस्तावित असून, या मानधनाबरोबरच त्यांना प्रवास भत्ता स्वतंत्ररित्या देणेचे प्रस्तावित असून, प्रशिक्षकांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेचे प्रस्तावित आहे.</td></tr>
<tr><td>०४.</td><td>SSIAC अकॅडमी चालविण्यासाठी संस्थानवर वार्षिक किती रकमेचा भार पाडणार आहे, त्याचा तपशिल.</td><td>सदर प्रशिक्षण संस्थेकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षणसंस्था (SIAC) यांचे धर्तीवर सर्व कार्यवाही केल्यास खालीलप्रमाणे अनावर्ती व आवर्ती खर्च अपेक्षित आहे.<br>
अनावर्ती खर्च
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>खर्च</th></tr>
<tr><td>०१.</td><td>इमारत (देणगी)</td><td>रु.३२,२७,१३,५००/-</td></tr>
<tr><td>०२.</td><td>पायभूत सुविधा, अंतर्गत बदल, फर्निचर</td><td>रु.१०,९३,३७,३०१/-</td></tr>
<tr><td>०३.</td><td>ग्रंथालय-पुस्तके</td><td>रु.१०,००,०००/-</td></tr>
<tr><td>०४.</td><td>संगणक प्रयोगशाळा</td><td>रु.१०,००,०००/-</td></tr>
<tr><td colspan="2">एकुण</td><td>रु.४३,४०,५०,८०१/-</td></tr>
<tr><td colspan="2">पैकी इमारत देणगी स्वरुपात</td><td>रु.३२,२७,१३,५००/-</td></tr>
<tr><td colspan="2">देणगी रक्कम वजा जाता एकुण खर्च</td><td>रु.११,१३,३७,३०१/-</td></tr>
</table>
आवर्ती खर्च (वार्षिक)
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>खर्च</th></tr>
<tr><td>०१.</td><td>वेतन</td><td>रु.८५,००,०००/-</td></tr>
<tr><td>०२.</td><td>प्रशिक्षण मानधन</td><td>रु.१५,००,०००/-</td></tr>
<tr><td>०३.</td><td>शैक्षणिक साहित्य</td><td>रु.४,००,०००/-</td></tr>
<tr><td>०४.</td><td>टेस्ट सेरीज</td><td>रु.२,००,०००/-</td></tr>
<tr><td>०५.</td><td>भोजन,चहा, अल्पोहार</td><td>रु.२४,००,०००/-</td></tr>
<tr><td>०६.</td><td>निवास व्यवस्था</td><td>रु.१५,००,०००/-</td></tr>
<tr><td>०७.</td><td>इतर अनुषंगिक</td><td>रु.१२,००,०००/-</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | खर्च स्वच्छता, वॉचमन वगैरे<br>०८. देखभाल व दुरुस्ती — रु.३,००,०००/-<br>०९. वीज — रु.३,००,०००/-<br>१०. कर — रु.२५,०००/-<br>११. वर्तमानपत्र — रु.१,००,०००/-<br>**एकुण — रु.१,६४,२५,०००/-** |
| ०५. | या अकॅडमीसाठी स्वतंत्र आकृतीबंध निर्माण करण्याची आवश्यकता आहे काय. | या प्रशिक्षण संस्थेसाठी स्वतंत्र आकृतीबंध निर्माण करणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचा आकृतीबंध सन २००९ मध्ये शासनाकडून मंजुर करणेत आलेला असून, त्यानंतर बरेच नवीन विभाग तयार झालेले असून, साईभक्तांच्या संख्येत व त्यांना देण्यात येणा-या सेवांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्यामुळे या प्रशिक्षण संस्थेसाठी स्वतंत्र आकृतीबंध निर्माण करणे आवश्यक आहे. |
| ०६. | संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील अधिकारी/ कर्मचा-यांमार्फत या अकॅडमीचे कामकाज चालविण्याबाबत आपले अभिप्राय | या प्रशिक्षण संस्थेसाठी प्रस्तावित आकृतीबंधातील संचालक हे पद आकृतीबंधात कायम पद म्हणून निर्माण करणेचे आवश्यकता असून, अधिक्षक, वसतिगृह अधिक्षक, लघुलेखक, उप लेखापाल, ग्रंथपाल ही पदे आकृतीबंधात कंत्राटी पदे म्हणून निर्माण करावी लागतील तसेच उर्वरीत वरिष्ठ लिपीक, लिपीक – टंकलेखक, शिपाई, माळी, सुरक्षारक्षक, मदतनीस या पदांवर संस्थानमधील सध्या कार्यरत कायम कर्मचारी किंवा बाह्ययंत्रणेद्वारे प्राप्त होणा-या कुशल/अकुशल कर्मचा-यांतून भरता येतील. त्यास मान्यता असावी. |

तसेच उपरोक्त प्रशिक्षण संस्थेसाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मानधन अथवा आर्थिक मदतीची मागणी नाही. सदर प्रशिक्षण संस्थेचा सर्व खर्च श्री साईबाबा संस्थानमार्फत करण्यात येईल. महाराष्ट्र शासनाकडून वरिष्ठ अधिकारी अथवा तज्ञ व्यक्ती यांची प्रशिक्षक म्हणून तासिका घेण्यासाठी आमंत्रित केल्यास त्यांचे मानधन व प्रवासाचा खर्च संस्थानमार्फत देण्यात येईल.

प्रत्येक बॅचचा प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा राहील. एका बॅचमध्ये सरासरी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. पैकी ५० मुले व ५० मुली अशा स्वरुपाची एक बॅच राहील. सदर प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रती विद्यार्थ्यास प्रती दिवशी सरासरी रु.६५/- मात्र खर्च (निवास, जेवण, चहा, अल्पोहार) अपेक्षित आहे.

तरी महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१५.०२.२०१८ रोजीचे पत्रात नमुद मुद्दयांबाबत उपरोक्त प्रमाणे अहवाल/अभिप्राय शासनास कळविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात साई ब्रह्मनाद स्वरमंच शिर्डी यांचा आयोजित केलेल्या साईभजन कार्यक्रमासाठी मानधन व तारीख निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या

प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व तिर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३९ खालीलप्रमाणे,

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये साई ब्रह्मनाद स्वरमंच शिर्डी यांच्या कार्यक्रमाचा समावेश करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. या कार्यक्रमामधील कलाकारांची संस्थानतर्फे दर्शन, चहा, पाणी, नाष्टा, प्रसाद भोजन व्यवस्था मोफत करणेत यावी, असे ठरले."

**प्रस्तावना:-** श्री.प्रा.रवींद्र पिंगळे, संस्थापक, साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांनी जा.नं.एसबीएस-०९/२०१७ दि.१७/१०/२०१७ रोजीचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात, "श्री साईबाबा संस्थानमध्ये साई समाधी शताब्दी महोत्सवास अतिशय उत्साही वातावरणात सुरुवात झालेली आहे. वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन श्री साईबाबा संस्थानने केलेले असून त्यामध्ये साई भजनाचे देखील आयोजन केलेले आहे. साई ब्रह्मनाद स्वरमंच हा शिर्डी येथील स्थानिक स्वरमंच असून यात सुमारे १५ कलाकार असून यातील सर्व कलाकार हे संगीताचे उच्च शिक्षण घेतलेले असून गेल्या सुमारे १५ वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. साईबाबांचे दरबारात या मंचाने अनेक कार्यक्रम विनामूल्य सादर केलेले आहेत. भारतातही या मंचाने गेल्या पाच वर्षात विविध प्रसंगी सुमारे ३०० पेक्षा अधिक कार्यक्रम सादर केलेले असून आगामी काळातील अनेक कार्यक्रम बुक झालेले आहेत. प.पूज्य साईनाथांच्या कृपाशिर्वादाने आतापर्यंत या मंचाची अतिशय चांगली वाटचाल झालेली आहे. या मंचात हार्मोनियम, तबला, मृदंग, सिंथेसायझर, ऑक्टोपॅड, गायक, गायिका, सूत्रसंचालिका असे सुमारे १५ कलाकार सहभागी असतात असे नमूद करुन या कार्यक्रमासाठी साधारणपणे रु.५१,०००/- मानधन मिळावे किंवा मानधनाची रक्कम आपणास योग्य वाटेल ती आम्हास मान्य असेल." असे कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांचा साईभजन कार्यक्रम आयोजनाबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला होता. यामध्ये साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी

यांनी त्यांचे प्रस्तावात साईभजन कार्यक्रमासाठी साधारणपणे रक्कम रु.५१,०००/- मानधन मिळणेबाबत कळविले आहे. तथापि, संस्थान देईल ती मानधनाची रक्कम स्विकारण्यास तयार असल्याबाबत नमूद केले होते.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्र.९३९ अन्वये, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये साई ब्रह्मनाद स्वरमंच शिर्डी यांच्या कार्यक्रमाचा समावेश करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. या कार्यक्रमामधील कलाकारांची संस्थानतर्फे दर्शन, चहा, पाणी, नाष्टा, प्रसाद भोजन व्यवस्था मोफत करणेत यावी, असे ठरले आहे.

तथापि, निर्णय क्र.९३९ मध्ये साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांना मानधनाची किती रक्कम आदा करावयाची याचा उल्लेख नसल्याने खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांना द्यावयाची मानधनाची रक्कम निश्चित करणे.

२) माहे जून मध्ये दि.२३/०६/२०१८ रोजी साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांच्या साईभजन कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात यापुर्वीच निश्चित केलेल्या साई बह्मनाद स्वरमंच शिर्डी यांच्या साईभजन कार्यक्रमाचे मानधन व तारीख निश्चित करणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांच्या साई साईभजन कार्यक्रमाचे दि.२३, जुन २०१८ रोजी आयोजन करणेस व त्यांना रक्कम रु.५१,०००/- मात्र मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री.पंकज ओहरी, लखनौ यांना शताब्दी महोत्सव वर्षात आयोजित विविध धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमांची फोटोग्राफी करणेची संधी देण्याबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद** –

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय** –

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ३५८ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

----------- शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने स्मरणिका/कॉफी टेबल बुक तयार करुन, प्रसिध्द करणेत यावे, असे ठरले आहे.

**प्रस्तावना-** श्री पंकज ओहरी,लखनौ यांनी मा. कार्यकारी अधिकारी, महोदया, यांना अग्रेषीत केलेल्या दि.२६/०४/२०१८ रोजीच्या ई-मेल पत्रात" मला श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित विविध कार्यक्रमांची

फोटोग्राफी करण्याची इच्छा आहे. मी सुमारे २८ वर्षापासून लखनौ, दिल्ली मध्ये फोटोग्राफी जर्नालिस्टचे काम करत असून माझ्याजवळ कॅनन ५ डी मार्क ४ असे आधुनिक कॅमेरा किट आहे.

मला शताब्दी वर्षात आयोजित विविध कार्यक्रमांचे संपूर्ण फोटोशुट करुन त्याचे कॉफीटेबल बुक श्री साईबाबा संस्थानला निःशुल्क भेट देण्याची इच्छा आहे. तरी मला यासाठी कोणत्याही मानधनाची अपेक्षा नाही किंवा भोजन, निवास, दर्शन/आरती हया कोणत्याही गोष्टीची अपेक्षा नसून यासाठी मी स्वतः खर्च करण्यास तयार असून त्यांनी त्यांचे कामाचे स्वरुप व व्यावसायिक अनुभव खालीलप्रमाणे कळविला आहे.

**JOB PROFILE :**Having 28 year of multi faced experience in media industry as a photo journalist and video journalist, done much camera work for Sahara Samay, Rashtriya Sahara Newspaper, giving me a deep insight into the various aspects of photography-still, cinematic, documentary short etc.

PROFESSIONAL EXPERIENCE :

1. Presently working as Chief Camera Man in U.P. Premier Advertising Agency, Diksha Advertising and Printing (Pvt.) Ltd., Lucknow
2. Worked with Uttar UjajaHaldwani as U.P. Head, 20 June 2011
3. Worked with CNEB News Channel as Chief Camera Man - Lucknow Bureau – 3rd March, 2009 to 15th June, 2011.
4. Worked with the reputed Hindi daily “DainikJagran” as Photo journalist from May 1986 to July 1988 and again in 2009 for a while.
5. Worked with premier news agency “Press Trust of India” from August 1988 – May 1996.
6. Coordinated and captured on camera Ayodhya Movement, Demolition of Babri Mosque and Kar-Sewa in 1992.
7. Handled 1996 General Elections.
8. Many of my photographs of Booth Capturing during the prestigious Amethi Parliamentary Constituency Election 1989, record national prominence.
9. Covered the “First Indira Gandhi Hockey Tournament" asDhyan Chand Stadium, Lucknow.

प्रस्तावः- श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत आहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांची संस्थानचे सीसीटिव्ही विभागामार्फत फोटोग्राफी करण्यात येत आहे. शिवाय शताब्दी वर्षाचे कॉफीटेबल बुक तयार करणेसाठी प्रकाशने विभागास आदेशित केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- अर्जदार श्री.पंकज ओहरी यांचा उपरोक्त कामाचा अनुभव पाहता तसेच सदरची सेवा ते विनामोबदला देण्यास तयार असल्याने त्यांचेकडून श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची सीसीटिव्ही विभागाचे मदतीने फोटोग्राफी करुन प्रकाशने विभागाचे समन्वयाने कॉफीटेबल बुक तयार करुन घेता येईल.

तरी श्री. पंकज ओहरी, लखनौ यांचा शताब्दी महोत्सव वर्षात आयोजित विविध धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची फोटोग्राफी करुन कॉफीटेबल बुक तयार करणेकामी प्राप्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.पंकज ओहरी यांच्या कामाचा अनुभव पाहता तसेच सदरची सेवा ते विनामोबदला देण्यास तयार असल्याने त्यांचेकडून श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची सीसीटिव्ही विभागाचे मदतीने फोटोग्राफी करुन प्रकाशने विभागाचे समन्वयाने सर्व हक्क संस्थानकडे ठेवून कॉफीटेबल बुक तयार करुन घेण्यात यावे, अस ठरले.**

**(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्ष प्रमुख/ सीसीटीव्ही सेलप्रमुख/प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९**
**निर्णय क्र.३३८** **रुग्णवाहीकांसाठी साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री. केळकर व सनदी लेखापाल श्री.चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिसिथतीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याएवेजी सदर निधिचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.**

**यावर सविसत चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन संस्थानने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन रुग्णवाहीका खेरदी कराव्यात, सदर रुग्णवाहीकेवर साई रुग्णवाहीका व संस्थानचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहीका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुगणवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहीकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणाऱ्या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील, असे ठरले.**

**याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती याचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविसतर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **मा.सौ. योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या तथा नगराध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्रान्वये शिर्डी नगरपंचायतीच्या खालील प्रमाणे विविध विकास कामांचे प्रस्ताव व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे शिफारशीसह शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस विनंती केली आहे.**

| अ क्र | विषय | तपशील | प्रस्तावामधील कामांची किंमत | प्रस्तावाचे स्वरुप/ माहितीचा विषय |
|---|---|---|---|---|
| १ | भुसंपादनाबाबत. | अ) आरक्षण क्र. ३१ ते सर्व्हे नं. ९ मधील १८.०० मीटर रस्ता भुसंपादन मोबदला रक्कम जमा करणेबाबत. | २९.३१ कोटी | उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांनी परिगणीत करुन दिलेली भूसंपादनाची रक्कम रु.३८.९१ कोटी पैकी श्री साईबाबा संस्थान यांना यापुर्वी भरलेली रक्कम रुपये ९.६० कोटी वजा जाता उर्वरीत रक्कम रु.२९.३१ कोटी परस्पर भूसंपादन अधिकारी यांचेकडे वर्ग करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीने न.प./टे.क्र.8/122/2018 दि.09.05.2016 अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. |
| | | ब) शिर्डी विकास योजनेतील ६ रस्ते भुसंपादन निधी जमा करणेबाबत. | १८७.०३ कोटी | शिर्डी नगरपंयातीने मंजूर विकास आराखडयातील 6 रस्ते भूसंपादनासाठी 163.00 कोटी भूसंपादन अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यासाठी प्रस्ताव जा.क्र.न.पं./ टे.क्र.8/1762/2017 दि.30/06/2017 अन्वये सादर केलेला आहे. तथापी या रस्त्यांची सुधारीत भुसंपादन मोबदला रक्कम 187.03 कोटी निश्चिती झाल्याबाबत क्र.कवि/6/882/ 2018 दि.03.02.2018 रोजी कळविले आहे. नगरपंचायतीने जा.क्र.न.प./टे.क्र.8/981/2018 दि.21/02/2018 अन्वये 163 कोटी रकमेऐवजी 187.03 कोटी रक्कम भूसंपादन अधिकारी यांचेकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| | | क) शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता (हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील | ७७.०३ लक्ष | सदर रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही पुर्ण होऊन रस्त्याचे काम संस्थान मार्फत पुर्ण झालेले आहे. तथापी जमीन मालकांना अदा करावयाचा भूसंपादन उर्वरीत मोबदला रक्कम रु.७७.०३ लक्ष निश्चिती उपविभागीय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रस्ता) भूसंपादन उर्वरीत मोबदला रक्कम जमा करणेबाबत. | | अधिकारी,शिर्डी यांचे कार्यालयास जमा करणे बाकी आहे. याबाबत नगरपंचायतीस न.प./टक्रि.8/1299/2018 दि.02/04/2018 अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. |
| | | ड) शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता (हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील रस्ता) भूसंपादन वाढीव नुकसान भरपाई रक्कम जमा करणेबाबत. | ४.२५ कोटी | सदर रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही पुर्ण होउन, रस्त्याचे काम संस्थान मार्फत पुर्ण झाले आहे. या रस्त्याखालील जमीन मालकांनी मे.कोर्टात दावे दाखल केलेले होते. त्यास अनुसरुन मे.कोपरगाव कोर्ट येथील रिव्हयु अपील क्र.1/2016 ते 7/2016 नुसार जमीन मालकांना रु.4.25 कोटी अदा करणे आवश्यक राहील.याबाबत मार्च 2018 अखेर सदर रक्कम न भरल्यास 15 टक्के व्याजाच्या रकमेत वाढ होईल. याबाबत वाढीव नुकसान भरपाई देण्याबाबत नगरपंचायतीने नं.प/टे.क्र.8/1292/2018 दि.02/04/2018 अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. |
| | **शिर्डी शहरातील विविध विकास कामांबाबत.** | | | |
| २ | इनडोअर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल बांधणे. | शिर्डी न.प. मालकीचे स.नं. १०३ मधील जागेत इनडोअर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल बांधणेसाठी १२.०९ कोटी | १२.०९ कोटी | शिर्डी नगरपंचायतीने शिर्डी नं.पं.मालकीचे स.नं.103 मधील जागेत इनडोर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल बांधणेसाठी 12.09 कोटी निधी मंजूर करणेसाठी नपटेक्र.8/1252/ 2018 दि.27/03/2018 रोजी मागणी केलेली आहे. तरी सदर निधी मंजूर व्हावा. |
| ३ | पंतप्रधान आवास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची जागा मिळणेबाबत. | शिर्डी शहरामध्ये पंतप्रधान आवास योजना राबविणेसाठी जागा मिळणेबाबत. | | शिर्डी नगरपंचायत हद्दीमध्ये पंतप्रधान आवास योजनेतंर्गत (PMAY) लक्ष्मीनगर प्रलंबीत 18.00 मीटर रस्त्यावरील अतिक्रमीत वसाहतीचे पुर्वसन करणेसाठी तसेच शहरातील इतर भागातील बेघरांसाठी घरे बांधणेसाठी श्री साईबाबा संस्थानचे मालकीची स.नं.54 व 55 मधील जागा शिर्डी नपटेक्र.8/ 1487/2018 दि.25/04/2018 रोजी मागणी केलेली आहे. तरी सदर जागा PMAY राबविण्यासाठी नगरपंचयातीस देणेबाबत ठराव पारीत करणेत यावा. |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना ४२.५१ लक्ष संपुर्ण रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून मंजूर करणेबाबत. | ७.२० कोटी | घ्नकचरा व्यवस्थापनातंर्गत शिर्डी नगरपंचयातीने प्रती महिना 42.51 लक्ष रुपये निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला होता. तथापी संस्थान यांनी प्रती महिना 30.00 लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. तथापी प्रति महिना 42.51 लक्ष रक्कम 1 डिसेंबर,2017 पासून पुढील पाच वर्षापर्यंत मंजूर होणेसाठी शिर्डी न.पं.ने जा.क्र.नप.टेक्र.06/1483/ 2018 दि.25/04/2018 अन्वये नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. त्यास व्यवस्थापन समिती व छाननी समितीची मान्यता मिळावी. |

**निर्णय क्र.३३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त मागण्यांबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

| अ.क्र. | विषय | तपशील | प्रस्तावामधील कामांची किंमत | सभेमध्ये चर्चा होऊन, घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | भुसंपादनाबाबत. | अ) आरक्षण क्र. ३१ ते सर्व्हे नं. ९ मधील १८.०० मीटर रस्ता भुसंपादन मोबदला रक्कम जमा करणेबाबत. | २९.३१ कोटी | उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रक्कम वर्ग करणेबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. |
| | | ब) शिर्डी विकास योजनेतील ६ रस्ते भुसंपादन निधी जमा करणेबाबत. | १८७.०३ कोटी | सदर प्रकरणी मा.छाननी समितीमध्ये चर्चा झालेली आहे. त्यानुसार कार्यवाही करणेत यावी. |
| | | क) शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता (हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील रस्ता) भूसंपादन उर्वरीत मोबदला रक्कम जमा | ७७.०३ लक्ष | उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रक्कम वर्ग करणेबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करणेबाबत. | | |
| | | ड) शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता (हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील रस्ता) भूसंपादन वाढीव नुकसान भरपाई रक्कम जमा करणेबाबत. | ४.२५ कोटी | उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रक्कम वर्ग करणेबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. |
| **शिर्डी शहरातील विविध विकास कामांबाबत.** | | | | |
| २ | इंडोअर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल बांधणे. | शिर्डी न.प. मालकीचे स.नं. १०३ मधील जागेत इंडोअर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल बांधणेसाठी १२.०९ कोटी | १२.०९ कोटी | इंडोअर गेम हॉल, ऑडोटोरीअम, स्विमींग पुल उभारणीचे संपुर्ण काम शिर्डी नगरपंचयात यांनी पुढील देखभालीसह करावे. या अटीवर निधी देणेबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. |
| ३ | पंतप्रधान आवास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची जागा मिळणेबाबत. | शिर्डी शहरामध्ये पंतप्रधान आवास योजना राबविणेसाठी जागा मिळणेबाबत. | | सदर विषयाबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना ४२.५१ लक्ष संपुर्ण रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून मंजूर करणेबाबत. | ७.२० कोटी | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना रक्कम रु.३५ लक्ष निधी दि. १ डिसेंबर, २०१७ पासून देण्यात यावा, असे ठरले त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. तथापी नगरपंचायतीची मागणी ४२.५१ लक्ष प्रति महिना याचीही माहिती शासनाकडे पाठवावी. |

**तसेच शिर्डी नगरपंचायतीचे संस्थानकडील प्रस्तावांबाबत समन्वय राखण्यासाठी संस्थानतर्फे उपकार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले.**

**उपरोक्त् प्रमाणे घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/ मुख्यलेखाधिकारी)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **जपान, कोची येथील साईभक्तांचे शिष्टमंडळ आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी पादुका दर्शन सोहळयासाठी पुढील प्रमाणे प्रस्ताव सादर केला. श्रींच्या पादुका उपलब्ध करून देणेबाबत सभेस विनंती केली.**

| Date | Programme | Detail |
|---|---|---|
| 3rd September 2018 | BABA'S PADUKA departure for Japan from SHIRDI to Mumbai, Mumbai to Osaka by Air India flight. | From Mumbai airport all response for BABA'S PADUKA will be taken by Guru Manju Saty group. |
| 4th September 2018 | About 2pm will arrive in Osaka airport, from Osaka airport will drive to KOUCHI with PADUKA and group from India after arrival KOUCHI rest day. | BABA'S PADUKA stay at SHINDEN(SHIRDI BABA'S temple at KOUCHI), group will stay at hotel (if need anybody can stay at SINDEN too) |
| 5th September 2018 | BABA'S PADUKA is in the SHINDEN (SHIRDI BABA'S temple at KOUCHI) Key persons receive Puja this day. | Same as above |
| 6th September 2018 | BABA'S PADUKA is in the SHINDEN (SHIRDI BABA'S temple at KOUCHI) Key persons receive Puja this day. | Same as above |
| 7th September 2018 | Rest day | Same as above |

| | | |
|---|---|---|
| 8th September 2018 | BABA'S PADUKA darshan for public at CHIKURINJI templ, a historic temple in kochi. | Same as above |
| 9th September 2018 | BABA'S PADUKA darshan for public at CHIKURINJI templ, a historic temple in kochi. | Same as above |
| 10th September 2018 | Departure from KOUCHI by car and flight from OSAKA to Mumbai by Air India. | |

तसेच त्यांनी संस्थानचे उपरोक्त दौऱ्यावर ६ ते ८ अधिकारी व कर्मचारी यांचे शिर्डी ते जपान व जपान ते शिर्डी या दरम्यानचा आवश्यक प्रवासखर्च, व्हिजा व परवानग्या खर्च तसेच जपान येथील कार्यक्रम व वास्तव्याच्या कालावधीतील निवास व भोजन वयवस्था करण्याचे मान्य केले आहे.

निर्णय क्र.३४० यावर सविस्तर चर्चा होऊन, जपान, कोची येथे पादुका दर्शन सोहळ्यासाठी दि.३ सप्टेंबर,२०१८ ते दि.१० सप्टेंबर,२०१८ याकालावधीत चांदीचे पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे ठरले. तसेच उपरोक्त पादुका दर्शन सोहळयासाठी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी व ईतर अधिकारी, कर्मचारी असे एकूण जास्तीत जास्त ६ ते ८ व्यक्तींना उपस्थित राहण्यास व या सर्वांचा प्रवासखर्च,व्हिजा खर्च व निवास, भोजन खर्च जपान येथील आयोजक मंडळास करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यासाठी शासनाची आवश्यक पुर्व परवानगी घेण्यात यावी,

तसेच सदर पादुका दर्शन सोहळयासाठी जे विश्वस्त जाऊ ईच्छीत असतील त्यांनी स्वत:च्या खर्चाने जावे, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२

निर्णय क्र.३४१ ओरॅकल प्रणालीच्या ज्या लायन्सस् चे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासर्व लायनससचे त्वरील नुतनीकरण करुन घेण्यात यावे.तसेच करारनाम्यानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नालॉजी, पुणे यांनी ओरॅकल प्रणालीचे ज्या लायन्सस् चे नुतनीकरण करणे आवश्यक होते त्या लायन्सस् चे नुतनीकरण करणेसाठी येणारा खर्च कॉग्नीझंट टेक्नालॉजी, पुणे यांच्या प्रलंबीत देयकातून वसुल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सर्व कामकाज संगणकीकृत करणेसाठी आजचे सभेसमोर Hospital Management System या सॉप्टवेअरचे सादरीकरण करण्यात आले. सदरचे सॉप्टवेअर संस्थानला मोफत देणार असून १० वर्ष देखभाल दुरुस्तीची सेवा मोफत देणार आहेत. यासाठी येणारा खर्च संबधीत कंपनीला देगणी स्वरुपात उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच कार्यादेश दिल्यानंतर सदर System कार्यरत करणेसाठी ६ महिन्याचा कालावधी लागेल असे त्यांनी सांगीतले. त्यासाठीचे Hardware संस्थानला खरेदी करावे लागणार आहे.

यावेळी संस्थान स्वत: देणगीदाराशी संपर्क करुन देणगी स्वरुपात रक्कम / वस्तु/ साहित्य/साफ्टवेअर ईत्यादी प्राप्त घेत असते. त्यासाठी एखादी कंपनी/संस्था यांना त्यांचे स्तरावर देणगीदार शोधण्यास व देणगी स्विकारण्यास मान्यता दिल्यास गैरप्रकार होऊन संस्थानच्या नावाने फसवणूक/ पैसे गोळा करण्याचे प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी संस्थानने देणगीदार शोधून त्यांचेमार्फत उपरोक्त साफ्टवेअर खरेदी करणे संस्थानच्या हिताचे राहील, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत मांडले.

निर्णय क्र.३४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु कामी कंपनीस देगणी स्वरुपातील मिळणारी रक्कम कोणाकडून मिळणार आहे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येईल, याची माहिती संस्थानला देण्यात यावी, सदरहू सॉप्टवेअर एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर चालविण्यात यावे. असे ठरले. तसचे सदर सॉफ्टवेअर घेण्यापुर्वी सध्या सदर सॉफ्टवेअर ज्या रुग्णालयात कार्यान्वीत आहे. त्या रुग्णालयास संस्थानच्या डॉक्टर, संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने पाहणी करुन सदर सॉफ्टवेअरच्या उपयुक्ततेबाबत खात्री करुन घ्यावी, असे ठरले. तसेच सदर सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक हार्डवेअर खरेदीसाठी रु.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४

निर्णय क्र.३४३ साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक विभागातील कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. याकरीता तज्ञ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहे. डॉ.संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट यांनी दि.०७.०४.२०१८ रोजीचे अर्जान्वये राजीनामा दिला आहे. डॉ.देवरे यांनी राजीनामा मागे घेणेबाबत अर्ज दिल्यास त्यांचा राजीनामा रद्द करुन त्यांना एकत्रित मानधन रु.६५,९११/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा. तसेच डॉ.मनोहर विश्वासराव शिंदे, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट व डॉ.संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट यांना आठवडयातील ३-३ दिवस ओ.पी.डी. विभागुन देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५

निर्णय क्र.३४४ थॅलेसीमीया ग्रस्त रुग्णांना मोफत रक्त उपलब्ध करुन देणाऱ्या रक्त पेढयांना आर्थिक सहाय्य देणेबाबत नियमावली तयार करुन प्रस्ताव समीती समोर सादर करावा. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ स्मार्ट शिर्डी प्रकल्पांतर्गत शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने नियुक्त केलेल्या प्राईस वॉटर कुपर्स (PWC) या कपंनीने सादरीकरण केले. उपरोक्त सादरीकरणात येणाऱ्या बाबी व त्यावर येणारा खर्च खालीलप्रमाणे.

| # | Item | Estimated Cost | Estimated Cost in Crores | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | CAPEX | | |
| A | City Fiber | 122,810,000.00 | 12.28 | |
| B | Saftey and Security Town | 27,100,000.00 | 2.71 | |
| C | Saftey and Security SSST | 118,928,073.00 | 11.89 | |
| D | Smart Utilities | 45,449,642.00 | 4.54 | |
| E | Other smart elements | 13,608,250.00 | 1.36 | |
| F | CCC and viewing centers | 42,824,811.33 | 4.28 | |
| G | Software and Licenses | 27,737,216.00 | 2.77 | |
| H | One time cost-bandwidth | 7,000,000.00 | 0.70 | |
| | SUB TOTAL | | 40.55 | |
| | | OPEX (O & M)for 5 years | | |
| A | City Fiber | 35,000,000.00 | 3.50 | |
| B | Saftey and Security Town | 10,840,000.00 | 1.08 | |
| C | Saftey and Security SSST | 47,571,1229.20 | 4.76 | |
| D | Smart Utilities | 18,179,856,80 | 1.82 | |
| E | Other smart elements | 5,603,300.00 | 0.56 | |
| F | CCC and viewing centers | 17,129,924,53 | 1.71 | |
| G | Software and Licenses | 11,094,886,40 | 1.11 | |
| H | Cloud DC & DR | 76,360,434.61 | 7.64 | |
| I | Bandwidth | 20,993,129.00 | 2.10 | |
| J | Tech & Operational manpower (over 5 years) | 77,534,770.00 | 7.75 | |
| | | | 32.03 | |
| | Total | | 72.58 | |

निर्णय क्र.३४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्राईस वॉटर कुपर्स (PWC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७**

**निर्णय क्र.३४६** **संस्थानचे कामकाजासंबधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समीतीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी. व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

वरील निर्णय क्र.२८७ ते ३४६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं.०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) (सुरेश हावरे)
मुख्यकार्यकारी अधिकारी अध्यक्ष

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**